एप्रील १९८६) राम नवमी विशेषांक (किंमत १ रु

श्री

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासि



श्रीसाईलीला

एप्रिल १९८६

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान.

शिरडीचे अधिकृत मासिक


संपादक

श्री. रा. द. बन्ने

कार्यकारी अधिकारी श्रीसाईबाबा संस्थान शिरडी

: कार्यकारी संपादक :

**प्रा. सौ. इंदिरा खेर**
एम.ए. पी.एच.डी.
(इंग्रजी आवृत्ती)

**श्री. सदानंद चेंदवणकर**
(मराठी आवृत्ती)


**श्री रामनवमी विशेषांक — वर्षारंभ अंक**


**वर्ष ६५ वे]** **[अंक १ ला**

**किंमत १ रुपया**

**दूरध्वनी ४१२२५६१**

: कार्यालय :

**"साईनिकेतन", प्लॉट नं ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई-४०० ०१४.**

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख. सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.

**श्री साईबाबांच्या संदेशाचा विश्वभर प्रसार करणे**
**हे श्रीसाईलीलाचे मुख्य उद्दिष्ट आहे.**



## श्रीसाईवाक्सुधा

गुरू कथेची सत्संगति।
धरा उगवा संसार गुंती।
यांतचि तुमचें सार्थक निश्चितीं।
विकल्प चित्तीं न धरावा ॥१३४॥
सोडूनियां लाख चतुराई।
स्मरा निरंतर 'साई साई'।
'बेडा पार' होईल पाहीं।
संदेह कांही न धरावा ॥१३५॥
हे नाहीत माझे बोल।
असती साई मुखींचे सखोल।
मानू नका हो हे फोल।
याचे ते तोल करूं नका ॥१३६॥
कुसंग तेथूनि सर्व खोटा।
तो महादु:खांचा वसौटा।
नकळतचि नेईल अव्हांटा।
देईल फांटा सौख्याला ॥१३७॥
एका साईनाथा वांचून।
अथवा एका सदगुरूवीण।
कुसंगाचे परिमार्जन।
करी आन कवण कीं ॥१३८॥

— श्रीसाईसच्चरित् अध्याय १० वा

## सुविचार

**जगी होई जे धन्य या रामनामें।**
**क्रियाभक्ति उपासना नित्य नेमें।**
**उदासीनता तत्वतां सार आहे।**
**सदासर्वदा मोकळी वृत्ति राहे॥**

*

उपासनेला नित्यनेम पाहिजे, आळस, कंटाळा उपयोगी नाही. कारण उदासीनता हा गुण खरोखर साध्य करून घ्यावयाचा आहे. येथे उदासीनता म्हणजे तटस्थपणा नव्हे, तर कामना व कल्पना यांच्या ओढी-पासून मन सुटणे म्हणजे अनासक्तता असा अर्थ आहे. नाना विषयांनी जखडलेले मन त्यापासून अलग करणे म्हणजेच खरी उदासीनता होय. यामुळेच वृत्ती मोकळी राहते व मन परमार्थाला कार्यक्षम बनते.

या मासिकात प्रकाशित झालेल्या लेखातील मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.


# श्री साईलीला अनुक्रमणिका एप्रिल १९८६


| क्रमांक | शिर्षक | लेखक-कवी नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | संपादकीय | — | ४ |
| २ | दे मज साईगीत | — श्री. रामदास पगारे | ५ |
| ३ | जीवनात आहे राम... | — श्री. वि. म. हटवार | ६ |
| ४ | बाबांचा सदुपदेश... | — डॉ. रा. सी. कापडी | ८ |
| ५ | साईशक्ती | — वैजु हुल्याळकर | ११ |
| ६ | साईनाथांचा शरणार्थी | — श्री. वि. बा. खेर | १२ |
| ७ | महाराजांचे एकमेव मासिक श्रीसाईलीला | — साईनंद | १५ |
| ८ | भक्तीची प्रेमगाथा | — श्री. बबन येरम | २२ |
| ९ | भक्ताकडे बाबांचे मागणे | — श्री. चकोर आजगावकर | २३ |
| १० | शिरडीचे रामायणाशी नाते | — श्री. बाळासाहेब नाडकर्णी | २४ |
| ११ | शिरडीचे साईराजे | — श्री. विश्वनाथ चव्हाण | २६ |
| १२ | शिरडी दैनंदिनी | — साईनंद | २८ |
| १३ | श्री रामचरित मानस | — सौ. कुसुमताई जोग | ३२ |
| १४ | साईभक्तीने मी साधले | — सौ. वासंती नांदेडकर | ३४ |
| १५ | गीत साईनाथायन | — श्री. रा. दि. परांजपे | ३५ |
| १६ | सिलेंडरचा स्फोट व श्री साई कृपा | — सौ. नीला पाटकर | ४१ |
| १७ | शिरडीचे साईबाबा | — श्री. लक्ष्मण कुंभार | ४२ |
| १८ | गोदाकाठचा राम | — डॉ. सुमन खानविलकर | ४४ |
| १९ | दर्शन | — सौ. शकुंतला जगतकर | ४७ |
| २० | प्रार्थनेला प्रतिसाद | — सौ. निर्मला राजे | ४८ |
| २१ | अजन्मा जन्मासी आला | — श्री. वां. वा भुतकर | ४९ |
| २२ | बाल साईभक्तांसाठी श्रीराम कथा | — साईनंद | ५१ |
| २३ | एम.एस.सी.ला प्रवेश बाबांमुळे | — श्री. हुद्दार शिवाजी गुंडू | ५४ |
| २४ | श्री सदगुरु साईरामा | — कु. शालिनी देसाई | ५५ |
| २५ | धनुर्धारी राम | — श्री. ग. दे. कुलकर्णी | ५६ |
| २६ | राम जन्म | — श्री. भास्कर जोशी | ५६ |
| २७ | श्री साईची अशी कृपा | — श्रीमती सुशिला बलसे | ५७ |
| २८ | साई साई मुखी म्हणू या | — राधाकृष्ण गुप्ता | ५८ |
| २९ | साई राम | — श्री. अरविंद बारटक्के | ५९ |
| ३० | साईराम म्हणजे प्रभू रामचंद्रच | — सौ. उषा अधिकारी | ६० |
| ३१ | बाबांची कृपा | — श्री. सुनील महाजन | ६३ |
| ३२ | कै. डॉ. किर्तीकर | — | ६४ |


– –

## संपादकीय

# श्रीसाईनाथांच्या रामजन्मोत्सवाचा अमृतमहोत्सव



**जिथे रामनामाचें गर्जन । फिरे तेथे विष्णुंचे सुदर्शन ।**
**कोटी विघ्नांचे निर्दाळण । दीन संरक्षण नाम हें ॥**

भगवान संत चूडामणी श्रीसाईबाबांच्या 'श्रीसाईलीला' मासिकाचा हा रामनवमी विशेषांक तुमच्या हाती देण्यात विशेष आनंद वाटत आहे. आणखीनही विशेष आनंदाची गोष्ट म्हणजे या अंकाने बाबांची आणि तुमची सर्वांची लाडकी श्रीसाईलीला ६५ व्या वर्षात प्रवेश करीत आहे. गेली ६४ वर्षे या मासिकाने श्रींची आणि त्यांच्या भक्तांची सेवा केली आणि एक विशिष्ट प्रकारचा दर्जा मराठी मासिकांच्या जगात प्राप्त केला आहे. मुंबईहून प्रकाशित होणाऱ्या सर्व मासिकात श्रीसाईलीला हे एक जुन्यातले जुने अध्यात्मिक क्षेत्रातले मराठी मासिक आहे ही लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

यंदा श्रीरामनवमी एप्रिलच्या मध्यास आली आहे. बाबांनी सुरू केलेला तीन दिवस चालणारा उत्सवही प्रतिवर्षाप्रमाणे साजरा होत आहे. रामजन्मोत्सव श्री बाबांनी सुरू केला. मोठ्या भक्तिभावाने त्यांनी हा उत्सव सुरू केला तो कशासाठी? पुण्यपुरुष भगवान श्रीरामचंद्रांचा आदर्श आपल्यापुढे सतत रहावा, त्या महान पुरुषाचे गुणगान आपल्याकडून व्हावे, आपल्या मनावर सुसंस्कार घडावेत. ज्या श्रेष्ठ गुणांच्या बळावर श्रीराम अजरामर झाले. त्या सद्गुणांचा सुगंध आम्ही लुटावा व आपले जीवन सुंदर बनवावे यासाठीच. रामनाम तारक, जीवन पोषक व जीवन मरणाच्या फेऱ्यातून आपला बचाव करणारे आहे. प्रत्येक हिंदू भारतवासीयांची प्रभूजीवर असीम श्रद्धा नि भक्ती आहे. त्या श्रद्धेवर गेली हजारो वर्षे आपण जगत आहोत व पुढेही त्याच श्रद्धेवर जगणार आहोत.

प्रभू रामचंद्रजींचे महात्म्य, त्यांची या भारत वर्षातील कर्तबगारी बाबांनीच बरोबर जाणली यात नवल ते कसले? जनता सुखी व्हावी, भारतात व जगात सर्वत्र आबादी आबाद, सुख समाधान व प्रेम भाव वाढत रहावा, घराघरातून आपल्या बंधू, भगिनी, माता, पिता इ. बद्दलचे प्रेम वाढते रहावे हीच तर बाबांची मनोमन मनिषा. त्यासाठीच तर त्यांनी आपला अवतार घेतला. रामनामाचे तारक व पोषक असे प्रचंड महत्व बाबांनीच ओळखले. जनमानसावरील रामनामाची पकड बाबा बरोबर ओळखून होते आणि म्हणूनच तर त्यांनी आपल्या हयातीत आपल्या परम पवित्र शिरडी भूमीत रामजन्मोत्सवाचा मोठा सुखद सोहळा सुरू केला. या उत्सवाचे महत्व आवर्जून त्यांनी कथन केले. आपल्या हयातीत चांगली सात-आठ वर्षे उत्सव स्वतः पाहिला; आणि सर्वांच्या कल्याणास कारणीभूत होणारा हा सुखद सोहळा, उत्सव आपल्या मागेही

अखंडीतपणे चालू रहावा याची व्यवस्था त्यांनी करून ठेवली. बाबांना रामनामाचे एवढे महत्व कां वाटले, या उत्सवाला त्यांनी अग्रपूजेचा मान का दिला हे जाणून घेणे प्रत्येकाचे, हर एक भक्ताचे कर्तव्य आहे. लोक कल्याणासंबंधीची बाबांची भावना आपण सर्वांनी लक्षात घेतली पाहिजे.

शिरडी पुण्यक्षेत्री श्री बाबांनी हा उत्सव शके १८३३ (इ.स. १९११) मधे सुरू केला. तेव्हा आता यंदा या उत्सवाला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. या उत्सवास यंदा अमृत महोत्सवी स्वरूप ही त्यांचीच कृपा होय; त्यांचीच प्रेरणा होय.

# दे मज साईगीत

दीन दयाळू साई भक्तांचा सोयरा।
अन्त नको पाहू दे मज निवारा ॥धृ. ॥
नसे साथ द्यावयास मज आज कोणी।
नित्य राहो ओठी भजन वाणी ॥
तुच माझी नाव लाव पैल तिरा ॥ १ ॥
देह माया उघडा व्यथा जाळती।
लागता आग वणव्याला सावली सरती ॥
ऐसी मज स्थितीत साई दे थारा ॥२ ॥
नको मज धन नको हे जग।
तुझ्या नामस्मरणात होऊ दे दंग ॥
फुलू दे तुझ्या भक्तीचा फुलोरा ॥३ ॥
येऊ दे किती वादळी संकटे।
तुझ्या भजनी स्थिती कधी न सुटे ॥
रूक्ष वाळवंटी जीवनात वाहू दे झरा ॥४ ॥
अमंगळ शब्द नको माझ्या तोंडी।
निंदा नालस्ती वाणी कानी न पाडी ॥
ऐसी मज दे बुद्धी जग मानीत सारा ॥५ ॥

**— श्री. रामदास गजमल पगारे,**
मु.पो. उमराण, ता. नवापूर
जि. धुळे

# जीवनात आहे राम, मंत्र माझा साईराम

— श्री. वि. म. हटवार
१४९ रेशीमबाग,
नागपूर :- ९.

निराशेतून उद्‌गार निघताना, जीवनात राम नाही किंवा रस नाही. एक म्हणतो 'आता जगणे ही शिक्षा आहे. दुसरा म्हणतो जीवनात राम असण्याकरिता दिक्षा घेणार कां? तिसरा म्हणतो पूर्वजन्मी पुण्य केले असेल म्हणून म्हातारपणी आरामात दिवस चालले आहेत. सगळ्याच माणसांचे दुःखाची जात एकच आहे पण फुलोरा भिन्न भासतो.

माणसाला मनाच्या आत डोकावून पहाण्यास शिकले पाहिजे. मनाच्या पोकळीत साईनाम भरा. आपले सत्यस्वरूप जाणण्याचा प्रयत्न करा. यातून मार्ग सापडेल.

शिरडीचे साई अवधूत सांप्रदायातीलल मौलिक रत्न, कृपाळू, सर्वसाक्षी आहेत. देहमुक्ती म्हणजेच मोक्षप्राप्ती. मुक्तीसाठी देहाचा संबंध विसर्जित होणे संकल्पित आहे. अशी देहभाव विसर्जित अवस्था म्हणजे परमहंस अवस्था, देह असून नसल्यासारखाच असतो.

श्रीसाईबाबा परमहंस अवधूत विभूती होते. त्यांच्या ठायी परमभक्ती ठेवून नामस्मरणात रंगून जाणे हा सोपा भक्तिमार्ग आहे. दयाशीलता म्हणजे दानधर्म करणे व समभाव म्हणजे सर्वांना अन्नदान करणे हाच त्यांचा आदेश आहे. साईनाथांची शिकवण आहे कि जे माझे भक्त अनन्य भावाने चिंतन करतात व उपासना करतात त्यांची मी नित्य काळजी वाहतो आणि कार्यपूर्ति करतो.

साधू व सत्पुरुषांच्या दर्शनाने आणि सहवासातून आत्मचिंतन घडते. वैफल्य किंवा विकृती पचविण्याची ताकद, दया क्षमा शांती या गुणांनीच प्रत्येकात निर्माण होऊ शकते. आत्मचिंतनातून संसारातील आव्हानांची उत्तरे शोधून काढता येतात. माणसाने निष्काम प्रयत्नवादी बनले पाहिजे. स्वतःवरचा विश्वास व निर्धार निराशेतून आशेचा किरण निर्माण करतो. म्हणूनच आध्यात्मिक ज्ञानाची आज देशाला गरज आहे. त्याग व सेवावृत्तीने सर्व समस्या सोडविण्यास मदत मिळते.

श्रीसाईनाथाला संकटग्रस्त भक्तांच्या उद्धाराची आवड व निकड इतकी असे की ते स्वाधिकार सोडून कोणत्याही रूपाने धावत त्या स्थळी हजर असत. त्यांच्या मार्गदर्शनाने संकटातून सुटका झाल्याचा भास भक्तास होऊन तोही धावत शिरडीला येऊन बाबांस नमस्कार करून दानधर्म करीत असे. अशा कित्येक प्रसंगांचे वर्णन श्रीसाई चरित्रात आहे.

ज्यावेळी परिस्थितीने माणूस असो किंवा स्त्री असो हताश होतो त्यावेळी आपल्या आराध्य दैवतापुढे हात जोडून प्रार्थना करतो. माझी सून मुंबईची आहे. तिचे आईवडील मूळचे विदर्भातले पण नोकरीकरिता वडील मुंबईस गेले व तेथेच स्थायिक आहेत. सन १९८२ मध्ये नोव्हेंबर महिन्यात तिला प्रसूति वेदना सुरू झाल्या. माहेरची मूळचीच नोकरी पेशांतील साधारण कुटुंबाची मंडळी. आईला तिने तारेने कळविले, पण तिने

येण्यास असमर्थता दर्शवून सांगितले, तू काही काळजी करू नको. दररोज उदबत्ती लावून साईबाबांस नमस्कार नियमाने कर म्हणजे तोच तुझी सुटका करील. घरी सासूबाईचे ऑपरेशन झाले असल्यामुळे ती सूनेला धीर देण्यापलिकडे काहीं करू शकत नव्हती. लक्ष्मीपुजनाच्या दिवशी पुजा आटोपून,, जेवणखाण संपवून श्रीसाईच्या फोटोला हार घालून प्रार्थना केली. मला रिक्षा आणावयास सांगितला व रात्री १० वाजता दवाखान्यात जाऊन फॅमिली डॉक्टरकडून औषध घेतल्यानंतर त्याच रिक्षातून मातृसेवा संघाच्या सूतिकाग्रहात भरती झाली. पहिलेच बाळंतपण असल्यामुळे वेदना असह्य होत होत्या. पण मनात सारखा साईनामाचा जप चालू होता. दुसरे दिवशी सकाळी डॉक्टरला भेटून तिला धीर देण्यास सांगितले. डॉक्टर वयोवृद्ध व अनुभवी होते. ते मला म्हणाले, तुमच्या सूनबाईच्या बाबतीत काळजी करण्याकरिता एकच गोष्ट कारणीभूत झाली. ती म्हणजे ज्या प्रमाणात प्रसुति सुलभ होण्याकरिता गर्भाची हालचाल व्हायला पाहिजे ती झालेली नाही तरी आपण दुपारी १२ वाजेपर्यंत वाट पाहू व तोपर्यंत प्रसूति झाली नाही तर मग काय करावयाचे ते ठरवू. कदाचित ऑपरेशन करावे लागले तर तयारी ठेवा. मी घरी येऊन स्नान केले व दुपारपर्यंत पुजा व जेवण आटोपून १२.१० वाजता सूतिकागृहात पोहोचलो. जाताक्षणिच नर्सने मला पाहिल्याबरोबर सांगितले, तुमच्या सूनेला बरोबर १२ वाजता मुलगी झाली. लगेच मी माझ्या मुलास तिथे थांबावयास सांगितले व जन्मकुंडली करणाऱ्या ज्योतिषाकडे गेलो. त्यांनी दिवस, तिथी व वेळ लिहून घेतली व पंचांग पाहून सांगितले तुमची नात भाग्यवान आहे. कर्ता करविता भगवंत आहे. ती जर अमावास्येच्या रात्री झाली असती तर तिचे प्रकृतीस्वास्थ चांगले राहिले नसते ती वेळ टळली व दुसरे दिवशी प्रथमेला दुपारी १२ वा. जन्म झाल्यामुळे बाळ व बाळंतीण दोघेही स्वस्थ राहतील. घरी सर्वांना हे सांगितले तर त्यांनाही समाधान झाले असा आहे. श्रीसाईचा चमत्कार हीच परमेश्वराची लीला. ह्या लीलेच्या आनंदात माया मोहातून माणूस मुक्त होतो.

ज्ञान आणि भक्ति जीवाच्या सांसारिक बंधनातून मुक्त होण्याची अमोध साधने आहेत. भक्तिमार्ग हा सर्वजन कल्याणकारी राजमार्ग आहे. रामायणात श्रीरामाचे स्वरूप, सौंदर्य,, शक्ति, शील व पराक्रम यांच्या दर्शनाने मन भारून जाते.

माणसाच्या आयुष्यांत असे किती प्रसंग येतात त्यामुळे मन गोंधळून जाते. यासाठी आपले श्रद्धास्थान असणे आवश्यक आहे. श्रद्धेनेच आजच्या व्याधिग्रस्त जीवनातून तरुन जाण्याचा मार्ग निघतो. विश्वास असेल तर रक्षणकर्ता धावून येतो.

# श्रीसाईबाबांचा सदुपदेश
# श्रद्धा आणि सबुरी

— डॉ. रा. सी. कापडी.
राजारामपुरी, कोल्हापूर

।न देवो विद्यते काष्ठे, न पाषाणे न गुणमदे ॥
॥विद्यते देवो भावेषु, तस्मात भावोही कारणम् ॥

श्रीमत् परमहंस, साईबाबा यांच्या मंदिरात पाऊल टाकताच एका बाजूला श्रद्धा आणि दुसऱ्या बाजूला सबूरी अशी दोन वेद वाक्ये कांचेच्या कोंदणरूपी फलकात ठसठसीतपणे दृष्टोपत्तीस येतात.

या दोन वाक्यांना वेद वाक्य म्हटली त्याचे कारण साईबाबा हे कलीयुगाचे अवतार असून त्यांच्या तोंडून निघालेले शब्द महावाक्याप्रमाणे आहेत.

हिंदूच्या धर्मग्रंथात चार वेद हे ऋषीच्या तोंडातून निघालेले उस्फूर्त शब्द आहेत. ह्या शब्द राशीतून नंतर अठरा पुराणे, आठ शास्त्रे, उपनिषदे गीता वगैरे ग्रंथ निर्माण झाले.

चार वेद जाण, षडशास्त्रे कारण, अठराही पुराणे
हरीशी गाती ।

असे ज्ञानदेव माऊलीच्या हरी पाठात म्हटले आहे. ह्या प्रत्येक वेदग्रंथात चार महावाक्ये आहेत ती अशी:-

अपमाया ब्रम्ह- अथर्व वेद
प्रज्ञा नमानंद- ऋग्वेद
अहं ब्रम्हास्मि- यर्जुवेद
तत्वमसि (सोऽऽहं)- सामवेद

परमेश्वराची आराधना करताना या महावाक्यातील कोणतेही महावाक्य परमेश्वर स्वरूप मानली आहेत. पण ती सद्गुरूच्या तोंडून निघाली पाहिजेत. सद्गुरू अनुग्रह करताना ह्या महावाक्यातील कोणतेही वाक्याचा पाठ म्हणायला सांगतात.

पावसच्या स्वामी स्वरूपानंदानी-

यावत् सावध तावत् सोऽऽहं। स्मरण अखंडीत जाण
अढळ भाव सर्वथा असो। मग जावो राहो प्राण ॥

या त्यांच्या स्वताच्या पद्यातील 'सोऽऽहँ' म्हणावयास निरंतर म्हणावयास मला सांगितला.

याच प्रमाणे साईबाबांनी अखिल मानव जातीला "श्रद्धा आणि सबूरी" ही दोन महावाक्ये दिली आहेत.

भावेवीण देव न मिळे निःसंदेह। गुरुविण अनुभव कैसा कळे॥ (हरीपाठ)

ज्ञानदेव माऊलीने भाव यालाच श्रद्धा म्हटले आहे. देवावर अगर गुरुवर श्रद्धा

अचल पाहिजे, एक निष्ठ पाहिजे सर्वस्व समर्पित पाहिजे. म्हणजेच भावपूर्ण पाहिजे.

भावेवीण भक्ती, भक्तीवीण मुक्ती, बळेवीण शक्ती बोलू नये. (हरीपाठ)

एखादा काडी पैलवान असला तरी त्याने महाराष्ट्र हिंद केसरीबरोबर कुस्ती करीन असे म्हणणे म्हणजे "अनंत वाचाळ, बरळती बरळ" या प्रमाणे आपले हसे करण्यासारखे आहे भाव आणि भक्ती ही जोडगोळी नसेल,, तर मुक्ती-परमेश्वर प्राप्ती होणार नाही.

देव भावाचा भुकेला असतो.

पै भक्ति एक मी जाणे। तेथे सान थोर न म्हणे
आम्ही भावाचे पाहुणे। मलतेया॥ (ज्ञानेश्वरी)

भाव भक्तीने श्रद्धेने जो मला भजतो त्याला मी मस्तकावर घेऊन नाचतो.

मग याहीवरी पार्था। माझिया भजनी आस्था।
तरी तयाते मी माथा। मुकुट वारी॥

इतकी भाव भक्तीची श्रद्धेची महती आहे. श्रद्धा कशी ठेवावी हे सुद्धा ज्ञानदेव माऊली सांगते.

तूं मन बुद्धि साजेशी। जरी माझिया स्वरूपा अर्पिशी।
तरी मातेची या पावशी। हे माझी भाष्ठ॥ ज्ञानेश्वर.

खरोखर तू मन, बुद्धि माझ्या ठिकाणी अर्पण करशील, तर मद्रूपची होशील. हे मी तुला प्रतिज्ञा पूर्वक सांगतो. (ज्ञानेश्वरी) याचाच अर्थ अनन्य भावानें श्रद्धापूर्वक तूं जर माझ्यावर सर्वस्वी भार टाकशील तर तूं आणि मी दोन नाही.

एक तत्वी नाम साधती साधन।
द्वैताचें बंधन न बाधिजे॥ (हरीपाठ)

नामस्मरण हेंच मुक्तीचे सर्वस्वी साधन आहे अशी भावना ठेवून भगवन्तम रूपी साधन आचरतात,, त्याला मी व तूं इत्यादि द्वैत बाधू शकत नाही.

साईबाबा कोणाची कशी श्रद्धा आहे हे ताबडतोब ओळखतात. एकदा हरीद्वारचे सोम देवजी बाबांची कीर्ति ऐकून त्यांच्या दर्शनास आले. शिर्डीजवळ आल्यावर त्यांच्या निवासस्थानावर फडकत असलेली निशाणे पाहून त्यांच्या मनात कुकल्पनाच्या भावना प्रसवल्या सोबत श्रद्धेने येणाऱ्या भक्त जनांनी भावभक्तीने नमस्कार केला.

पंढरपूरला विठ्ठलाचे वारकरी पंढरपूर जवळ आले म्हणजे लांबून निशाळ पाहून "विठ्ठल विठ्ठल" म्हणत नाचत असतात तसाच हा प्रकार असतो.

सोमदेवजी ओरडले "अरे संतांना असला निशाणाचा ढोंगी बडेजाव कशाला? अशा मिजाशी ढोंगी साधूचे मला दर्शन घेण्याची इच्छा नाही. मी असाच परत जातो. तो गाडीतून उतरु लागला. बाबांच्या दर्शनास येणारे इतर साईभक्त त्यांना म्हणाले, "ह्या निशाणाचा बाबांशी संबंध नाही. भक्तांनी भक्ती भावाने श्रद्धेने लावलेली ती निशाणे आहेत. एवढ्याने जर तुम्ही चमकून गेलात, तर रात्री चावडीकडे जाणारा छबिना, पालखी, तासे, वाजंत्री, आतशबाजी पाहिलीत तर चार्वाक-नास्तिक लोक जशी हेटाळणी तसे म्हणून तुम्ही मूर्च्छीत पडाल. इतक्या लांबून हरिद्वारहून तुम्ही आला आहात तर

बाबांच्या पाया पडू नका. लांबूनच दर्शन घ्या. असा वेडेपणा करु नका. एवढा आग्रह केल्यावर त्यांना ते पटले. ते बाबांच्या दर्शनास गेले. बाबांची आणि त्यांची नजरानजर झाल्यावर ते वरमले. ते बाबांचे पदस्पर्श करण्यास इतराप्रमाणे पुढे जाऊ लागले. बाबा ओरडले. "अरे! या स्वामीला हांकलून लावा. मशिदीवर निशाणे लावणाऱ्या माझ्या सारख्या ढोंगी माणसाचा याला विटाळ होईल. बाबा आणखी अद्वातद्वा बोलले. माझ्या अंतरी उठलेल्या कुकल्पना ज्या साधुला अगोदरच कळतात तो इतर साधू प्रमाणे भोंदू नाही. बाबा अंतर्ज्ञानी आहेत ही खूण गाठ पटली. सोमदेवजी विरघळला. धांवत जाऊन त्याने बाबांचे पाय धरले. अश्रूंचा पूर चरणावर अभिषेक केला. इतका श्रद्धेचा महीमा आहे. ते बाबांचे एकनिष्ठ भक्त बनले. भाव असल्याशिवाय इतके अष्टभाव उचंबळून येणार नाहीत. त्याला पूर्व पुण्याई पाहिजे.

असाच एक प्रकार स्वामी विवेकानंदांच्या वेळी घडला. स्वामी विवेकानंदांचे अलवारचे महाराज पट्ट शिष्य होते. त्यांच्या आमंत्रणावरून स्वामीजी त्यांच्या भेटीस गेले, गाठी भेटी झाल्यावर वातचित करताना राजे म्हणाले, "स्वामी! तुम्ही अंतरज्ञानी, परमेश्वराचा अवतार असताना माझ्यासारख्या निराकारी ईश्वराची भक्ती करणारा प्रार्थनानिष्ठ माणसाला सगुण रुपाचे ध्यान करा त्याशिवाय तुमची आध्यात्मिक मार्गात प्रगती होणार नाही. असे कसे सांगता?"

थोडा वेळ स्वामी कांहीच बोलले नाहीत. राजेसाहेबांचा सेवक तेथे उभा होता त्याला राजेसाहेबांची कॅनव्हसवर रंगविलेली तसबीर खाली काढावयास सांगितली व त्या तसबीरीला "लाथ मार" असा हुकूम सोडला. सर्व आश्चर्यचकीत झाले. राजेसाहेब नम्रपणे म्हणाले, "स्वामी! अशी भलतीच गोष्ट माझ्या नोकराला कशी सांगता? माझी प्रतिमा आहे." "कशावरून? तू सांगतोस म्हणून ना?" तुम्हाला न ओखळणारा माणूस ते एक चित्रच आहे, रंगाऱ्याने इकडे तिकडे रेखोट्या ओढून काढलेले ते चित्र! अनोळखी माणसाला त्याची काम किंमत?" पण ती आपली प्रतिमा आहे. असे सांगितल्यावर तो अनोळखी माणूस स्तब्ध होईल. आपला नोकर भयभीत होऊन गर्भगळीत झाला. त्याला पुढे पाऊल टाकण्याचे धैर्य झाले नाही. त्याला ती प्रतिमा आदरणीय वाटते. झालं तर आपणच विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर दिलेत.

मातीचा केला पशुपती, पण मातीला काय म्हणशी<br>
पाषाणाचा केला विष्णु! पण पाषाण विष्णु नाही ॥<br>
काशाची केली अंबिका! पण कासे नव्हे अंबा ॥

जसा भाव तसा देव. जशी श्रद्धा तशी प्रज्ञा. येथे प्रज्ञा म्हणजे ज्ञान- आत्मज्ञान. ते मिळविण्यासाठी फारच प्रयास करावे लागतात. गुरुचा शोध घ्यावा लागतो. सद्गुरूची सेवा करावी लागते. त्यांना प्रसन्न ठेवावे लागते. त्यांना प्रश्न विचारून ज्ञानाची तृप्ती करावी लागते.

तद्विद्धि प्रणीपातेन, परिप्रश्नेन सेवया।<br>
उपदक्षंति ते ज्ञानं ज्ञानिन तत्वदर्शिनः ॥गीता अ/४/३४

ज्ञानदेव माऊलीने खालीलप्रमाणे त्याचे प्राकृतात स्पष्टीकरण केले आहे.

जे ज्ञानाचा कुरूठा। तेथ-सेवा हा दरवंटा।
तो स्वाधीन करी सुभद्रा। ओळगोनी॥

अर्थ- जे संत ज्ञानाचे केवळ माहेरघरच आहे. जेथे सेवा धर्म हा उंबरठा आहे, तो एकनिष्ठेने गुरूची सेवा करून स्वाधीन करून घे.

तरी धनुमनु जिवे चरणाशी लागावे। आणि अगर्वत करावे दास्य सकळ।।

वरील ओवीत सांगितल्या प्रमाणे सेवा करायला वेळ लागेल. धैर्य लागेल. म्हणून सबूरी पाहिजे "पी हळद आणि हो गोरी" असे म्हणून चालणार नाही. श्रद्धा आणि सबूरी ही साई बाबांची बोधवचने वेद वाटल्याप्रमाणे मानली पाहिजेत. आचरणांत आणली पाहिजेत.

ओंम शांती। शांती।। शांती।।
साईराम। साईराम।। साईराम

# साई शक्ती

विठ्ठल म्हणे कोणी
म्हणे कोणी दत्त
मारूती तो आहे
राम तोची सत्य

रुप त्याचे अनेक
परी माया एक
आईचं हृदय तेच
त्या साईची मी लेक

करू कशी भक्ती
द्यावी तीच बुद्धी
साई-साई नित्य गाई
द्यावी मज शक्ती

गीत-गाऊ बाबांचे
स्मरण करू साईचे
भय त्यासी कुणाचे
ज्यासी रक्षण बाबांचे

— वैजु. प्र. हुल्याळकर
कलंगुट-गोवा ४०३५१६

# श्री साईनाथांचा शरणार्थी (११)

लेखकः ब्रह्मीभूत स्वामी साईशरणानंद
अनुवादकः वि. बा. खेर

या सुमारास ईश्वरलाल नावाचा माटुंग्याला राहणारा व परळ वर्कशॉपमध्ये मजूरी करणारा एक तरुण बाबांच्या दर्शनास आला व चावडीत उतरला. तो बाबांची सेवा करे व माझ्याकडे येत जात असे. राम नवमीच्या दिवशी रस्त्यात फारच दाटी होती. माझे साठे साहेबांच्या वाड्यापाशी काही काम होते म्हणून निघालो, तेव्हा ते काम मी करतो, असे तो म्हणाला. आपल्यासाठी दुसऱ्याला उगीच तसदी कशाला? शिवाय आपण त्याला काय देऊ शकू? या विचारांनी मी त्याला नकार दिला. परंतु वाट निसरडी असल्यामुळे मी पडलो. यावरून मी असा बोध घेतला की कोणी प्रेमाने निष्काम सेवा करण्याचा आग्रह धरला तर त्याला नाही म्हणू नये. ईश्वरलाल राधाकृष्णआईकडे सुद्धा येऊ जाऊ लागला होता. नंतर त्याला एकाएकी कॉलरा झाला. शेवटचे एक दोन दिवस त्याने माझ्या खोलीतच काढले. राधाकृष्णआईने व मी करता येण्यासारखे सारे इलाज केले पण तो वाचला नाही. आरतीच्या समयास त्याने देह सोडला. राधाकृष्णआई समक्ष माझ्या खोलीत त्याचा अंत झाला. अंतिम क्षणी त्याचा जीव घाबरला तेव्हा राधाकृष्णआईने त्याला विचारले, ''काही पुण्यदान केले आहेस का?'' तो म्हणाला, ''नाही'' असा प्रश्न शेवटचे घटकेस त्याला राधाकृष्णआईने विचारावा हे मला खटकले. परंतु पुण्य न केल्याचा पश्चात्ताप करवण्याची अशा रीतीची शास्त्रीय प्रथा असेल असे मी धरून चाललो. तो वारला म्हणून मी बाबांवरची श्रद्धा ढळली असे राधाकृष्णआई म्हणाली. परंतु तसे काहीच नव्हते. उलट बाबा म्हणाले, ''दुसऱ्या जगात राहण्यासाठी (चांगल्या जागी) तो गेला आहे.''

उन्हाळ्याचे दिवस होते. राधाकृष्णआई तिच्या दाराबाहेर ओट्यावर झोपली होती; माझ्या खोलीबाहेर मातीच्या सलग ओट्यावर मी झोपलो होतो. बाबा जेव्हा चावडीत व द्वारकामाईत निद्रा करत तेव्हा मी माझ्या बिछान्यातच मंगळ आरती म्हणे. एकदा आरतीतील ''उठा उठा श्री साईनाथ गुरू चरणकमल दावा'' या तिसऱ्या भूपाळीतील ''उघडूनी नेत्रकमला दीनबंधू रमाकांता। पाहिबा कृपादृष्टी बालका जशी माता। हे कडवे मी बिछान्यातच म्हटले तोच राधकृष्णआईने डोळे उघडून माझ्याकडे पाहिले. तेव्हा मला वाटले की, राधाकृष्णआई व बाबा एक आहेत व तिच्या रूपाने बाबांनी आपल्यावर कृपा केली. हा विचार उठताच बाबांनी मशिदीतून ओरडून शिवी दिली ''तुझ्या आईच्या ......'' यावरून राधाकृष्णआईच्या रूपाने बाबांनी माझी प्रार्थना स्वीकारली ही माझी कल्पना चूकीची होती हे मी समजलो. बाबा असे सुचवू इच्छित होते की, राधाकृष्णआईचे प्रार्थनेच्या भावासमवेत तादात्म्य झाले म्हणून बाबांच्या जागी तिला बसवणे योग्य नाही.

या घटकेनंतर बावीस वर्षांनी गर्गसंहितेचे गुजराथी भाषांतर माझ्या वाचण्यात आले. त्यात राधिकेच्या एक अशाच प्रसंगाचे वर्णन आहे. राधिका ज्या उद्योगात फिरायला

जाई तेथे श्रीकृष्णाची जणू काय प्रतिमाच असलेली एक सखी तिला भेटली. त्या सखीचे सर्वच व्यवहार-हावभाव, बोलणे-चालणे, उठणे-बसणे, राधिकेवर प्रेम करणे-श्रीकृष्णासारखे हुबेहुब असलेले पाहून राधिकेची व त्यासखीची गाढ मैत्री जमली. सखी आपल्या घरी जाई तेवढा विरहसुद्धा तिला असह्य होई. म्हणून त्या दोघी बहुतेक वेळ एकत्रच असत. एकदा त्या सखीला राधिकेला सोडून जावे लागले. सखीने जाऊ नये म्हणून राधिकेने अनेक युक्त्या प्रयुक्त्या केल्या पण व्यर्थ. तेव्हा राधिका 'हे कृष्ण, हे कृष्ण असा शोक करून बेभान झाली. त्यावेळी कृष्ण प्रगट झाला व विचारले, "काय झाले?" राधिकेने सर्व हकीकत सांगितल्यावर श्रीकृष्ण म्हणाला, "तुझ्या सखीचे माझ्या रूपाशी कितीही साम्य असले तरी ती कृष्णच आहे असे समजून तिच्यावर एवढी माया करणे योग्य नव्हते. मी तो मीच. माझे जागी दुसऱ्या कोणालाही बसविणे उचित नाही. तसे केल्याने असे दुःख होणारच. म्हणून आता जागृत हो."

बापुसाहेब जोग, बुटीसाहेब विडा खात म्हणून रात्रीच्या भोजनानंतर राधाकृष्णआईने एकदा त्यांना विडे दिले व मी जवळच होतो म्हणून मला पण दिला. तो मी खाल्ल्याने माझे ओठ रंगले व ओठांना चिमटा घेऊन राधाकृष्णआई म्हणाली "चांगला रंग आला आहे," त्यानंतर मी मशिदीत गेलो तेव्हा बाबा म्हणाले, "पान कशाला घेतलेस? या पुढे घेत जाऊ नकोस." दुसऱ्या दिवशी राधाकृष्णआईने भोजनानंतर मला विडा देऊ लागली तेव्हा मी लगेच म्हणालो, "बाबांनी मला मनाई केली आहे." राधाकृष्णआई म्हणाली, "हो, हो, तुला सर्वच बाबतीत बाबा हो, नाही सांगतात, खरं ना?" मी उत्तर दिले नाही व त्या वेळेसपासून विडा कधीच घेतला नाही.

शिरडीत रविवारी बाजार भरण्यास नुकतीच सुरुवात झाली असता राधाकृष्णआई मला म्हणाली, "वामन्या, बाजारात जा व तुला आवडतील त्या भाज्या घेऊन ये," त्याप्रमाणे मी बाजारातून भाज्या घेऊन आलो. नंतर डॉ. पिल्ले आले त्यांना राधाकृष्णआई म्हणाली, "आज वामनला पाठवून भाज्या आणवल्या आहेत. संध्याकाळी मी स्वतः चपात्या व भाज्यांचा स्वयंपाक करून तुम्हाला व त्याला जेवायला घालीन." डॉ.पिल्लेनी आनंदाने ही गोष्ट मानली. रात्री नियमाप्रमाणे मी द्वारकामाईत गेलो तेव्हा बाबांनी मला दोन शेंगदाणे दिले. ते दाणे खाल्ल्याने पोट भरले व भूक शमली.एवढेच नव्हे तर पोट तट्ट भरते तसे वाटले. बाबांचे दर्शन घेऊन निघालो तेव्हा बाबा म्हणाले, "जा, आता जाऊन तुझ्या खोलीत बस. बाहेर येऊ नकोस." पोट तट्ट भरलेले व शिवाय बाबांची वरील आज्ञा. त्यावरून स्पष्ट होते की आईने तयार केलेली भाकरी खाऊ नये. म्हणून राधाकृष्णआईने बोलावले तेव्हा उत्तर दिले. "मी येऊ शकत नाही." नंतर चावडीत शेजारतीची तयारी झाली तसे तिने मला मोठ्याने हाका मारल्या पण मी काही बाहेर आलो नाही व बाबांच्या आज्ञेला चिकटून राहिलो. त्यामुळे माझी चावडीत सेवा चुकली. चावडीच्या दिवशी बहुधा पालखी समोर किंवा बाबांसमोर मी चवरी मोरचेल धरी, फिरवी, व कित्येकदा गरूडटक्का पण घेत असे. कित्येक दिवसपर्यंत बापुसाहेब जोग चावडीत आरती करत त्यावेळी कापराच्या वड्या योग्य वेळी घाले. ही सेवा त्या दिवशी माझ्या हातून चुकली.

दुसऱ्या दिवशी मी मशिदीत गेलो तेव्हा बाबा म्हणाले, "काल रात्री हाका मारून थकलो पण जणू काही भिंतीलाच बोलावत होतो त्याप्रमाणे तू काही ऐकले नाहीस." त्यामुळे मी घोटाळ्यात पडलो. शेंगदाणे देणारे बाबा आणि खोलीबाहेर घेऊ नकोस सांगणारे सुद्धा बाबाच. मग मला सर्वांनी हाका मारून बोलावले तेव्हा बाहेर न येण्याची बाबांची आज्ञा मानून जर गेलो तर त्यात माझा काय दोष? परंतु बाहेर न पडण्याचा आदेश राधाकृष्णआईच्या जेवणापुरताच होता! म्हणून भक्तांनी बोलावले तेव्हा चावडीत न जाण्यात व त्यायोगे सेवेला अंतरण्यात किंवा सेवेचा त्याग करण्यात माझ्या हातून अज्ञानाने चूक घडली. बाबांची आज्ञा मर्यादित असताना प्रयोजन संपल्यानंतरही तिला उगीच चिकटून राहिलो! भगवंताच्या सेवेला चुकीमुळे मुकलो व बाबांची अशा रीतीने अवगणना झाली.

राधाकृष्णाआई दोन प्रसंगी मला म्हणाली: "वामन, आज तुझी खिचडी बाबा खाणार आहेत." एकदा मी स्वयंपाक करण्यास सुरुवात करून खिचडी केली तेव्हा व दुसऱ्यांदा माझी मोठी बहीण मोघीबहेन भाच्यासमवेत आली व पहिल्याच दिवशी खिचडी बनवली तेव्हा मोघीबहेनने नैवेद्याची खिचडी बाबांकडे पोचवून नंतर राधाकृष्णआईकडे पण नेली व ती तिने प्रेमाने खाल्ली. ज्या दिवशी बाबांनी व राधाकृष्णआईने खिचडी खाल्ली, त्या दिवशी खिचडी खाता खाता वृत्ती सहज तदाकार झाली.

असाच अनुभव मला दुसऱ्यांदा आला. त्यावरून स्पष्ट होते की, संत-महात्मे किंवा भगवंताला दाखविलेल्या प्रसादाचा स्वीकार होतो व जेव्हा स्वीकार होत नाही, या दोहोत जमीन-अस्मानाचे अंतर आहे. न स्वीकारलेले, न दाखवलेले अन्न असन्मार्गाकडे नेते व स्वीकारलेले अन्न वृत्ति तदाकार करते किंवा सात्विक वृत्ति अथवा सात्विक विचार उत्पन्न करते.

क्वचित प्रसंगी बाबा सोनामुखी व दुसऱ्या अनेक वस्तु जमा करून काढा तयार करत व त्यांना वाटेल त्या भक्तांना देत. माझ्या अकरा महिन्यांच्या निवासात बाबांनी दोनदा काढा तयार केला. प्रथम केला तेव्हा मला विचारले, "घे, पिशील का?" फकीरबाबा जे शेजारीच बसले होते ते म्हणाले, "आपण द्याल आणि वामनराव पिणार नाहीत असे होईलच कसं!" मी तात्काळ हो म्हणालो व प्यालो. काढा पाजल्यानंतर वर गांठिया किंवा चण्याची डाळ खायला बाबा देत व नंतर विडा खाण्यास सांगत. काढ्याचा प्रसाद हा असा मला एकदाच मिळाला.

## वसंतराव पोतदार साईचरणी विलीन

साईभक्त श्री: वसंतराव लक्ष्मण पोतदार वय वर्षे ८४ यांचे सोमवार, दिनांक २४ फेब्रु. ८६ रोजी दुपारी १० वा. सांताक्रूझ येथील निवासस्थानी वृद्धापकाळामुळे देहावसान झाले. ते श्री साईलीला मासिकाच्या शिरडी येथे भरलेल्या ११ व्या लेखक-कवी संमेलनाचे अध्यक्ष होते. त्यांच्या पश्चात् सुविद्य पुत्र, कन्यका, सूना-नातवंडे व असंख्य साई स्नेही असा परिवार आहे. श्री साई मृतात्म्यास चिरशांती व सद्गती देवो. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात श्री साईबाबा संस्थान सहभागी आहे.

''साईलीले''चे केवळ श्री साईबाबांच्या कृपाशिर्वादामुळेच ६५ व्या वर्षात पदार्पण

# श्रीसाईनाथांचे एकमेव मासिक ''श्रीसाईलीला''

संत चूडामणी भगवान श्री साईबाबांच्या श्रीसाईलीला या एकमेव मासिकाचा ६५ व्या वर्षाचा पहिला अंक हा आहे. जगनियंत्या श्रीसाईनाथांनी शिर्डी येथे सुरू केलेल्या श्रीराम नवमी या उत्सवाला यंदा ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. बाबांच्या या प्रसिद्ध उत्सव कालाच्या जवळपास हा अंक प्रकाशित होत आहे, व तो साई भक्तांच्या हाती देण्यास आम्हाला नेहमीप्रमाणेच आनंद व समाधान होत आहे. महाराष्ट्रात आध्यात्मिक विषयाला वाहिलेले व इतर संत, सिद्ध पुरुषांच्याहि विचारशलाका भाविक वाचकांसमोर ठेवणारे खुद्द श्री साईभक्तांना बाबांचे आलेले अनुभव प्रदर्शित करणारे आणि श्रीसाईबाबा या एकाच विषयाला संपूर्णपणे वाहिलेले एवढे प्रदीर्घ वाटचाल केलेले असे अन्य मासिक नाही. श्री बाबांच्या महानिर्वाणानंतर अवघ्या पाचच वर्षांनी म्हणजे १९२३ साली श्रीसाईलीला मासिक सुरू झाले व आजतागायत ते चालू आहे ही खरोखरीच श्री बाबांचीच या मासिकावर कृपादृष्टी होय. श्री महाराजांच्या परम कृपा प्रसादामुळेच पासष्टाव्या वर्षाचा हा पहिला अंक श्रद्धायुक्त अंतःकरणाने आपल्या पुढे सादर करीत आहोत.

'साठी बुद्धी नाठी' ही म्हण कदाचित् माणसांच्या बाबतीत खरी असली तरी ती मासिकांच्या बाबतीत खचितच खरी नाही त्या ऐवजी 'जुने ते सोने' ही म्हण यथार्थपणे वापरता येईल. दिर्घकाळ चालणारे मासिक हे मुरलेल्या लोणच्याप्रमाणे अधिकच चविष्ट असते. अशा मासिकाला एक परंपरा असते आणि दीर्घकाळच्या प्रकाशन परंपरेने मासिकाकडून वाचकांच्या बऱ्याच अपेक्षा असतात, आणि मग त्या पुऱ्या करण्याचे अत्यंत जबाबदारीचे काम संपादकांवर पडत असते. म्हणून अशा प्रकारच्या दीर्घकाळ चाललेल्या व उज्ज्वल परंपरा असणाऱ्या मासिकाचा संपादक होणे हे जसे भाग्याचे लक्षण तसेच मोठ्या जबाबदारीचेही काम असते.

चालू जमान्यात विविध प्रकारची नियतकालिके प्रसिद्ध होताना दिसतात. दैनिके, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, द्वै. मासिके, त्रैमासिके, षण्मासिके व वार्षिके प्रकाशित होत असतात. विशेषतः राजकीय पक्षांची मुखपत्रे व चित्रपट, नाटक, क्रीडा, शृंगार कथा, करमणूक या विषयावरील नियतकालिके यांचा खप बराच मोठा आहे. शेती, तत्वज्ञान, धर्म, भक्ती इ. विषयात वाहिलेली व प्रचारात्मक प्रसिद्ध होणारी नियतकालिकेही प्रसिद्ध होत असतात पण त्यांचा खप असावा तसा मोठा नसतो. वाचकांची अभिरुची हेच त्याचे मुख्य कारण होय. पण श्रीसाईबाबा संस्थान शिरडीचे मुखपत्र असलेले श्री साईलीला मासिक बाबांचे आहे. समस्त साईभक्तांचे हे लाडके मासिक आहे. भक्तांचा या मासिकावर लोभ आहे, प्रेम आहे, श्रद्धा आहे, विश्वास आहे. एके काळी या मासिकाचा खप हवा तसा नव्हता पण आता त्याचा खप वाढू लागला आहे पण जेवढा वाढायला हवा आहे तेवढा मात्र नाही.

श्री महाराजांच्या या "साईलीला" मासिकाच्या गेल्या ६४ वर्षाच्या प्रदीर्घ वाटचालीचा इतिहास मोठा रंजक असला पाहिजे व तो यथावकाश लिहिला जाईलच. पण या मासिकाचे उद्देश काय होते व त्यातले किती सफल झाले आहेत याचाच ओझरता आढावा येथे घेणे इष्ट होईल.

भगवान श्री साईबाबांनी १५ ऑक्टोबर १९१८ रोजी समाधी घेतल्यानंतर त्यांच्या शुभाशिर्वादामुळे ज्यांच्या लेखनाला कै. अण्णासाहेब दाभोलकरांनी सुरुवात केली होती ते 'साईसच्चरित' लिहून पूर्ण झाले होते. श्री बाबांच्या संबंधीचे काही समकालीन भक्तांचे अनुभव त्यात ग्रथित झाले होते. पण बाबांच्या असंख्य भक्तांना हरघडी बाबांच्या लीलांचे, आशीर्वादाचे व कृपेचे अनुभव वारंवार येत होते व तेही कुठे ना कुठे तरी प्रसिद्ध करून इतर भक्तांच्या माहितीसाठी रूजू करणे अत्यावश्यक होते. त्याकाळी शिर्डी संस्थान विश्वस्तांच्या ताब्यात होते तेव्हा त्यांनी विचार विनिमय करून "श्री साईलीला" नावाचे मासिक पत्र प्रसिद्ध करण्याचे ठरविले व त्याचा प्रथमांक चैत्र शुद्ध प्रतिपदा (गुढी पाडवा) शके १८४५ (इ. सन १९२३) ला प्रसिद्ध झाला. हीच श्री साईलीला मासिकाची सुरुवात होय. हा पहिला अंक अवघा ३२ पानांचा होता व त्यावर साधारण निळसर-आकाशी रंगाचे बाबांच्या शिळेवरील बैठकीचे चित्र छापलेले आवरण होते. या पहिल्या अंकाचे मुखपृष्ठ आम्ही या लेखा सोबत छापले असून आमच्या वाचकांना ते मोठे संग्राह्य पुन्हा पुन्हा पहावेसे असेच वाटेल. या पहिल्या अंकावर किंमत छापलेली नव्हती पण मासिकाची संकल्पित वार्षिक वर्गणी अवघी तीन रुपये सहा आणे टपाल खर्चासहीत होती. हा पहिला अंक सर्वसाधारणपणे त्याकाळी माहित असलेल्या साईभक्तांना नमुना अंक म्हणून विनामूल्य पाठविण्यात आला होता व त्यांना वर्गणीदार होण्याची विनंती करण्यात आली होती. तसेच पुढील अंक व्ही.पी. ने रवाना होतील असे कळविण्यात आले होते. ह.भ.प. श्री. लक्ष्मण गणेश उर्फ काकासाहेब महाजनी यांचे नाव या अंकावर पहिले संपादक म्हणून छापलेले असून ह.भ.प. श्री. रामचंद्र आत्माराम उर्फ बाबासाहेब तर्खड यांनी ५, टर्नर रोड, वांद्रे येथून तो प्रकाशित केला होता.

श्रीसाईलीलांचे
पहिले भाग्यवान
संपादक
ह.भ.प. लक्ष्मण गणेश
उर्फ काकासाहेब महाजनी

श्री साईलीला मासिक काढण्याचा त्यावेळी उद्देश काय होता हे समजून घेण्यासाठी श्री साईलीला मासिकाच्या प्रथमांकाकडे दृष्टीक्षेप करणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी त्या अंकातील श्री महाजनींचे पहिले संपादकीय पुढे उद्धृत करीत आहोत.

# श्रीसाईलीला मासिक

## वर्ष १ चैत्र शके १८४५ (१९२३) अंक पहिला

''या मासिक पुस्तकाचा उद्देश त्याच्या नावावरून व्यक्त होत आहे. शिर्डीचे श्री साई महाराजांचे भक्त असंख्य असून ते ठिकठिकाणी पसरले आहेत. त्यांना निरनिराळ्या वेळी निरनिराळ्या तऱ्हेचे अनुभव महाराजांनी आपल्या देहावसानानंतर सुद्धा अनुभव देण्याचे चालू ठेवले आहे. किंबहुना ज्यांना महाराजांच्या देहाचे प्रत्यक्ष दर्शन घडले नाही त्यांनासुद्धा अनुभव येत आहेत. थोडक्यात म्हणावयाचे म्हणजे महाराजांचे अनुभव अश्रुतपूर्व, अतर्क्य आणि अनेक आहेत व त्यांच्या अष्टकातील खालील श्लोकांची सत्यता सर्वांना पटवीत चालले आहेत —

अनेका श्रुतातर्क्य लीलाविलासः।
समाविष्कृतेशा न भास्वत् प्रभावम्।।
अहं भावहीनो प्रसन्नात्मभावम्।
नामामीश्वरं सद्गुरुं साईनाथम्।। १।।

महाराजांच्या सर्व लीलांचा एके ठिकाणी संग्रह होणे शक्य नाही. पण शक्य असेल तेवढा त्यांच्या लीलांचा व त्यांच्या अमूल्य बोध वचनांचा संग्रह करावा, या हेतूने हे मासिक पुस्तक काढले आहे. भावार्थ रामायणात श्रीरामचंद्राला पार्वतीने 'तू सर्वज्ञ असताना भ्रांतपणाचे अवलंबन करून तृणापाषाणांना आलिंगन का देतोस?' असा प्रश्न केला असता श्रीरामचंद्रांनी जे शब्द उच्चारले आहेत तेच महाराजांना लागू आहेत. श्रीरामचंद्र म्हणाले —

भक्त उद्धारावया कारणे। रडणे पडणे अडखळणे।
पर्वतों पर्वती धावणे। आणि आलिंगणे वृक्षासी।।
उमे जाण तू निश्चित। माझे पाऊल न पडे व्यर्थ।
जाणे सदाशिव समर्थ। तुझा भावार्थ तो नाही।।

हे शब्द सर्वस्वी महाराजांस लागू आहेत. त्यांचा एकूण एक शब्द व एकूण एक लीला केवळ भक्तांच्या उद्धारासाठी होती, व त्यांचे एक पाऊलसुद्धा व्यर्थ पडत नव्हते. म्हणून त्या लीलांचा व शब्दांचा संग्रह भक्तांनाच नव्हे तर सर्व जनतेला हितकारी होईल अशी आमची खात्री आहे.

असा संग्रह करण्याचा थोडासा प्रयत्न झाला आहे व तो या मासिकात 'महाराजांचे अनुभव' व 'श्रीसाईसच्चरित' या मथळ्याखाली येईल. यापैकी श्रीसाई सच्चरित पद्यात्मक

श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक

वर्ष १ले) चैत्र शके १८४५ (अंक १ ला

नलिनीदलगत जलमतितरलम्। तद्वज्जीवनमतिशय चपलम्।।



क्षणमपि सज्जन संगतिरेका। भवति भवार्णव तरणे नौका।।

श्री शंकराचार्य.

संपादक:– लक्ष्मण गणेश महाजनी
प्रकाशक:– रामचंद्र आत्माराम तर्खड
श्री साईलीला कचेरी ५ टर्नर रोड, बांद्रे, बी. बी. रेल्वे.


म्हणजे ओवीबद्ध रचले गेले आहे, व त्याची म्हणजे श्रीसाईसच्चरिताची सुरुवात महाराज देहधारी असतांना त्यांची आज्ञा घेऊन झाली होती. 'महाराजांचे अनुभव' या मथळ्याखाली निरनिराळ्या भक्तांकडून जे अनुभव लिहून येतील त्यांचा संग्रह करण्याचे योजिले आहे. असे बरेचसे अनुभव आमच्या संग्रहात आज आहेत ते या मथळ्याखाली छापले जातील. त्यात काही चुका असल्यास त्या त्या भक्ताकडून दुरुस्ती लिहून आल्यास आम्ही आनंदाने प्रसिद्ध करू तसेच महाराजांचे भक्ताकडून जे जे अनुभव लिहून येतील त्यालाही सवडीप्रमाणे शक्य तितके स्थळ या मासिकात देऊ भक्तांचे अनुभव छापण्यासाठीच हे मासिक असल्यामुळे जे अनुभव लिहून येतील तिकडे पूर्ण लक्ष दिले जाईल हे सांगणे नकोच.

समर्थांनी कोणास काही गुप्त रीतीने सांगितले असेल तर ते या ग्रंथात परिस्फुट होण्याचा संभव नाही. पण त्यांनी उघडे दरबारात सर्वासमक्ष कोणा एकास उद्देशून जरी काही सांगितले असले तरी ते सर्वांच्या हिताचे असल्यामुळे ते सर्वांची सामाईक कमाई आहे, असे सर्व साईभक्त समजत असले पाहिजेत अशी समजूत आहे आणि म्हणूनच त्यांनी आपले अनुभव लिहून पाठवावे अशी आमची प्रत्येक भक्तास आग्रहाची विनंती आहे.


सारांश, ही सरस्वतीची सेवा आणि ती परम दयाळू श्री साईमाऊलीचे इच्छेने आणि आशिर्वादाने घडत आहे. अर्थात त्या माऊलीची आपल्या भक्तांना वेळोवेळी आठवण होत रहावी हेच या सेवेचे ध्येय आहे.''

वर उद्धृत केलेल्या संपादकीयावरून असे दिसून येईल की साईलीला मासिक चालू करण्याचे त्यावेळी मुख्य दोन उद्देश होते. एक म्हणजे अण्णासाहेबांनी लिहिलेले साईच्चरित क्रमशः प्रसिद्ध करणे व श्रीबाबांच्या संबंधीचे भक्तांचे अनुभव प्रसिद्ध करणे. ह्यापैकी साईच्चरित प्रस्तुत मासिकात क्रमशः प्रसिद्ध होऊन आता ते ग्रंथरूपाने मिळते तेव्हा तो उद्देश केव्हाच सफल झालेला आहे. भक्तांच्या अनुभवाबद्दल त्यावेळचे संपादक म्हणतात, 'भक्तांचे अनुभव छापण्यासाठीच हे मासिक असल्यामुळे जे अनुभव लिहून येतील तिकडे पूर्ण लक्ष दिले जाईल हे सांगणे नकोच.' श्री साईलीला मासिकाचे जे आजचे वाचक आहेत त्यांच्या हे सहज लक्षात येईल की पहिल्या संपादकांचे आश्वासन आजतागायत संपूर्णपणे पाळले जात आहे. साईभक्तीच्या प्रसारामुळे भक्त वाढत आहेत व त्यांचे अनुभवही विविध आहेत तेव्हा त्यांना प्रसिद्धी मिळणे अत्यंत आवश्यक बाब आहे. तेव्हा भक्तांची ही अपेक्षा हे मासिक संपूर्णपणे पुरी करते हे ह्या मासिकाचे वैशिष्टय होय. श्री साईसच्चरिताच्या आजवर १३ आवृत्या निघालेल्या आहेत. श्रीसाईलीलाचे सुरुवातीपासूनचे संपादक पुढीलप्रमाणे —

| | |
|---|---|
| १) श्री. लक्ष्मण गणेश उर्फ काकासाहेब महाजनी | इ.स. १९२३ |
| २) श्री. रामचंद्र उर्फ बाबासाहेब तर्खड | -''- १९२३ |
| ३) श्री. रामचंद्र रामकृष्ण सामंत | १९२३ ते १९३७ |
| ४) श्री. रामचंद्र वासुदेव घैसास | १९३७ ते १९४१ |



डॉ. केशव भगवंत गव्हाणकर



श्री. नागेश आत्माराम सावंत

५) श्री. श्रीधर नारायण खारकर १९४१ ते १९४३

१९४४ ते १९४७ हा काळ हे मासिक बंद होते.

६) डॉ. केशव भगवंत उर्फ अण्णासाहेब गव्हाणकर १९४७ ते १९५३

७) श्री. नागेशराव आत्माराम सावंत १९५३ ते १९६०

१९६० साली शिर्डी संस्थानसाठी प्रथमतः कोर्ट रिसीव्हर (न्यायालयधारक) नेमण्यात आले तेव्हापासून पुढील कोर्ट रिसीव्हरनी संस्थानचा कारभार पाहिला.

१) श्री. गोपाळ विनायक क्षीरसागर नोव्हेंबर १९६० ते नोव्हेंबर १९६२

२) श्री. श्रीपाद बाळकृष्ण दर्प डिसेंबर १९६२ ते नोव्हेंबर १९६४

३) श्री. भालचंद्र गणेश पोतनीस डिसेंबर १९६४ ते जून १९६७

४) श्री. दत्तात्रय दिनकर पाटणकर जुलै १९६७ ते नोव्हेंबर १९७०

५) श्री. काशिनाथ सीताराम पाठक डिसेंबर १९७० ते एप्रिल १९७८

६) श्री. कन्हैयालाल हिरालाल काकरे मे १९७८ ते जुलै १९८४

श्रीसाईलीला मासिकाचे महत्व ओळखून वरील सर्व रिसीव्हरसाहेबांनी ते अव्याहतपणे चालू ठेवले व त्याच्या प्रकाशनासाठी लागणारे आर्थिक सहाय्य सतत संस्थानच्या पैशातूनच चालू ठेवले. कोर्ट रिसीव्हर ह्यांना संस्थानच्या कार्यालयाचे काम भरपूर असते त्यामुळे त्यांना मासिकाच्या संपादनाकडे लक्ष पुरविणे शक्य होत नाही. म्हणून १९३२ पासून साठ पर्यंत प्रत्यक्ष संपादकाचे नाव मासिकावर छापून येत असे त्याऐवजी १९६० पासून मुख्य संपादक म्हणून रिसीव्हरसाहेबांचे नाव छापले जात असले तरी प्रत्यक्षात हे काम कोणीतरी कार्यकारी संपादक नेमूनच करून घेण्यात येते. १९६० सालापासून ह्या मासिकाला श्री. द. पां. खांबेटे, श्री. अप्पा कुलकर्णी, श्री. घैसास, प्रा. डी. डी.

परचुरे, डॉ. एस्. डी. परचुरे इ. कार्यक्षम असे कार्यकारी संपादक मिळत गेल्यामुळे ह्या मासिकाची वाटचाल उत्तरोत्तर प्रगतीपथावर होत आली आहे.

मासिकाच्या अंतरंगासंबंधी या ठिकाणी थोडेफार लिहिणे अप्रस्तुत होणार नाही. अगदी सुरुवातीस हे मासिक संपूर्णतया मराठीत प्रसिद्ध होत असे. पुढे यशावकाश त्यात हिंदी व इंग्रजी लेखांचीही भर घालण्यात आली; परंतु जसजसे लेखक वाढू लागले तसतसे हे मासिक त्या सर्वांचे लेख सामावून घेण्यास असमर्थ ठरू लागले. म्हणून १९७३ साली ह्या मासिकाच्या दोन आवृत्या निघू लागल्या त्यापैकी एक संपूर्ण मराठी व दुसरी इंग्रजी व हिंदी लेखांची. ह्या वेळेपासून मासिकाची प्रगती झपाट्याने होऊ लागली व एप्रिल १९७३ ला जेवढे अंक निघत होते त्याच्या दहा पटीहून अधिक अंक आज निघत आहेत, आणि जो जो बाबांच्या भक्तीचा प्रचार वाढत आहे तो तो ही अंकांची वाढ सतत चालूच राहणार आहे यात शंकाच नाही.

१९७३ साली अंकात केवळ ४८ पानेच असत व वार्षिक वर्गणी केवळ सहा रुपयेच होती, पण १९८० सालच्या एप्रिलपासून मासिकाची पृष्ठसंख्या ४८ वरून ६४ वर नेण्यात आली व वार्षिक वर्गणीत अपरिहार्य अशी थोडी वाढ करून ती दहा रुपये करण्यात आली. अर्थात बाजारात मिळणाऱ्या अन्य मासिकाच्या मानाने ही वर्गणी पुष्कळच कमी आहे; परंतु बाबांच्या भक्तीचा प्रचार हेच मासिकाचे ध्येय असल्यामुळे ही अल्प वर्गणी अशीच पुढे चालू राहील.

१९७५ सालापासून मासिकात लिहिणाऱ्या कवी व लेखकांचे एक संमेलन प्रतिवर्षी शिर्डीस भरत असते. त्यात होणाऱ्या विचारविनिमयामुळे मासिकात सुधारणा करणे व त्याचा दर्जा वाढविणे ही दोन कामे अधिक जोमाने हाती घेतली जातात. ह्या दोनही आवृत्यांच्या वाचकांकडून जी पत्रे संपादकांकडे येत असतात त्यावरून प्रस्तुत मासिकाचा दर्जा फार वरचा आहे, असे म्हटल्यास त्यात अतिशयोक्ति आहे असे मुळीच नाही. यंदा लेखक-कवींचे १२ वें संमेलन पार, पडले.

मासिक चालविणे हे एका माणसाचे काम नाही. लेखकांनी लेख पाठविले पाहिजेत. भक्तांनी मोठ्या प्रमाणावर वर्गणीदार झाले पाहिजे, संपादकांनी सर्व मजकूर वेळेवर छापखान्यात पाठविला पाहिजे म्हणजे मासिक वेळेवर निघते व वाचकांना ते वेळेवर पोचते. प्रस्तुत मासिकाची वाट कित्येक भक्त किती आतुरतेने पहात असतात हे त्यांच्या बोलण्यावरून वारंवार स्पष्ट होते. तेव्हा साईबाबांचा ज्या ह्या मासिकास संपूर्ण आशीर्वाद आहे ते हे मासिक श्री साईभक्तांच्या सेवेसाठी सतत प्रसिद्ध करण्याचे आश्वासन वरील सर्वांच्या सहकार्याने व साईबाबांच्या आशीर्वादाने आम्ही ह्या ठिकाणी देत आहोत व ही सेवा बाबांनी आमच्याकडून सतत करून घ्यावी अशी त्यांच्या चरणी मनःपूर्वक प्रार्थना करीत आहोत.

पण आता भक्तांनी पाठविलेले सर्वच सामान्य अनुभव प्रसिद्ध करणे शक्य होणार नाही. काही ज्वलंत, प्रखर अनुभव असतील तरच ते प्रसिद्ध करणे यापुढे शक्य होईल.

सर्वसामान्य अनुभवांना तसेच बाबांना नवस केला तो सफल झाला म्हणून त्यांना म्हटल्याप्रमाणे हा लेख पाठवित आहेत. अशा विनंती लेखांना यापुढे या मासिकातून स्थान देणे शक्य होणार नाही.

१ सप्टेंबर १९८४ पासून श्रीसाईबाबा संस्थानच्या कारभारावर श्री. पी. के. सावंत साहेब यांच्या अध्यक्षतेखाली एक विश्वस्त मंडळ नेमण्यात आले व तेच आज सर्व प्रशासनावर देखरेख करीत आहे. संस्थानसाठी कार्यकारी अधिकारी म्हणून श्री. राजाराम दत्तात्रय बन्ने यांना १ ऑगस्ट १९८४ रोजी नियुक्त करण्यात आले असून श्रीसाईलीलाचे मुख्य संपादक ते आहेत. प्रकाशन विभागाचे कार्याध्यक्ष श्री. विश्वासराव खेर हे आहेत.

१ जुलै १९८५ पासून इंग्रजी-हिंदी श्रीसाईलीला आवृत्तीच्या का. संपादिका म्हणून प्रा. डॉ. सौ. इंदिराताई खेर या काम पहात असतात.

१ जुलै १९८५ पासून या मासिकाच्या दोन्ही आवृत्यांची छपाई ऑफसेट या अत्याधुनिक पद्धतीने होऊ लागली आहे. त्यामुळे आतील मजकूरांची सुंदर छपाई व मुखपृष्ठावरील छायाचित्रे सजावट इत्यादी मध्ये विलक्षण आकर्षकता दिसून येऊ लागली आहे, व या सर्वांचे वाचक भक्त मंडळीने स्वागतच केले आहे.

**भगवान श्रीसाईबाबांचे भक्तांना तसेच श्रीसाईलीलाच्या असंख्य वाचकांना शुभाशिष**

**— साईनंद**

# भक्तीची प्रेमगाथा

भक्तीची प्रेमगाथा फुलवी श्रीसाईनाथ।
श्रीसाईनाथा हाती आहे गाथेतील ज्ञानज्योत॥

या ज्ञानातून सदैव स्त्रवे अमृताचा वर्षाव।
वर्षाव घाली न्हावू त्यात असे कृपाभाव॥

या कृपेतुन फुले जणु जीवन संगीत।
संगीताचे सूर छेडी तोचि शिरडीत॥

शिर्डी नव्हे ही जणू मोक्षधाम।
या धामातच जाणून घेऊ अपुला साईराम॥

राम असो वा शाम सोडू द्वैत भाव।
भाव तेथे देव असता लागे किनारी नाव॥

या नावेचा सुकाणु असे शिरडीत साईबाबा।
साईबाबांचा महिमा अगाध उजळो ज्ञान प्रभा॥

**— बबन डी. येरम,** बी.कॉम
१/५, कल्याणजी देवजी चाळ,
चिरागनगर, घाटकोपर मुंबई-८६

# भक्ताकडे श्रीबाबांचे मागणे

— श्री. चकोर आजगांवकर, एम.ए.
(उपसचिव अर्थखाते, महाराष्ट्र शासन)
वाय ११/१७० सरकारी वसाहत, वांद्रे (पूर्व)
मुंबई : ८१.

## बाबांचे जीवन व संदेश

श्री साईबाबंवर श्रद्धा असलेली माणसे विविध मतांची, पंथाची व प्रवृत्तीची असल्याने त्यांचा बाबांकडे पहाण्याच्या दृष्टिकोनास वेगवेगळ्या दिशा प्राप्त झाल्या आहेत. पुष्कळाना बाबा हे संकटकाली मागितलेली गोष्ट देणारे आहेत, एवढेच माहीत असते. त्यामुळे त्यांच्याकडे नवस करणे व त्या नवसाची यथाशक्ती फेड करणे हीच इतिकर्तव्यता ते मानीत असतात. बाबांच्या वचनांचा, कृतीचा व संतपदाचा महान् अर्थ व त्यांच्या जीवनाचा संदेश त्याना मुळीच समजलेला नसतो.

## करुणामूर्ति साई

श्रीबाबा हे दुःखावर दिलासा देणारे, संकटकाली मदतीचा हात देणारे व भक्तावर प्रेम करणारे करुणामूर्ति व उदार दाते आहेत, यांत मुळीच शंका नाही. त्यांच्या सार्वत्रिक लोकमान्यतेचे रहस्य या त्यांच्या थोरवीत आहे, हे त्रिकालाबाधित सत्य आहे. तसे नसते, तर कुणीही आर्त अर्थार्थी भक्त त्यांच्यापाशी आलाच नसता. कर्माच्या कठोर कायद्यातून बाबा **श्रद्धा** (प्रेमयुक्त विश्वास) व **सबुरी** (दृढ विवेकी सहनशीलता आणि तितीक्षा) बाळगणाऱ्या भक्ताला त्याच्याबद्दल थोडेफार सौम्य धोरण स्वीकारुन सोडवितात. इतर काही संताप्रमाणे कर्माबाबत बाबांचा दृष्टिकोन कठोर नसतो. श्रद्धावंत साधकांसाठी ते कर्मभोगातून अल्पशी सूट देण्यासाठी आपली स्वतःची पुण्याई व शक्ती वापरावयास मागे पुढे पहात नाहीत.

## बाबांची कर्मसाधना

तथापि त्या मदतीमागे त्यांची भक्ताकडून अपेक्षा असते की त्याने आपली जुनी स्वभावरचना, जीवनपद्धती व आकुंचित विचारसरणी सोडून त्यागमय व समर्पणात्मक जीवन जगावे. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे बाबा त्यागाची व सेवेची शिकवण देतात. तो त्यांचा कर्मयोग आहे. या कर्मयोगात बाबा मन 'स्व' व 'स्वार्थ' याच्या परीघातून भक्ताना बाहेर काढून निस्वार्थ व परोपकारी जीवन जगावयास व निष्काम कर्मे करावयास सांगतात. मनाला शांती देणारा व समाजाची धारणा करणारा हा बाबांचा कर्मयोगी धर्म आहे. बाबांचे स्वतःचे जीवन या कर्मयोगाचे, सेवायोगाचे व त्यागाचे मूर्तिमंत प्रात्यक्षिक आहे. भक्तांनी याचे आचरण अंशतः तरी करावयास हवे, **हे बाबांचे मागणे आहे.**

## बाबांची भक्तिसाधना

बाबांच्या शिकवणीचे दुसरे तत्व श्रद्धायुक्त भक्ति यात भगवंताचे प्रेम आहे, त्यावर

दृढनिष्ठा आहे. त्याला स्मरून आचरण करण्याची प्रेरणा आहे. प्रत्येक कर्माचे पुष्प भगवंताच्या चरणी समर्पण करण्याचा बाबांचा प्रेमयुक्त समर्पण व शरणागतीचा भक्तियोग आहे. यात कर्मयोग व भक्तियोग याचे सुंदर मिश्रण आहे. भक्तियुक्त कर्माचा सुंदर संगम आहे. **साई चरणावर प्रत्येक विचार विकार कर्माची फुले वहा, असे बाबांचे मागणे आहे.**

**बाबांची ज्ञानसाधना**

श्रीबाबांच्या शिकवणीची तिसरी दिशा कणाकणात साईरुप भगवंत भरलेला आहे. प्रत्येकाच्या हृदयात साई आहे अशी ज्ञानात्मक बैठक तयार करण्याचा आहे. बाबांचा हा वासुदेवात्मक जगताचा ज्ञानयोग आहे. सर्वत्र साई पहावा, सर्व कर्मे त्याला अर्पण करावी व सर्व वृत्ती नि विकार यांची दिशा साई पदावर केंद्रीत करावी, ही बाबांची ज्ञानात्मक शिकवण आहे. **जगात व हृदयात खेळणारा भगवंत सतत पहा, असे बाबांचे भक्ताकडे मागणे आहे.**

**बाबांचा स्मरणयोग**

नामस्मरण व ध्यान ही साईच्या शिकवणीची अत्युच्च पायरी आहे. प्रगल्भ भक्तांना त्यांनी केवळ श्रद्धा सबुरी व समर्पण एवढ्याच पायऱ्या दाखविल्या नाहीत; तर अखंड नामस्मरण शिकविले आहे. या स्मरणात नाम व रुप या दोघांचा अंतर्भाव होतो. नाम म्हणजे नाम संकीर्तन व रुप म्हणजे स्वरुपानुसंधान होय. **अखंड स्वरुपानुसंधान करा असे बाबांचे भक्ताकडे मागणे आहे.**

श्री साई भक्तानी केवळ हार फुले, नवस, प्रसाद, अभिषेक व आरती एवढ्यावरच संतुष्ट न रहाता बाबांची कर्म, भक्ति, ज्ञान व साधनरुप शिकवण आचरावी व खरेखुरे भक्त व्हावे, हीच कळकळीची प्रार्थना! **हे बाबांचे भक्ताकडे मागणे आहे, मनबुद्धी, कर्मे व आत्मा या चारी पातळीवर साईकडे सतत अवधान ठेवा, असे बाबांचे सर्वांना सर्वकालिक सांगणे आहे.**

# शिरडीचे रामायणाशी नाते!

**— श्री. बाळासाहेब शांताराम नाडकर्णी**
सी/१४११ लक्ष्मीपुरी,
कोल्हापूर.

परमेश्वराचे अवतार पूर्वनियोजित असतात! श्री साईबाबांचा अवतार हा त्यापैकीच एक आहे!

हा महाराष्ट्र म्हणजे पूर्वीच्या त्रेता युगातील दंडकारण्य हे होय! येथे प्रभू रामचंद्राचा वनवास उदास निरीच्छ मनस्थितीत गेला होता! सीतामाईंच्या वियोगात पंचवटी नंतर ते या शिरडीत आले असावेत! आजचे द्वारकामाईतील श्री बाबांचे शिळा-सिंहासन त्या

वेळचीच ती एक शिळा असावी की सीतामाईच्या वियोगात शोकाकूल प्रभू थकलेल्या शरीर मनाने क्षणभर का होईना, ज्यावर बसले असावेत! काळ युगानयुग येऊन गेला पण प्रभूंच्या पावन स्पर्शाने त्या शिळेला लाभलेले भाग्य तो पुसू शकला नाही! हेच भाग्य आज श्री साई अवताराने उजळून निघत आहे! एका शिळेकडे प्रभू रामांचे चरण पतित पावन कार्याकडे ओढले गेले, म्हणून आंहल्येचा उद्धार झाला! त्याच प्रभूचे वनवासात दुसऱ्या एका शिळेने विश्रांती देऊन श्रम-परिहार केला आणि म्हणूनच की काय या शिळेच्या उतराईसाठी श्री साईरामांनी या शिरडी स्थानाला आधुनिक तीर्थ-क्षेत्राचे भाग्य आणून दिले आहे!

श्री साईबाबांना अत्री-अनुसयानंदन दत्तात्रेयांचा अवतार पुष्कळ लोक समजतात. असेल ही! परंतु इथे श्री साईबाबा प्रभू रामचंद्राच्या वनवासी-विरही, दुःखी व उदासी वृत्तीचे फकीर रुप धारण केलेले त्यागी जानकी जीवनच आहेत! अवतार समाप्तीच्या वेळी प्रभू रामचंद्रांनी किडा मुंगीपासून संपूर्ण अयोध्यावासीयांचा स्वर्गी नेऊन उद्धार केला! आज तसेच उद्धार कार्य शिरडीत श्री साईबाबा करत आहेत! "प्रजा हीच कोटी रुपे मला ईश्वराची!" असे म्हणणाऱ्या प्रजा हीतदक्ष-प्रतीपालन करणाऱ्या प्रभू रामांच्या प्रमाणे श्री साईबाबा पण आपल्या अपत्याप्रमाणे भक्तांची देखभाल दक्षतेने करण्यात तत्पर असतात! आपल्या उत्सवाचा दिवस रामनवमी नेमून असेच काही आगळे रहस्य बाबांनी या मागे ठेवले असावे!

"मी येथे आठ दहा हजार वर्षांपूर्वी होतोच होतो!" या श्री साईलीलेच्या आपल्या पान २८ ऑगस्ट १९८५ च्या अंकात प्रसिद्ध झालेल्या श्री. खापर्डे यांच्या डायरीतील श्री साई उद्‌गाराने या विषयाला दुजोरा मिळतो! यावरुन शिरडीचे नाते त्रेतायुगातील रामायण घटनांशी होते, हे सिद्ध होते!

असे रहस्य श्री साईबाबांनी आपल्या मन बुद्धीला पटवून दिल्याशिवाय समजणेही कठीण आहे. श्री रामांचा आदर्श प्रत्येकाने स्वतःच्या जीवनात उतरवला पाहिजे. "राम रहिम एक है।" धर्म जातीतील मतभेद दूर करण्यासाठी बाबांनी एक प्रकारे हा मंत्रच दिला आहे, व यातच आपल्या धर्म देशाची ऐक्यता साधत आहे!

या दंडकारण्यात प्रभू रामचंद्रानी १४ सहस्त्र राक्षस ठार मारलेत. आज ते राक्षस नसले तरी त्या राक्षसी प्रवृत्ति आपल्यापुढे "आँ" करून गिळण्यास उभ्या आहेत! त्यावर जर जय मिळवायचा असेल तर त्याला रामाचाच बाण पाहिजे!

श्रीरामांनी भावा-भावातील मतभेद दूर केले! आई वडिलांची आज्ञा शिरसावंद्य मानली! भावासाठी राज्य सोडले; वनवास पत्करला! संशयी जनतेसाठी प्रिय पत्नीचा त्यागही केला! राज ऐश्वर्याच्या नंदनवनात हा सार्वभौम्य रामराजा वैयक्तीक जीवनात न्यायच नव्हे तर कर्तव्य निष्ठूरपणे दयाशांतीच्या मार्गाने मन निरीच्छ त्यागीयोगी फकीराप्रमाणे ठेऊन प्रजापालन करीत होता!

सर्व सद्‌गुण व सदाचाराचा समुच्चय म्हणजे श्री राम! त्यांचा आपण आदर्श म्हणून उचललाच पाहिजे! ही आठवण करून देण्यासाठीच तर दरवर्षी रामनवमी येत असते!

मन वाचेने या राम नामाचा जप केला तर एक लूटारु जगतवंद्य थोर महर्षि बनतो, तर तुमच्या आमच्या सारखा सामान्य नर कां मग वाया जातो? म्हणूनच श्री साईबाबांनी आपल्याला राम नामाचे स्मरण करून जीवन धन्यतेचा मार्ग उपलब्ध करून दिला आहे!

-:— जय साई राम —:-

# शिरडीचे साईराजे

**श्री. विश्वनाथ सदाशिव चव्हाण**
कमल निवास, क्वॉरी रोड
भांडूप (पश्चिम)
मुंबई- ४०० ०७८.

भारतामध्ये अनेक मोठमोठे राजे होऊन गेले. त्यांनी आपल्या अतुलनीय पराक्रमाने, शौर्याने, आपली किर्ती प्रस्थापित केली, आपलं नाव अजरामर करून गेले. सम्राट अशोकसारखा पराक्रमी चक्रवर्ती झाला. चंद्रगुप्त मौर्य, सम्राट हर्षवर्धन, पौरस, राणा प्रताप, गोब्राम्हण प्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासारखे, त्याशिवाय अनेक मुस्लीम राजे झाले की, त्यांनी भारतावर साम्राज्य केलं. भारताबाहेरही अनेक झाले. जगज्जेता सिकंदर! अलिकडच्या दुसऱ्या महायुद्धापर्यंत तर नेपोलियन व हिटलर यांचीही नांवे घेता येतील . या सगळ्यां शिवाय न भूतो न भविष्यती असे थोर सम्राट झाले! शिरडीचे साईराजे!! शिरडीचे साईसम्राट!!!

हे शिरडीचे राजे आले कुठून कुणास ठाऊक. त्यांच्या ना आईवडिलांचा ठावठिकाणा ना जातपातीचा! कोवळ्या वयांत लग्नाच्या वऱ्हाडातून आले आणि शिरडीत येऊन स्थायिक झाले. शिरडी हेच त्यांचं छोटसं राज्य, आणि त्या राज्याचे ते अल्पावधीत राजे झाले! राजांना बसावयाला रत्नजडित सिंहासन नव्हतं तर एकाद्या कुठल्याही दगडावर ते बसत. त्यांच्यासाठी तेच रत्नजडित सिंहासन होतं. राजांच्या गळ्यात हिऱ्यामोत्यांचे, पाचूचे हार नव्हते की, अंगावर भरजरी वस्त्रेही नव्हती! फाटलेला भगवा अंगरखा व डोक्याला भगवा रूमाल हेच त्यांचे भरजरी वस्त्र. राजांच्या पायात मऊ चपला नव्हत्या, अनवाणी पायाने चालायचं हाच त्यांचा पायंडा! एकाद्या सम्राटाप्रमाणे कंबरेला पाचूच्या म्यानात तलवार लटकत नव्हती तर त्या ठिकाणी त्यांच्या हातात चिमटा व सोटा होता. तीच त्यांची शस्त्रं!

राजांकडे ऐश्वर्याने भरलेला राजदरबार नव्हता, तर पडकी मशिद हाच त्यांचा दरबार! एकाद्या सम्राटाप्रमाणे त्यांच्या दरबारी नऊ रत्नं नव्हती पण कांही ठराविक मनुष्यरूपी रत्नं त्यांच्या चावडी दरबारी हजर होती, आणि त्या मनुष्यरूपी रत्नांच्या जोरावर व आपल्या दिव्य शक्तीच्या जोरावर ते राज्य करीत होते. पंचपक्वान्नाची ताटं झिडकारून कांदाभाकर आवडीने खात होते व आपल्याबरोबर मुक्या प्राण्यानांही भरवित होते. कधी कुणाचा द्वेष करीत नव्हते की, कधी कुणाची निंदा करीत नव्हते! जे आपल्या जवळ

आहे ते दुसऱ्याला देणं हा त्यांचा धर्म होता.

असे हे छोट्याशा शिरडी राज्याचे राजे अल्पावधीत लोकप्रिय झाले, साऱ्या भारतभर त्यांच्या नावांचा जयजयकार होऊ लागला! त्यांच्या दर्शनासाठी दूरदूरचे लोक येऊ लागले. आपल्या अंतकरणातील दुःखे त्यांना सांगू लागले. आपल्या अडीअडचणी, संकटे सांगू लागले! त्या सगळ्यांवर मात करण्यासाठी शिरडीच्या राजांकडे एकच प्रभावी अस्त्र होतं. ते म्हणजे उदी! त्या अस्त्राच्या जोरावर राजे सगळ्यांची सुटका करीत होते, सगळ्यांची दुःखे निवारण करीत होते, आणि म्हणूनच की काय ते सगळ्यांच्या हृदयात विराजमान झाले होते. आपल्या राज्यावर येणाऱ्या संकटाची चाहुल त्यांना आधीच लागत होती आणि त्याचं ते स्वतःच्या दिव्य शक्तीने निवारण करीत होते!

साऱ्या जगातील मोठमोठे सम्राट, चक्रवर्ती शेवटी मरून गेले पण शिरडीचे साईराजे अजरामर झाले. इतर राजांप्रमाणे मारले गेले नाहीत की मेले नाहीत! त्यांनी जीवंत चिरनिद्रा घेतली!! आणि म्हणूनच ते चक्रवर्ती सम्राट झाले!!! एकाद्या सम्राटाची कबर बांधली गेली असेल किंवा त्याच्या आठवणीने एक वास्तू उभारली गेली असेल शेवटी ती इतिहास जमाही झाली असेल. पण ह्या राजांची किर्ती आज पर्यंत साऱ्या जगात होत आहे. असा कुठला सम्राट व चक्रवर्ती आहे की, मेल्यावरही आपल्या माणसांसाठी धावून येणारा? आहे! या पृथ्वीतलावर असा एक सम्राट आहे की, जो आपलं शरीर सोडून गेला, त्याचा देह निर्जीव झाला तरीही भक्तांनी हांक मारल्यास त्यांच्या हाकेला धावून येतो शिरडीचा साईसम्राट!

अशा ह्या राजाची किती थोरवी गाऊ? किती स्तुती करू? आमची लेखणी त्यांची काय स्तुती करणार? लेखणीतील शाई संपून जाईल, लिहून लिहून हात थकून जाईल पण या राजांची थोरवी कमी होणार नाही! या राजांचा आजही शिरीडी दरबार लोकांना न्याय देण्यासाठी सज्ज आहे. जातीपातीचे कसलेही तिथे बंधन नाही. शिरडी दरबार पहाटे ५-०० ला उघडला जातो तो रात्री १०-३० वाजेपर्यंत उघडा असतो. या कालावधीत सर्वजण आपआपली दुःखे राजांना सांगतात, राजांना भक्तीभावाने हाक मारतात. आपल्या आवडत्या राजाचं डोळे भरुन दर्शन घेतात, आणि राजा त्यांची ती आर्त हाक ऐकून त्यांच्या मदतीला धावून जातात!

असं हे राजांचं शिरडी राज्य, राजांचा शिरडी दरबार याची ख्याती आज जगाच्या कानाकोपऱ्यात पसरली आहे. परदेशातील लोक या भारताच्या सम्राटाचं दर्शन घेण्यासाठी आजही मोठ्या उत्साहाने येतात. त्यांच्या दारी नसे भेदभाव हा कसला! राजे आपल्याला सोडून गेले असले तरी ते आपल्या भोवती वास्तव्य करीत आहेत. त्यांच सांगणं आहे की , जरी हे शरीर गेलो मी टाकून तरी मी धावेन भक्तांसाठी! नवसास माझी पावेल समाधी, धरा दृढ बुद्धी माझ्या ठायी! नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य, नित्य घ्या प्रचीती अनुभवे! अशा ह्या चक्रवर्ती सम्राटाला आमचे त्रिवार वंदन! करीतो मानाचा मुजरा पहिला!

अनंत कोटी ब्रह्मांड नायक, परब्रम्ह राजाधीराज योगीराज श्री सच्चिदानंद सद्गुरू साईनाथ महाराज की जय!!

# श्री. खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी

**अनुवाद - साईनंद**



सोमवार दिनांक ११-१२-१९११

आज सकाळची प्रार्थना अतिशय छान-झाली. त्या प्रार्थने नंतर मी खूपच भारावून गेलो, उल्हासित झालो. नंतर मी दत्तात्रय चिटणीस यांना पहिल्या पंचदशीतील काही ओव्यांचे स्पष्टीकरण करण्यासाठी बसलो. ते खरोखरीच एक चांगले सद्गृहस्थ आहेत. नंतर आम्ही दोघही श्री साई महाराजांच्या दर्शनास गेलो. महाराजांना आम्ही बाहेर जाताना पाहिले आणि बाहेरून परत येतानाही बघितले. महाराजांनी आज मला वारंवार चिलीम दिली. नंतर त्यांनी मला राधाकृष्णामाईनी पाठविलेली द्राक्षेही दिली. माझा मुलगा बळवंत याला तर त्यांनी आज दोनदा द्राक्षे दिली. आज दुपारी महाराज मशिद स्वच्छ साफसूफ करण्यात गुंतले आहेत असे कळले. म्हून मी त्या बाजूला जाण्याचा प्रयत्न केला नाही. प्लेगच्या उदभवलेल्या साथीचे निर्मूलन, बाबांनी आता करावे यासाठी शिरडीतील गावकऱ्यांचे एक शिष्टमंडळ महाराजांकडे आज आले होते. रस्ते साफसूफ करा, स्मशाने व कबरस्ताने स्वच्छ ठेवा आणि गरीबाना अन्नदान करा असा या बाबतीत त्यांना महाराजांनी सल्ला दिला. आज दुपारचा सर्व वेळ मी वृत्तपत्रांचे वाचन करण्यात आणि चिटणीस नि इतर काही मंडळी यांचेबरोबर गप्पा मारण्यात घालविला. उपासनी काहीतरी काव्यनिर्मितीच्या कामात गर्क होते. सायंकाळी महाराजांना आम्ही चावडी जवळ पाहिले नंतर आम्ही शेजारतीला होतो. त्यानतंर मात्र चिटणीस त्यांचा एक इंजिनियर मित्र आणि इतर निघून गेले.

मंगळवार दिनांक १२-१२-१९११

महाराजांची काकड आरती आता लौकरच सुरु होण्याची वेळ झालेली आहे अशा समजूतीने आज पहाटेला मी व भीष्म लौकरच उठलो खरं पण आरती पूर्वी तब्बल तासभर लौकर आम्ही उठलो होतो. यानंतर मेघा आला व मग आम्ही आरतीला गेलो. नंतर मी प्रार्थना केली व महाराज आता बाहेर निघतील म्हणून वाट पहात बसलो. मी त्यांना बाहेर निघताना पाहिले व ते बाहेरून परत येतानाही बघितले. महाराज बाहेर निघून ते परत येई तोपर्यंतच्या मधल्या काळात मी श्री. गोखल्यांची गाणी ऐकत बसलो. ते फार चांगले गातात. आज दुपारच्या भोजनाला काहीसा वेळच झाला. कारण मेघाला आज बेलाची पाने कुठे मिळालीच नाहीत व ती मिळविण्यासाठी त्याला दूरवर जावे लागले होते. सहाजिकच माध्यान्हाच्या पूजेला उशिर झाला. दिड वाजला तरी ती आटोपली नव्हती. साई महाराज आज चांगलेच प्रसन्न चित्त होते आज ते सर्वांबरोबर गप्पा मारीत होते हास्य विनोदातही भाग घेत होते.

दुपारच्या भोजनानंतर मी थोडावेळ विश्रांती घेतली. काही मिनिटेच माझा डोळा लागला. उठल्यावर मी माझ्या काही परिचितांबरोबर द्वारकामाईत गेलो. आताही साई महाराज चांगलेच प्रसन्न होते. त्यांनी एक गोष्ट सांगितली. जवळच पडलेले एक फळ त्यांनी उचलले, आणि त्यांनी मला सवाल केला या एका फळात किती फळे निर्माण करण्याची क्षमता आहे. मी उत्तरलो या फळात जेवढया बिया असतील त्याच्या हजारो पट. यावर साई महाराज हसून म्हणाले, या फळानेही आपला काहीतरी एक नियम पाळलेला आहे बरं. महाराज पुढे म्हणाले, येथे पूर्वी एक सालस मुलगी होती.तीदेवभोळी धार्मिक वृत्तीची होती. तिने माझी भरपूर सेवा केली तिची चांगली भरभराट झाली.

यानंतर आम्हाला सूर्यास्तावेळी महाराजांचे हातची 'उदी' मिळाली. नंतर महाराज संध्याकाळच्या फेरफटक्यासाठी बाहेर पडले ते बघण्यासाठी म्हणून आम्ही चावडीच्या समोर उभे राहिलो. आम्हाला महाराजांच्या दर्शनाचा लाभ झाला त्यानंतर आम्ही वाडयात परतलो. वाडयात परतल्यावर भीष्म आणि गोखले व भाई यांची गाणी ऐकण्यात वेळ घालविला. दिक्षित नावाचे एक तरुणही आले होते त्यांनी पण गाणी म्हटली. माधवराव देशपांडे व उपासनी हे पण या कार्यक्रमास हजर होते. आजची संध्याकाळ आम्ही फारच चांगली घालविली.

बुधवार दिनांक १३-१२-१९११

मी सकाळीच उठलो. प्रार्थना केली आणि आंघोळीचा बेत केला पण गरम पाणी तयार नव्हते, म्हणून बाहेर येऊन गप्पा मारीत बसलो. एवढ्यात साई महाराज बाहेर जाताना दिसले म्हणून त्यांना लवून प्रणाम केला व त्यानंतर मग मी आंघोळ केली. मी पंचदशीचे वाचन केले. नंतर मी द्वारकामाईत महाराजांचे दर्शनासाठी

गेलो व आरती नंतर परतलो. दुपारी सुमारे ४ वा. मी, बळवंत, भीष्म व बंडू यांचे बरोबर महाराजांच्या दर्शनासाठी मशिदीत गेलो. बंडूने माझा हुक्का मशिदीत आणला मी महाराजांसमोर तो पुढे केला. महाराजांनी तो ओढला व त्यातून धूर काढला. माधवराव देशपांडेना मी आता अमरावतीस परत जाण्याची परवानगी देण्याबद्दल विचारले. तेव्हा महाराज म्हणाले त्याबाबत उद्या सकाळी मी काय ते सांगेन. मशिदीत महाराजांना आणखीनही बरेच लोक येऊन भेटले. मशिदीच्या बाहेर आल्यावर त्या मंडळीनी मलाही भेटून तेथून इतक्या लौकर न निघण्याचा प्रेमळ पितृतुल्य असा सल्ला दिला. नेहमीप्रमाणे आम्ही चावडीच्या समोर सुर्यास्ताच्या वेळी येऊन उभे राहून सायंकाळच्या रपेटीस जात असतानाचे महाराजांचे दर्शन घेतले. नंतर आम्ही शेजारतीस गेलो; नंतर वाड्यात परतलो. आज भीष्मांनीं पंचदशी नेहमी पेक्षा अगोदरच सुरु केलेली होती. आज भाईनी सुद्धा एक भजन म्हटले.

गुरुवार दिनांक १४-१२-१९११

बाहेर जाण्याच्या इच्छेने मी आज सकाळी लौकरच उठलो. काकड आरतीस हजर राहिलो. धा_तेच मी प्रार्थना पण उरकली आणि माधवराव देशपांडे यांचे बरोबर मशिदीत बाबांच्या दर्शनास गेलो. साईमहाराज मला पाहून म्हणाले मी, उद्या किंवा तदनंतर किंवा काही काळानंतर जावे. ते पुढे म्हणाले मी येथे एकट्याने राहून देवाची सेवा करावी. साई आणखीन म्हणाले, परमेश्वर जे देतो ते कधीच संपता संपत नाही, आणि मनुष्य जे देतो. ते कधीच चिरंतन टिकत नाही." श्री बाबांच्या दर्शनाहून मी परतलो आणि पहातो तो काय कल्याणचे दरवेशी साहेब फाळके येऊन पोचले होते. ते जुन्या पद्धतीचे एक सज्जन सद्गृहस्थ होते. त्यांचेबरोबर श्री. शिंगणे हे पण आपल्या पत्नीबरोबर होते. श्री. शिंगणे हे मुंबईतील एक उच्च दर्जाचे वकील होते. त्यांचा एक वकिलीचा वर्गही होता. मी दुपारची माध्यान्हीची पूजा केली आणि बापूसाहेब जोग यांचे बरोबर दुपारचे भोजन घेतले नंतर मी लवंडलो आणि झोपी गेलो. म्हणून मला सायंकाळी द्वारकामाईत जायला काहीसा उशिरच झाला आणि मग मी चावडी जवळ गेलो नि तिथूनच नमस्कार केला. तेथून परतल्यावर मी दरवेशी साहेब व शिंगणे यांचेशी गप्पा मारीत बसलो. त्यांनतर भीष्माने नेहमी प्रमाणे आपला दैनंदिन भजनाचा कार्यक्रम केला.

शुक्रवार दिनांक १५-१२-१९११

मी सकाळीच उठलो. प्रार्थनेनंतर मी श्री. शिंगणे व दरवेशी फाळके यांचेशी गप्पा मारीत बसलो. दरवेशी फाळके यांना हाजी साहेब या नावानेही पुकारले जाई. त्यांनी बगदाद, कॉनस्टँनटिनोपल व मक्का व त्या आसपासच्या सर्व स्थळांचा प्रवास केला होता. त्यांचेशी संभाषण करण्यात एक प्रकारचा आनंदच वाटत असे व त्यातून बोधही होई. साईमहाराजांनाही ते फार आवडत असत. कधीमधी ते त्यांना भोजन पाठवित व त्यांचे बद्दल आदर दाखवून चांगली

वागणूकही देत असत. मी आज साई महाराजांना बाहेर पडताना आणि मशिदीत परत येताना पाहिले. त्यांच्या दर्शनाचा लाभ झाला. आज साई महाराज चांगल्या मनस्थितीत होते आणि आज आम्हा सर्वांना त्यांच्या सुख संवादाचा चांगलाच लाभ झाला. भोजनानंतर मी काही वेळ झोपी गेलो आणि उठल्यावर माझा मुलगा बळवंत दिल्लीचे बातमी पत्र वाचत होता ते ऐकत बसलो. नंतर आम्ही मशिदीत गेलो बाबांचे आर्शिवाद आम्हाला लाभले. रात्री शेजारतीला आम्ही हजर होतो.

शनिवार दिनांक १६-१२-१९११

आजमला चांगलीच जबरदस्त सर्दी झाली होती. म्हणूनच काय मी सकाळी काकड आरतीस उठू शकलो नाही. मी भल्या पहाटे तीन वाजता उठलो खरा पण मग पुन्हा झोपलो तो झोपलोच. उशिरा उठल्यावर मी नेहमी प्रमाणे प्रार्थना केली व दरवेशी साहेब फाळके यांचेबरोबर गप्पा मारीत बसलो. दरवेशी साहेब फाळके यांना 'हाजी साहेब' व 'हजरत' या दोन्ही नावाने पुकारले जाई, संबोधले जाई, ते एक कर्म मार्गी सद्‌गृहस्थ होते. त्यांच्या कर्ममार्गाला आम्ही "हिंदुइझम" असे म्हणत असू व त्यासंबधी सांगायच्याच म्हटल्या तर अनेक दंतकथाही' त्याबाबत आहेत. आज श्री साई महाराज बाहेर पडताना व नंतर मशिदीत परततांना मी त्यांना पाहिले. आज ते छान मनस्थितीत होते. आज ते गप्पा - विनोदात चांगले रंगले पण होते. दुपारच्या आरती नंतर मी निवास स्थानी परतलो; भोजन घेतले आणि अमळ लवंडलो पण झोपलो मात्र नाही, झोप लागूच शकली नाही. आज मुंबईच्या एका अॅडव्होकेट बरोबर कलकत्याच्या "अमृत बझार पत्रिके"चे दोन अंक अमरावतीहून पाठविण्यात आले होते. तेव्हा मला वाचायला आज भरपूर होते. आज सेशन कोर्टात एक खटला चालविण्यासंबंधीची एक तार येऊन थडकली होती. तिन दिवसापूर्वी पण वर्ध्याला एक खटला चालविण्यासंबंधीची तार येऊन पोचली होती परंतु साई महाराज आपणाला येथून निघण्याची परवानगी अजिबात देणार नाहीत म्हणून या दोन्ही तारांना नकारदर्शकच उत्तरे पाठवावी लागली. आज माधवराव देशपांडेनी माझ्या येथून निघण्याच्या परवानगी बद्दल महाराजांकडे विचारपूस केली तेव्हा साई महाराज म्हणाले, मी उद्या, परवा किंवा महिन्या-भराने जावे म्हणून आणि अशा प्रकारे माझ्या निघण्याचा प्रश्न निकालात आला आणि महाराजांना मी चावडी समोर नेहमी प्रमाणे प्रणाम केला आणि आरती नंतर वाडयात भीष्मांचे भजन ऐकत बसलो. आज महाराजांच्या दर्शनास आलेल्या नवीन भक्तात श्री. हाटे हे एक भक्त होते. ते एल. एम. अॅण्ड एस या डॉक्टरीच्या परीक्षेस बसले होते. ते एक फार सज्जन तरुण सद्‌गृहस्थ होते. त्यांचे वडील अमरेली येथे न्यायाधीश होते व पुढे पालीठाण येथे दिवाण पदावर नियुक्त केले गेले. मला वाटते त्यांच्या मामांना पण मी चांगले ओळखत होतो.

(क्रमशः)



# श्रीरामचरितमानस

**सौ. कुसुमताई जोग**
'योजना', आंग्रेवाडी, मुंबईः ४.

गेल्या वर्षीच्या रामनवमी अंकात सुंदरकांडाच्या पाचव्या दोह्यापर्यंत लिहिले आहे. उत्तर हिंदुस्तानात सुंदरकांड तोंडपाठ करतात. रोज म्हणणारे पण खूप आहेत.

पाचव्यात सांगितल्याप्रमाणे हनुमंत बिभीषणाकडे गेले व तिथले वातावरण पाहून "नव तुलसिकावृंद" "रामायुध अंकितगृह" त्यांना असे वाटले की, ह्या लंकानगरीत सर्व राक्षस आहेत आणि इथे कोण सज्जन रहातात! बिभीषणाकडे जाताना त्यांनी ब्राह्मणाचे रुप घेतले होते. बिभीषणाच्या दारापुढे जातात तो ते जागे झाले ते राम राम म्हणतच. म्हणजे ही एक रामभक्तीची खूण आहे. जागे झाल्याबरोबर उपास्य देवतेचे तोंडात नांव. म्हणजे सारखा ध्यास पाहिजे हे तुलसीदासांना सुचवायचे आहे.

हनुमंत मनात म्हणाले रामभक्त दिसतात. ह्या सज्जन माणसाची मुद्दाम मैत्री करू या. ह्यांचा आपल्या कामात उपयोग होईल.

हनुमंतांना ब्राह्मणाच्या रुपात राम राम म्हणताना पाहिल्यावर बिभीषण बाहेर आले. पहिल्यांदा त्यांनी नमस्कार केला. कुशल विचारल्यावर आम्हाला आपण कोण ते सांगा म्हणाले. हल्ली तर दारातूनच विचारावयाचे व दार लावून घ्यायचे. ही पद्धत आहे. आपल्या दारात कोणीही आले तरी नम्रतापूर्वक त्याच्याशी वागणे हे लुप्त होत चालले आहे.

आणखीन विशेष म्हणजे ते म्हणतात, "की तुम्ह हरिदास न्ह महँ कोई। मोरे हँदय प्रिति अति होई" परमार्थाला लागल्यावर ही एक अनुभवाची खूण आहे की, विनाकारण एकाद्या व्यक्तीला बघितल्यावर आपुलकी वाटणे. इथे भक्तिचा ओलावा आहे असे त्या व्यक्तीबद्दल समजावे.

नंतर हनुमंतानी बिभीषणाला आपण कोण व श्रीरामकथा सांगितली. ते ऐकल्यावर दोघांची स्थिती कशी झाली ते सांगतात.

"सुनत जुगल तन पुलक मन मगन सुमिरि गुन ग्राम, म्हणजे दोघांच्या अंगावर रोमांच उभे राहिले व गुणवर्णन ऐकल्यावर हे त्यात मग्न होऊन गेले. म्हणजे रामकथा ऐकल्यावर भक्ताची स्थिती कशी व्हायला पाहिजे हे मर्म दाखवून दिले. बिभीषण लंकेत कसे रहात होते ते अर्ध्या चौपाईत वर्णन केले आहे." जिमि दसनन्हि महुँ जीभ बिचारी"

दातांचे, जिभेचे व तोंडाचे वर्णन अर्ध्या चौपाईत. त्याच्यावर लिहिण्याचे ठरवल्यास खूप मोठा विषय होईल. नंतर भक्ताची नम्रता कशी हवी ते सांगितले. सारखे नामस्मरण, ध्यान सर्व चालू असून म्हणतात —

"तामस तनु कछु साधन नाहीं। प्रिति न पदसरोज मन माहीं" हल्ली तर जरा कुठे परमार्थ केला की आम्ही खूप करतो असे वाटते. इथे रामचरणावर सर्व भार ठेऊन म्हणतात की, "बिनुहरिकृपा मिलहिं नहीं संता" हरी कृपेशिवाय संत भेटत नाहीत.

आणि पुढे म्हणतात की "जौं रघुवीर अनुग्रह कीन्हा। तौ तुम्ह मोहि दरसुहटी दीन्हा। म्हणजे रामचंद्रानी अनुग्रह केला म्हणून तुम्ही मुद्दाम येऊन मला दर्शन दिलेत. इथे "हठिं" हा शब्द महत्वाचा आहे. त्यानी अनुग्रह केल्याशिवाय त्यांचे भक्त दर्शन मुद्दाम येऊन देत नाहीत.

पहिल्या भेटीतच त्यानी हनुमंत कोण हे ओळखले. थोर रामभक्त आपणहून माझ्या घरी आले हे जाणले. माणसाची पारख होणे ही सुद्धा ईश्वरी देणगी आहे. नाही तर सर्वांना एका मापाने मोजायचे! हे होता कामा नये. संतांची थोरवी फार आहे. हनुमंतांनी आपला अनुभव सांगितला. "सुनहु बिभीषण प्रभुकै रीती। करहिं सदा सेवकपर प्रीती। बिभीषणा ऐक प्रभूची रीत, ते नेहमी सेवकावर प्रेम करतात. माझ्यावर कृपा केली म्हटल्यावर डोळ्याना पाणी आले, हनुमंतांचे राम प्रेमाने हृदय किती थबथबले होते हे पहा!

नंतर बिभीषणाने जानकीमाता कशी रहाते ते सांगितले.

"तब हनुमंत कहा सुनुभ्राता। देखी चहऊँ जानकी माता
जुगुति बिभीषन सकल सुनाई। चलऊ पवन सुत बिदा कराई।

मागे सांगितलेच आहे की, हनुमंत जे मनात म्हणतात. "ऐहिंसन हठि करि हअुँ पहिचानि। साधुते होई न कारज हानि।। मुद्दाम मैत्री त्यांच्याशी करू या. हा त्यांचा तर्क बरोबर ठरला. "बुद्धिमता वरिष्ठम" नंतर सीतेला पाहिल्यावर मनातल्या मनात वंदन केले. रात्र झालेली. सीता त्याना कशी दिसली

"कृसतनु सीस जटा एक बेनी।
"जपति हृँदय रघुपति गुनश्रेणी॥
दोहा "निजपद नयन दिअँ मन। रामपद कमललीन
परम दुखी भा पवनसुत। देखि जानकी दीन

रावण नंतर सीतेला मारायला निघाला. माझे म्हणणे मान्य कर. नाहीतर तुला मी मारून टाकीन. सीता रावणाला म्हणते,

"सुनु दसमुख खद्योत प्रकासा"
"कबहुँकि नलिनी करइ विकासा"

म्हणजे रावणा अैक काजव्याच्या प्रकाशाने कमळे कधी फुलतील कां? इथेच रावण फार क्रोधायमान होतो.

"आपुहि सुनि खद्योत सम रामहि भानुसमान" मला ही काजवा समजते व रामाला सूर्य समजते मला ही किती कः पदार्थ मानते पहा. त्याला त्याच्या शौर्याचा फार अभिमान होता. खरे तर रावण सामान्य नव्हता. लंका कांडात लढाईच्या वर्णनात दिसतेच. जानकी माता तरी काय कमी होत्या. त्यांनी अर्ध्या चौपाईत त्याला फटकारले आहे." सुनु दसमुख खद्योत प्रकासा" म्हणून तू रामाना जाणत नाहीस. थोड्याच दिवसात तुझा गर्व दूर होईल. ही अैश्वर्य शक्तीची चुणूक दाखवली, व मी रामाची अर्धांगी आहे. मी सर्व ओळखले हे पण दाखवून दिले.

त्रिजटा नावाची राक्षसी रामप्रेमी होती. रावणाने खूप राक्षसिणीना सीतेला भय दाखवा

म्हणून सांगितले होते. त्रिजटेने आपले स्वप्न जेंव्हा त्याना सांगितले तेंव्हा त्यानी त्रास देण्याचे सोडून दिले.

त्रिजटेला व अशोक वृक्षाला पण तिने विनवणी केली की, मला अग्नि दे. विरहकुल सीतेला पाहून हनुमंताला अेक अेक क्षण कल्पासमान वाटला. अशोक वृक्षावर हनुमंत बसले होते. त्यानी मुद्रिका टाकून दिली.

सीतेला वाटले अशोकाने अग्नीच दिला म्हणून आनंदाने उठून मुद्रिका हातात घेतली आता ती मुद्रिका राम नाम अंकित प्रभूंच्या हातातली होती. अतिशय तेजःपुंज व सुंदर तिने चकित होऊन अंगठी ओळखली. रामचंद्राच्या हातात तिने नेहमीच पाहिलेली. आनंदही झाला व विषादही वाटला. अत्यंत व्याकूळ झाली. नाना तऱ्हेचे तिच्या मनात विचार आले. इतक्यात हनुमान गोड शब्दात रामचंद्रांचे गुण वर्णन करून लागला. राम गुण गान ऐकून सीतेचे सर्व दुःख पळून गेले. मन लावून ऐकू लागली. मग म्हणाली "ज्यानी मला हे अमृत ऐकवले ते प्रगट का होत नाहीत."

मग हनुमंत प्रगट होऊन सीतेला म्हणाले, "आई मी शपथपूर्वक सांगतो मी रामचंद्राचा दूत आहे, ही आंगठी मी आणली. तुमच्यासाठी दिली आहे. नर व वानर ह्यांची संगती कशी झाली ते त्यांनी सांगितल्यावर सीतेला विश्वास उत्पन्न झाला. मन व वाणी कर्माने हा रामचंद्राचा दास आहे हे पटले. इथे १३ दोहे पूर्ण होतात.

असे हे हनुमंत चरित्र अत्यंत गोड आहे. त्यांच्याच कृपेने व आज्ञेने म्हणा तर इथपर्यंत लिहून झाले. मुख्य लिहिले आहे. मन व वाणी कर्माने रामदास आहे. इतपत त्यांनी आपली हकिगत सांगितली. सीतामाईना सांगताना जरासुद्धा आत्मप्रौढी नाही. अत्यंत नम्रपणाने जेव्हढे सांगणे योग्य तेव्हढेच सांगितले. व्यर्थ बडबड नाही असे हे तुलसी रामायण अति गोड आहे. त्याचा ध्यास हनुमंतांच्या कृपेनेच लागणार. सियावर रामचंद्र की जय सर्वांनी नेहमी सुंदरकांड वाचावे म्हणजे हनुमंतांची कृपा होईल.

"तुम्हारे भजन राम को पावे, जनम जनम के दुख बिसरावै." तुलसी रामायण नाट्य महाकाव्य आहे. ह्याचा प्रत्यय पदोपदी येतो.

# साई भक्तीने मी काय साधले?

**सौ. वासंती नांदेडकर,** एम्.ए.
१४०/४७४९, नेहरू नगर,
कुर्ला (पूर्व) मुंबई- ४०० ०२४.

साई भक्तीने मी काय साधले? हा प्रश्न मनावर उमटला अन् पाठोपाठ मनात विचार आला, अरे या प्रश्नातील हा 'मी' कशासाठी? "मी म्हणजे शून्य" ही सत्य, 'साईसच्चरित'

वाचताना कितीदा तरी श्रीसाई बाबांनी पटवून दिले नाही का? तरी हे अज्ञानी मन अजूनही 'अहं' पाशीच घोटाळत असते. त्याची बैठक अजूनही 'मी' पणाचे अधिष्ठान सोडत नाही.

तरीसुद्धा साईसाहित्य वाचून, त्यांचा महिमा ऐकून, आपल्या मनावर कळत-नकळत त्यांच्या शिकवणुकीचे पडसाद उमटत जातात, आणि आपले मन संस्कारित होते.

मनुष्य जन्माला येऊन आपण प्रत्येकजण लौकीकार्थाने सर्व काही मिळवत असतो— पैसा, किर्ती, शिक्षण, ज्ञान, आरोग्य, माणसे सर्व काही— पण जसजशी आपली बुद्धी विकास पावत जाते, तसतशी एक गोष्ट आपल्या ध्यानात येते, ही सर्व कमाई अगदी वरवरची, क्षणभंगुर आहे एका ईश्वरी इच्छेच्या, सत् शक्तीच्या बळावर आपण हे सर्व कमावलेले आहे. याक्षिणीची जादूची कांडी फिरावी, तसे एका क्षणात हे सर्व लौकीक सुख नाहीसेही होऊ शकते.

या गोष्टीचे भान होताच, मन अगदी विषण्णतेने भरून जाते. अंतर्मुख होऊन, आपण जीवनाविषयी काही विचार करू लागतो. माणसाच्या स्वास्थ्य समयी त्याचे भोवताल सर्व प्रकारच्या सुखांनी गजबजलेले असते. पण जेव्हा जिवीताचे स्वास्थ्य हरवते, तेव्हा तो एकाकी पडतो! अशावेळी साईभक्तीने संस्कारलेले मनच फक्त त्याची खरी सोबत करत असते.

अशावेळी 'साईलीलामृत' या उत्कृष्ट व उपयुक्त पुस्तकातील कितीतरी प्रसंग आठवत राहतात. त्या पुस्तकातील बाबांचा शब्दरुप उपदेश मनाला उभारी देतो. बाबांचा हा उपदेश ढासळलेल्या मनाला सावरून ठेवतो. पण केव्हा? तुमचे श्रद्धाळू मन अगदी खरोखरच साईभक्तिशी समरस झाले असेल तरच. नामस्मरणात तुमचे लक्ष तेव्हाच लागते, जेव्हा 'साई' या अगाध शक्तीला 'काया-वाचा-मने' तुम्ही शरण येत असता! साईबाबांच्या 'श्रद्धा आणि सबुरी' या दोन तत्त्वांना सतत ध्यानात ठेवणे ही एक महान् साधना आहे. आपल्यासारख्या अल्पबुद्धी पण खऱ्या भक्तांनी त्या मार्गाप्रत पोहोचण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न करायचा.

कित्येकदा असे होते, आपल्यावर आलेल्या संकटाने आपण एवढे गांगरुन जातो, की नामस्मरणातही चित्त लागत नाही. आपण करीत असलेली काळजी नामस्मरणापेक्षाही अधिक बलवत्तर ठरते. पण जेव्हा सर्व चिंता सोडून, केवळ संकट समयीच नव्हे, तर प्रतिदिनी श्वास घेण्याइतके व अपरिहार्यपणे नामस्मरण किंवा साईचिंतन करु, तो सुदिन खरा!

कोणतीही कृती करताना, निरपेक्ष वृत्ती ठेवल्यास, दुःखाचा प्रश्नच उद्‌भवणार नाही. जे होते ते केवळ साईइच्छेने घडते, ही प्रेरणा मनात कायम ठेवली पाहिजे. म्हणजेच, 'मी म्हणजे शून्य! मी म्हणजे कोणीही नाही. या विश्व पसाऱ्यात, मी म्हणजे एक ना एक दिवस झाडावरुन गळून पडणाऱ्या पानाप्रमाणे, एक नगण्य अस्तित्व!'' हे आपण शिकल्यासारखे होईल. हे अंगिकारल्यावर सर्व लोभापासून, मग तो कोणत्याही स्वरुपाचा असो, आपण आपोआपच दूर जाऊ!

# गीत साईनाथायन

*[रत्नागिरीचे साईभक्त कवी श्री. रा. दि. परांजपे मु. कोतवडे यांनी 'गीत साईनाथायन' रचण्याचा संकल्प सोडला आहे. त्यांची ही गीत रचना हजार काव्याच्याही पलिकडे आहे. त्यांच्या साईगीतनाथायन मधील पहिली पाच गीते क्रमशः येथे देत असून त्यांच्या संकल्पास शुभेच्छा प्रदान करीत आहोत — का. संपादक]*

## गीत (१) पहिले

श्री साईनाथांच्या समाधीच्या दर्शनासाठी म्हणून शिरडी क्षेत्रात असंख्य भक्तगण जमले आहेत. त्यामध्ये अनेक जातीधर्माचे आबालवृद्ध आलेले आहेत. त्यात असे दोन साईभक्त आहेत की, ज्यांना साईप्रभूंनी **गीतसाईनाथायन** हे काव्य रचना करून गायनाची प्रेरणा दिली आहे.

असंख्य साई भक्तांचे लक्ष वेधून घेणारे हे साईभक्त, आपल्या गोड, सुमधूर, सुरेल आवाजाने **गीतसाईनाथायन** गाऊन श्रोत्यांचे मन आणि श्रवण तृप्त करीत आहेत आणि जणू स्वतः साईनाथ सदेह रुपाने आपलेच चरित्र काव्य गायनाचे माध्यमाने मंत्रमुग्ध होवून ऐकत आहेत.

ते दोन साईभक्त तल्लीन होऊन भक्तीरस निर्माण करीत आहेत आणि श्रोतृवर्ग श्रवणमधूर संगीताच्या श्रवणाने कृतकृत्य झाल्याचे जाणवत आहे. कृतार्थ झाल्याचे स्पष्ट दिसत आहे. भक्तद्वय गाताहेत-सांगताहेत.

हरि ओम् बाबाऽ हरि ओम् बाबाऽऽ हरि ओम् बाबाऽऽऽ

(१)

स्वयेश्री साईप्रभू ऐकती, भक्तजन नाथायन गाती।
**साईनाथायन** गाती ।। स्वये० ।। धृ० ।।
गोदावरीच्या रम्य परिसरी, शिरडी ग्रामी दत्त श्रीहरि।
साईनाथांच्या रुपाने, भूवरि अवतरती ।। साईनाथा० ।। १ ।।
द्वादश वर्षे निंबाखाली, घोर तपस्या पूर्ण जहाली।
गुप्तरुपाने टाकूनी अवनी, अवतीर्ण होती ।। साईनाथा० ।। २ ।।
विवाहाच्या निमित्त मात्रे, शिरडी ग्रामी पुन्हा अवतरे।
'आवोसाई' म्हणून वंदीले, भगताने स्वागती ।। साईनाथा० ।। ३ ।।
गोधूम दळूनि जात्यावरती महामारिते दूर ठेविती।
चमत्कार हा पाहूनि म्हणती, साई त्रिमूर्ति होती ।। साईनाथा० ।। ४ ।।
कुणीहि जावो दर्शन घेण्या, अुदीप्रसादे पावन होई।
सर्वधर्मिया वरति प्रिती, अक्षय ते करीती ।। साईनाथा० ।। ५ ।।

## गीत (२) दुसरे

'सर्व धर्मिया वरति प्रिती अक्षय ते करती'

सर्व धर्मियांवरती अखंड प्रेम करणारे साईनाथ स्वतःचे चरित्र ऐकताना आनंदी व प्रसन्न मुद्रेने आशीर्वाद देत आहेत आणि सर्व भक्तगण साईनाथायन ऐकताना देहभान विसरले आहेत.

शिरडीला जाण्याची जर तुम्हाला कधी संधी आली तर ती आपण वाया दवडू नका. त्वरीत जावून दर्शन घ्या. असे भक्तद्वय सांगताहेत.

(२)

दर्शना दवडू नका ही घडी। बाबा-साई निर्मित
शिरडी-ऽ ।। बाबा-साई० ।। धृ० ।।

गलीच्छ वस्ती साधी रहाणी
परि तेथले जन अभिमानी,
मान्य न करती साई देवा,
ईश्वरी अंशात्मक ते घडी ।। बाबा-साई० ।। १ ।।

मौनव्रताची ध्यान धारणा,
करिती साई अपुले स्थाना,
कुणा दुःख ना कुणा सौख्य ना,
जयाला गुरु भजनी आवडी ।। बाबा-साई० ।। २ ।।

जो भक्तांचा सदा अंकिला,
दास विनविती त्या साईला,
चला रहाया द्वारावतीला
कराहो गमनाची तातडी ।। बाबा-साई० ।। ३ ।।

भुयारातील ज्योती मधूनि
चेतविला जो मशिदी अग्नि,
वदती बाबा तयास धुनि,
देई जी अक्षय सौख्य उदी ।। बाबा-साई० ।। ४ ।।

चमत्कार ते पाहुनि डोळा,
'हेमाडांच्या मनि कल्पना
जतन करावा अमोल ठेवा
पाहील पुढची पिढी ।। बाबा-साई० ।। ५ ।।

# गीत (३) तिसरे

'जतन करावा अमोल ठेवा पाहिल पुढची पिढी'

खरोखरच पुढच्या पिढीला मार्गदर्शक ठरण्यासाठी ज्यांनी बाबांना पाहीले नाही त्यांना ते कोण कसे ते हे समजण्यासाठी व ज्यांनी पाहीले त्यांना पुनः प्रत्ययाचा आनंद मिळणे साठी कै. गोविंद रघुनाथ दाभोलकर तथा 'हेमांड'पंत ह्यांनी साईचरित्र लिहिण्याची अनुज्ञा मिळाल्यानंतर चरित्र लेखनास सुरुवात केली.

इकडे भक्तांच्या प्रेमाग्रहामुळे बाबांनी निंबाखाली रहाण्याचे सोडून मशिदीत रहाण्याचे ठरविले. बाबा मशिदीलाच द्वारकामाई किंवा द्वारावती म्हणत. ते मशिदीत आले तरी कायम ते तेथेच बसून रहात नसत. त्यामुळे काही भक्तांना दर्शन होत नसे. ते मनात म्हणत ह्या बाबांना भेटायचे तरी कोठे? चरण भेट तरी कशी व्हायची?

सर्वांतरयामी असलेल्या साईनाथांनी भक्तांचा प्रश्न जाणला ते स्वतःच त्याचे उत्तर देवू लागले — सांगू लागले.

(३)

भावभक्तीने भक्त विचारी कुठे अहा तुम्ही।
राहीलो सर्वांतरयामी ।। राहीलो० ।। धृ० ।।

विचार कां रे करीत बसशी वेड्या अपुल्या मनी,
कर्म करावे श्रद्धेने तूं राहूनी मद्‌भजनी
योग्य फलाने देईल ईश्वर, अनंत हातानी ।। राहीलो० ।। १ ।।

निंबाखाली गुरुच्या निकटी सौख्य असे भारी
काय कारणे गुंतविता मज फकिरा संसारी
परी विनंती परिसुनि तुमची आलो या स्थानी ।। राहीलो० ।। २ ।।

माधुकरी मी नित्य मागुनि राही गुरुभजनी
कशास मजला भाजी भाकरी नावड पक्वान्नी
श्वान सूकरा ज्यांनी तृप्ती तृप्त असे मी ही ।। राहीलो० ।। ३ ।।

कुणी कुणाला कारण नसता बोलू नये उणे
तेणे मजला येते दुखणे काय कोण जाणे
फकिराची या कलाच न्यारी कैसी समजावी ।। राहीलो० ।। ४ ।।

श्रद्धा सबूरी दोनच नाणी अर्पावी मजला
सद्‌भक्तांना भार माझ्या वाहीन मी सगळा
चरणी ठेविन करून मोकळा त्याला पापातूनि ।। राहीलो० ।। ५ ।।

## गीत (४) चौथे

'चरणी ठेविन करून मोकळा त्याला पापातुनि'

श्रद्धा आणि सबुरी असणाऱ्याला मी पापा पासून मुक्त करीन असे स्वतः बाबांनी आश्वासन दिले. त्याचप्रमाणे आपण कोठे आणि कशा स्वरुपात असतो त्याचेही उत्तर दिले पण त्या त्या स्वरुपात सुद्धा बाबांना पहाण्याची दृष्टी मात्र आपल्यात असायला हवी.

सर्वांभूती परमेश्वर पहाण्यासाठी दृष्टीप्रमाणे मनसुद्धा मोठं असावं लागतं असे ते साईभक्त सांगताहेत.

ते पुढे म्हणतात, हे मानवा तुला नर जन्म मिळाला आहे हे सुद्धा काही कमी नाही हे जरी खरे असले तरी अुदरभरण, पिंडपोषण आणि श्वसन करून जन्म फुकट घालवू नकोस. लोहाराचा भात्यासुद्धा निर्जिव असूनही एक प्रकारचा श्वासोच्छवासच नाही का करतो? त्याचप्रमाणे पशूपक्षीसुद्धा अुदरभरण आणि पिंडपोषण, प्रजोत्पादन नाही का करतात? मग त्यांत आणि आपल्यात फरक तो काय? म्हणून नरजन्माचे सार्थक करण्यासाठी श्रीचरणी विनम्र हो आणि पुण्य जोड —

'देरे हरि संतपदाची' जोड' अशी इच्छा असणाऱ्या सर्व मानवांना उद्देशून भक्तद्वय सांगतात.

(४)

मानवाऽऽऽ कर अपुले कल्याण ।। मानवाऽऽऽ ।।
नरजन्माचे सार्थक करण्या जोडी पुण्य महान ।। मानवाऽऽऽ — ।
मानवाऽऽ— । मानवाऽऽऽ— ।। धृ० ।।

साईसारखा संत असावा, संगतयाचा निशिदीनी व्हावा
ध्यास मनाला लावून धरि तू, चरणी अनूसंधानऽऽऽ ।। १ ।।
विठ्ठरायाचे दासगणूंना श्री साईनी दिले दर्शना
चरणी पाहूनि गंगा यमुना सरले सारे भानऽऽऽ ।। २ ।।
अपुले माता पिता बंधूही त्यागुनि शिरडी आले साई
भक्त कृपाळू भक्तासाठी राहीयले भगवानऽऽऽ ।। ३ ।।
प्रिती बाबा दिपाराधनी तेलही देती तेली वाणी
पाण्यानेही वाती लावील्या होई जरी अवमानऽऽऽ ।। ४ ।।
अल्ला मालिक जपे सर्वदा आचरी मशीदी अग्निहोत्रा
हिंदू अथवा यवन संभ्रमी सारे निष्ठावानऽऽऽ ।। ५ ।।

## गीत (५) पांचवे

'हिंदू अथवा यवन संभ्रमी सारे निष्ठावान'

बाबा हिंदू का यवन अशा संभ्रमात बरेच साईभक्त होते. साऱ्या निष्ठावान भक्तांनासुद्धा

बाबांच्या जाती धर्माची खात्री पटत नव्हती. बाबा जातीचा विचार करीत नसत. सर्व धर्मियांवरती ते सारखेच प्रेम करायचे.

बाबा परमेश्वराचे अवतार असावेत असे बहुतेक साई भक्तांना वाटत असे कारण त्यांचे चमत्कार असे काही अघटीत असत की, नास्तिकांची सुद्धा पावले शिरडीकडे आकर्षित व्हायची.

बाबांना शिरडीला येवून बरेच दिवस झाले. त्यांचा नित्यक्रम कोणताही अडथळा न येता चालू होता. शिरडीतील श्री. नानासाहेब चोपदार ह्यांच्या मातोश्रींना प्रथम निंबाखाली बाबा दिसले. त्या गोष्टीला बरेच दिवस लोटले तरी त्या दिवसाचा अवर्णनीय आनंद अजूनही त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. त्या सर्वांना पुन्हा पुन्हा सांगत होत्या.

(५)

भक्तीभाव एक साई चरणी वाहीला।
साई देखिला ग सखी साई देखिला ॥ साई० ॥ धृ० ॥
बाळरुप असून अति कठीण हा तपी —
ध्यान मग्न राही सदा शिती आतपी
निंबातळी आसनी हा प्रथम पाहीला ॥ १ ॥
साई दर्शनार्थ तिथे पातले कुणी
भांबाहून जाती सर्व रूप देखूनी
परमात्म्या फकिर वेगी कुणी न जाणिला ॥ २ ॥

गुप्तवेश धरूनि पुन्हा दृष्य जाहले
भगतादी भक्त तधी चुकर जाहले
शोधुनियां घोडी दिली चांद पाटीला ॥ ३ ॥
पूर्वाजित पुण्याने भाग्य उजाडले
पूर्ण ब्रह्म आजपासून नयनी देखिले
भाग्याने चरणस्पर्श आज जाहला ॥ ४ ॥
गुरूस्थानि करूनि जाप्य गुरूसी आदरी
प्राणाहूनि प्रिय अति स्थान दाखवी
भक्तरक्षणार्थ दत्त शिरडी राहीला ॥ ५ ॥

## शिरडी येथील रामनवमी उत्सव

प्रतिवर्षाप्रमाणे शिरडी येथे श्री रामनवमी उत्सव बुधवार दिनांक १७ ते शुक्रवार दिनांक १९ एप्रिल १९८६ असे तीन दिवस साजरा होईल असे कार्यकारी अधिकारी श्री. रा. द. बन्नेसाहेब कळवितात.

# सिलेंडरचा स्फोट व श्री साईकृपा

**सौ. निला निलकंठ पाटकर**
९, तृप्ती, बँक ऑफ बरोडा हा. सोसायटी,
एम. सी. छगला मार्ग, [बामणवाडा रोड],
विलेपार्ले [ईस्ट] मुंबई नं. - ४०० ०९९.

श्री सद्‌गुरू साईनाथांच्या लीला अगाध आहेत. ते दयाधन बाबा मला संकटातून वेळोवेळी सोडवत आहेत. आम्ही सर्वजण बाबांचे अत्यंत ऋणी आहोत. मी माझ्या सर्व कुटुंबाचा भार बाबांवरच सोपविला आहे.

२४ ऑक्टोबर १९८५ गुरूवारचा दिवस. या दिवशी एका महान संकटातून बाबांनी आम्हाला सोडविले आहे. आमच्या घरात बर्शेन गॅसची दोन सिलिंडर्स आहेत. बुधवार पासून घरात गॅसचा फार वास येत होता. इतका की सर्व घरात तो वास अगदी घुमला होता. आम्हाला वाटले की गॅस सिलिंडर संपायला आले की असा वास येतो, तसाच तो येत असेल. तरी पण ह्यांना बाबांच्याच कृपेने काही प्रेरणा मिळाली व ह्यांनी गॅसच्या दुकानात मेकॅनिकला पाठविण्यासाठी फोन केला. गुरूवारी सकाळी मी व हे ऑफीसला गेलो. घरात वयस्क सासूबाई व माझी दोन मुले [चि. विनायक व मंदार] घरात होती. मेकॅनिक [एरव्ही लवकर न येणारा मेकॅनिक श्री. बाबांच्याकृपेने लवकर आला.] आला. दोन्ही सिलिंडर ओट्याखाली असलेल्या बंद कपाटात ठेवली आहेत. मेकॅनिक आल्याबरोबर दोन्ही मुलांनी त्याला गॅस विषयीची तक्रार सांगण्यास सुरुवात केली, नंतर त्याच्याच सांगण्यावरुन विनायकने त्याला दोन्ही सिलींडर कपाटाच्या बाहेर काढून दिली. सिलींडर बाहेर काढली मात्र. एकदम गॅसचा स्फोट झाला. जोरात आवाज झाला व सिलींडरमधून भसाभस गॅस बाहेर पडू लागला. मुले सासूबाई एकदम घाबरून गेली. व तीघेही एकदम बाहेर पळाली. मेकॅनिक तेथेच उभा होता. पण त्याच्या डोळ्यात सर्व गॅस गेला होता. त्याला काहीच दिसेनासे झाले होते. तरीही बाबांच्याच कृपेने त्याला पटकन मार्ग सूचला व त्याने सिलिंडरचे बटण बंद केले.

केवढे हे संकट! त्यावेळी जर घरात स्टोव्ह किंवा एखादी उदबत्ती जरी पेटती असती तरी घरात पसरलेल्या गॅसमुळे अख्खे घरच पेटले असते. तो मेकॅनिकही म्हणू लागला की जर सिलिंडर आतल्या आत फुटले असते तर, मी बंदच करू शकलो नसतो. व मोठा वाईट प्रसंग आला असता. ही सर्व देवाची कृपा होय, त्याचे म्हणणे खरे होते. माझे बाबा माझ्या घरात असताना असे कसे होईल?

संध्याकाळी घरी परत येताच आम्हाला हे सारे कळले. माझी नजर बाबांच्या फोटोकडे वळली. माझे डोळे पाण्याने भरून आले. व मी म्हटले. "बाबा केवढे तुमचे हे आमच्यावरील प्रेम, आज केवढा महान प्रसंग आमच्यावर आला होता. त्यातूनही बाबा तुम्ही आमचे रक्षण केलेत. तुमच्या शिवाय ह्या जगात कोण रक्षणकर्ता आहे. बाबा आम्ही सर्व सुखदुखाचा भार तुमच्यावरच टाकला आहे. बाबा अशीच तुमची कृपादृष्टी

आमच्यावर ठेवा व तुम्हाला शरण आलेल्या या अज्ञानी लेकरांचे वेळोवेळी रक्षण करा.''

त्या रात्री झोपेतही माझ्या नजरेसमोर हेच दृश्य दिसत होते. व मी झोपेतही म्हणत होते, ''आपल्या घरात माझे बाबा बसलेले आहेत, आपल्या घरात असे कधीच घडणार नाही.''

हे अनंत कोटी ब्रम्हांडनायका, राजाधिराज, योगिराज साईनाथा आम्ही सर्व सुखाच्या व दुःखाच्याही क्षणी तुमचीच आठवण करीत असतो. व यापुढेही करू तुमच्या पवित्र चरणी आम्हां सर्वांचे कोटी कोटी प्रणाम.

# ॥ शिरडीचे साईबाबा ॥


**श्री. लक्ष्मण कुंभार**
शिरडी.


**॥ सबका मालिक है। अल्ला भला करेगा ॥**
**(हम सब अेक है) अेकही रास्ता**

शुभ दीपावलीत पाण्याचे दीप लावून दीपावली साजरी करणारा— त्या दीपामुळे मनातील अंधःकार दूर करणारा महान संत— शिर्डीचे साईबाबा असा हा जगाचा चालक- मशिदीतला फकीर!!

लोकमान्य टिळकांना आर्शीवाद देणारा - १९१४ च्या महायुद्धाचा ब्रिटीशांतर्फे निकाल देणारा -सरकारचे दारुबंदी धोरण अगोदरच अमलात आणणारा - महारोग - कुष्ठरोग हा दैवी कोप नाही - महारोग्यांची मनोभावीपणाने सेवा करणारा - समाजात माणुसकीने मानवतेचे स्थान उंचावणारा - हा महान संत 'शिर्डीचे साईबाबा' होय.

हा महान संत असं काही धन सोडून गेला की ते कोणी- पळवून नेणार नाही- भांडाभांडी होणार नाही- चोर चोरून नेणार नाही- असे साईनाम धन सोडून गेला आहे. विचारवंतांनी गरजवंतांनी हे धन मनसोक्त लुटावे व आपले आयुष्य सार्थ करावे

अनंत हस्ते देता कमला वराने
घेशील किती दो कराने- हा महान संत

त्याच्या तुर्बतीतून अजूनही बोलतो- हे मानवा शोक करू नकोस- धीर सोडू नकोस मी तुमच्यात आहे- तुम्ही माझ्यात आहांत. श्री बाबा स्वतःला कधीच परमेश्वर म्हणत नसत व मानवालाही म्हणू देत नसत. मी देवाचा दूत आहे मानवाला माणुसकीने जगवा- त्यागमय जीवन जगा- म्हणजे समृद्धमय जीवन आपोआप जगता येईल. श्री बाबा म्हणत- पोटभरू ज्योतिषाच्या भविष्यावर विश्वास ठेवू नका- भविष्य - भविष्य म्हणजे

तरी काय? स्कायलॅब पडणार- जगाचा विनाश होणार- होम हवन करा- लाखो रूपयांचे तूप हवनात टाका- बकरे कोंबडे बळी द्या.

यावेळी मला नेहरू चाचांची आठवण होते- या लाडक्या पंतप्रधानाने श्री बाबांचे तत्व अमलात आणले- भविष्य आपल्या हातात आहे- भविष्य आपला सेवक आहे- हा कोट्यावधी रूपयांचा खर्च कशासाठी?

अरे गरीबांना अन्न संतर्पण करा- भुकलेल्यांना पोटभर जेवू घाला- नागव्यांना वस्त्र द्या- निराधारांना-बेघरांना निवारा द्या. ही बाबांची तत्वे अमलात आणली.

आज मानव काही विशिष्ट सुखासाठी पळतो- व ते सुख पुढे पुढे पळते- सर्व थरातील मानव श्री बाबांचे दर्शन घेतात- समाधीवर बसून अभिषेक करण्याची अभिलाषा मनात बाळगतात.

हे मात्र मला खटकले- अभिषेकाची अभिलाषा ठेवून अभिषेक न झाल्याने नाराज होणं हे देखील खटकते- याला आपण फकीर म्हणतो- पण हा कुबेर आहे- हे सर्वानुभवी आहे- 'जो- जे-जे मागेल- ते-ते त्यासी मिळेल. (श्री बाबांच्या वचनावरून) असं असताना आपण धावाधाव करावी ती कशासाठी? काही लोक बाबांच्या सेवेचा खूप गाजावाजा करतात- उंची वस्त्रे अर्पण करणे- मोठ्या किमतीचे हार अर्पण करणे- श्री बाबांना तर डामडौल मुळीच आवडत नसे- (श्री साई चरित्रातून- ते वाक्य पुन्हा लिहिणे अप्रस्तुत होणार नाही)

परमपूज्य श्री दासगणू महाराज- कीर्तन करण्यास निघाले कीर्तनाचा वेश करून निघाले- व बाबांची आज्ञा मागू लागले- तेव्हा श्री बाबा म्हणाले-'अरे गणू! श्रोते तुझे कीर्तन ऐकणार की- हा केलेला डामडौल पाहणार—

श्री दासगणू महाराज मनोमनी वरमले- अन तेव्हापासून पंचा नेसून कीर्तनातून श्री बाबांचा महिमा प्रसारित केला-

श्री बाबा म्हणत- आपण स्वतःच्या जीवाला जेवढे जपतो- तेवढेच इतर मानवाला प्राण्याला जपा- जीवदया करा-

जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले (संत शिरोमणी श्री तुकाराम महाराज) तेथेची श्री साईबाबा जाणावा.

संत कान्होपात्राने 'हृदयाचा हार श्रीविठ्ठल चरणी अर्पण केला- तसेच आपणही श्री चरणी हृदय कमल अर्पण करून श्री साई भक्ती करावी- आमचे परमपूज्य कै. नानासाहेब रासने म्हणत-

साई हमारे साथ हैं। हम किसीको क्यों डरे—
कौन छुवेगा हमारी परछाया रे—

जय साई



# गोदा काठचा राम

— डॉ. सुमन खानविलकर
बॉबे-पूना रोड,
लोणावळा.

बाबा तुम्ही कितीही गमती जमती केल्यात ना तरी लक्षात ठेवा आम्ही भक्त काही कमी नाही. तुमच्या कृपाप्रसादाने आम्ही सुद्धा ओळखले आहे तुम्हांला खरच बाबा खोट नाही सांगत.

कसे काय म्हणता सांगते ऐका ना माणूस हा वेश पालटतो पण गुण कोठे पालटता येतात तेव्हा तुम्ही मानव देह धारण केला मग मागच्या मानव देहातले गुण कोठे लपवणार वचने पुरी करवी लागतात.

आता बघा हं शरयू काठचा राम आणि गोदाकाठचा नाथ. शरयू काठचा राम बाळपणीच गुरु गृही गेला होता व गोदा काठच्या नाथाने बालपणीच आपले गुरुस्थान दाखविले.

तसेच ऋषीमुनींच्या यज्ञामध्ये राक्षस त्रास देते होते नको नको जीव झाला होता. सत् कर्म करू देत नव्हते. त्राही भगवान असे झाले होते.

त्याचप्रमाणे यावेळी शिरडीत गरिबीचा राक्षस थैमान घालत होता जिकडे तिकडे गलीच्छपणाच्या व रोगराईच्या त्राटीकेने वास्तव्य केलेले याचे निवारण साईनाथा तूच केलेस.

राम सत्यवचनी, दयाळू, क्षमाशील, वैराग्यसंपन्न, चराचरावर त्याचा अधिकार चालत असे तेजाचा पुतळा उदारांचा दाता कृपावंत.

हेच गुण तुझ्यात गोदातटाच्या नाथा होते बरे.

अरे तुझ्या तोंडाने तू कबूल केलेस सांगते ऐक.

सर्वाभूती मीच आहे, राम तेरा भला करेगा हा आशीर्वाद तूच देत होतास. तुझे शब्द लोकांना भूल पडावी तुला ओळखू नये तू आणि राम वेगळे समजावे.

रामाची भोळीभाबडी भक्ती करणारी वानरसेना तर तुझा भक्त समुदाय सुद्धा भोळा भाबडा नि त्यांचे तुझ्यावर प्रेम बरं कां?

हसता काय बाबा तुम्ही मारलेत, मार खात होते, रागावलेत रागावून घेत होते फेटा

जाळा आनंद फेटा बांधा. आनंद ब्राह्मणाला बोकड कापा सांगा तयारी, रात्रभर झोपू देणे नाही पायाला पाय लावून दूसऱ्या मारतात ठीक घरोघरी भिक्षा त्यातले रवा खातो प्रसादाचे पंचपक्वांनाचे ताट घ्या घेतो, विष्णुसहस्त्र नाम वाचतो, ग्रंथ लिही, लिहीतो. नोकरी सोड सोडतो.

अरे बाबा काय सांगू तुला मोठमोठ्या श्रीमंत तसेच डिग्रीवाले यांना तू काय नांवे दिली होतीस त्या नांवात ते भक्त खूष असत. मला कसे माहित अरे मी पण तुझीच आहे ना बघ सांगते ते खरे आहेना.

१) भटाचा शाम्या = माधवराव देशपांडे (२) कोत्याचा घोडमुख्या = तात्या पाटील कोते (३) अंडाजी पिल्ले = डॉ. पिल्ले (४) गुखडा = पिलाजी गुरव ५) लंगडाकाका = हरि सिताराम दीक्षित (६) हेमाड = अण्णासाहेब दाभोलकर (७) बापूसाव टापूसन दादा = दादासाहेब खापर्डे ८) ठकी = सगुण मेरू नाईक (९) बुट्या = बापूसाहेब बुटी (१०) भाऊ = भाऊसाहेब धुमाळ (११) अर्धागांडू = माधव फसले (१२) चिंधी चोर = बाळासाहेब देव मामलेदार (१३) अवदसा = राधाकृष्णामाई (१४) कासारडा = दामुअण्णा रासने

वरील सर्व त्या रामजन्मांत तुझ्या प्रेमाचे, नात्याचे, राज्यकारभार पहाणारे असावेत. आणि त्या राधाकृष्णामाई या रामा तुला वनवासात पाठवण्यासाठी कान फुंकणारी मंथरा असावी म्हणून तू त्यांना हे अवदसा नांव दिलेस त्याच रूपाने तिने रामराज्याचा विध्वंस केला त्याची आठवण तिला या नांवाने तू दिली असावीस खरे ना?

हसतोस काय लिहीते ते तुझ्याच कृपेने. लिहीते बुद्धी देणारा तूच.

आता बघ हे ब्रह्मांडी प्राण लावून ठेवून चार दिवस शरीर चांगल्या अवस्थेत ठेवणे व परत त्या शरीरात जीव आणून सर्वांना आनंद देणे. तसेच या शब्दावर लोकांनी विश्वास ठेवून त्या शरीराची जोपासना, रक्षण करणे ही शक्ती राम मानवरूपात नाही रे हे सारे तुझेच कर्तृत्व आहे.

रामस्वरूपात तू असताना यज्ञयागाचे पुण्य होते तर या वेशात तू अखंड धुनीरूपी यज्ञ करून त्यात सर्व पापांची आहुती देण्यास व राक्षसी वृत्तीचा बळी द्या आणि शांती देणारी उदी घ्या कपाळला लावा नि साऱ्या वाईट वासनांचा बळी द्या.

रामाचे आयुष्यातले बरेचसे दिवस वल्कले वापरण्यात गेले तसे साईनाथा तुम्ही सुद्धा कफनीतच दिवस घालवलेत एवढे ऐश्वर्यवंत भक्त नि कुबेराला लाजविणारी लक्ष्मी दानात खर्च करत असत पण स्वतः हौशी भक्तांचा प्रेमळ हट्टानेच थोडे कधी ऐश्वर्य भोगले असाल नाथा खरे ना.

रामस्वरूपात अहिल्येला उद्धरलेत तर या जन्मात गणिकेला उद्धरलेत. तसेच मारिच्या-सारख्या राक्षसाना मारून उद्धरलेत तर येथे वाघाला सद्‌गती दिलीत.

अश्वमेध यज्ञामध्ये घोड्याला सजवून राज्ये पादाक्रांत करून घेतलीत तर त्या घोड्याचे या जन्मी सजवून नटवून लाड केलेत त्याच्याकडून काम करून न घेता त्याचा उद्धार केलात समाधी बांधलीत खरे ना.

बाबा तुम्ही रामस्वरूपात असताना जेव्हा वनवासाला या रस्त्याने गेला असाल तेव्हा या भूमीला तुम्ही आश्वासन दिले असावे की मी परत तुला भेटेन तुझा उद्धार करीन शरयू काठची अयोध्या बनवीन त्या प्रमाणे गोदावरी काठची अयोध्याच झाली बघ.

रामा वनवासात असताना शबरीची बोरे खाल्लीस व खात खात जाताना ज्या तुझ्या स्पर्शाने नि शबरीच्या निष्काम भक्तिने पवित्र झालेल्या बिया रस्तोरस्ती या बाजूला पडल्या म्हणूनच येथील ही बोरे आंबट नसतात, नि रुचकर नि गोड असतात रे.

रामा नाशिकला पंचवटीत जाताना या गावात जंगल होते. वाघ, सिंह, राक्षस यांचेच वस्तीस्थान होते. वनवासाच्या वेळी याचे निर्दालिन केले होते पण उद्धार झाला नव्हता. तेव्हा ते तुझी वाट पहात उभे होते कारण तू सांगितले होतेस शबरीला तुझ्या हातच जेवण मी जेवायला देईन. तेव्हा ती काटेरी झाडे होऊन वाट पहात होते. त्यांचाही यावेळी उघड्या पावलानी चालून उद्धार केलास नाथा.

तुम्ही शबरीला दिलेले वचन या जन्मात पाळलेत कसे सांगू. बायजाबाईच्या रूपात शबरी जन्माला आली आणि तिने कोणी न सांगता बाबांना भाजी भाकर खायला घालायचा नेम केला. नुसता नेम नव्हे बाबा कोठे असोत त्या रानावनात जाऊन ती त्यांना जेऊ घाली ते जेवल्याशिवाय आपण जेवत नसे. सांगा बाबा नुसते हसू नका तुम्हीच शरयू काठचे राम ना बोला बाबा.

आता आणखी सांगते गंमत ऐका हं गालातल्या गालांत काय हसता ऐका.

ज्या शीळेतून अहिल्या निघाली ती शिळा तशीच तिष्ठत होती. तिचाही या जन्मात तुमच्या पदस्पर्शाने उद्धार केलात, कारण ही शीळा जेव्हा बांधकाम चालू असताना तेथे होती तेव्हा तुम्ही हिच्यावर पाय ठेवून उभे रहात असा त्या पदस्पर्शामुळे आज लाखो लोक तिच्यावर मस्तक टेकून मानवंदना देतात.

काय काय सांगू बाबा आम्ही तुम्हाला ओळखले कसे ते.

हे बघा सीतामाईनी अग्नीदिव्य केले ती आठवण कायम ठेवण्यासाठी सतत अग्नीनारायणाम्पोर बसून रहात असा जणू काय त्या ज्वाळामधून तुम्हाला सीतामाईचेच दर्शन घडत असावे. वाल्मीकी गंगागीर बाबांच्या रूपाने येऊन तुमचे पुढचे भविष्य सांगून गेले.

हा हिरा जरी आज मातीत पडला असेल तरी हा हिरा आहे. चमकल्याशिवाय रहाणार नाही. साईनाथ आज जरी वेड्यासारखे दिसत असले तरी कालांतराने ते प्रकाशमान होऊन सर्व जगाचे डोळे त्यांचेकडे लागणार आहेत. ते साक्षात् परमेश्वर आहेत किंवा रामाचे भविष्य सांगितले होते जन्माला आल्यावर राम परब्रह्म साचार सातवा अवतार आता कलीयुग त्यात देव अवतार न होता संताच्या रूपाने देव येऊन जगाचा उद्धार करणार.

साईनाथा उभ्या मानवी देहाच्या आयुष्यात कोणत्याही देवाची पूजा केली नाहीत. अगर कोणताही ग्रंथ वाचला नाहीत.

निर्गुण, निराकार परब्रह्मासी नेहमी समरस असा.

वनवासात असताना वाढलेल्या जटा पाहून कदाचित भक्तगण ओळखतील म्हणून

डोक्याला सतत फडके बांधलेले असे.

हे पहा साईनाथा तुमच्याच मुखातून निघालेले शब्द आतातरी हो म्हणाव लागेल ना?

अध्याय ३ ओवी ९१:- मनबुद्धादि इंद्रियासकट । नव्हे मी स्थूल नव्हे विराट नव्हे हिरण्यगर्भ अप्रगट। साक्षी मी जुनाट अनादि

अध्याय १५ ओवी ७०:- असे तुम्हा हृदयस्थ मी। त्यासी नमा नित्य तुम्ही

अध्याय २७ ओवी १६६:- राजाराम राजाराम । वद वाचे

अध्याय २७ ओवी १६७:- असे म्हणत राही नित। सफल होईल आई जीवीत शांत होईल तुझे चित्त। हित अपरमीत पावशील

अशी किती तरी वाक्ये तुमच्या मुखातून तुम्ही श्रीरामचंद्र अयोध्यापति असल्याची ग्वाही देतात बाबा साऱ्या जगाला तुमचा प्रताप कळला पटला आता सोडा हा हट्ट नि कबूल करा मीच तो अयोध्यापति. या जगात जे धर्माचे, मानवतेचे झगडे चालले आहेत त्यातून होणारे हिंसाचार त्यामुळे जगातली मानवता, प्रेम सारे नष्ट होताना पाहिले आणि या वादविवादाला आळा बसावा म्हणून कोणाच्या पोटी जन्म न घेता कोणत्या धर्माचे हे शेवटपर्यंत न कळता फक्त एकच जाणा सर्वाभूती परमेश्वर आणि सर्वांनी प्रेमाने आनंदाने वागा हे सांगण्यासाठी परत स्वर्ग लोकातून मृत्यू लोकात आलात आणि आपले कार्य करून परत निघून गेलात. बाबा तुमच्यासारखा प्रेमळ संत आम्हाला मिळाला धन्य आम्ही.

श्री साईनाथा अनंत कोटी प्रणाम तुजला अनंत कोटी प्रणाम

संताचिया गांवी प्रेमाचा सुकाळ । नाही तळमळ दुःख लेश
तेथे मी राहिन होऊन याचक । घालतील भीक तेचि मज

●

## दर्शन

माझ्या हृदय मंदीरांत
जागते जेंव्हा बाबांची मुर्ती
ज्योत पेटते तेंव्हा ;
भाव भक्तिची
मनःचक्षू पुढे बाबा येतात
भाव सुमनांची माला वाहून
मी पुजा करते.
तेंव्हा बाबांचे आर्शीवाद
शिरावर असतात
मनं हलकं होऊन
साओ भजनी रंगते
साओच्याच कृपेने
हे सगळं घडते.

— सौ. शकुंतला शंकर जगतकर
१९/१६२ उन्नत्त - नगर
विभाग २ गोरेगाव

# प्रार्थनेला प्रतिसाद

— सौ. निर्मला चि. राजे
लीला-भुवन ७ वी गल्ली,
राजारामपुरी, कोल्हापूर.

आज मला हा अनुभव लिहिताना जो आनंद होत आहे तो व्यक्त करताना मला योग्य ते शब्दच सुचत नाहीत. माझ्या वाचनात असे आले होते की भक्त श्री बाबांकडे नेहमी काही ना काही मागणे का करतात? याबाबत माझे वैयक्तिक असे मत आहे, मुले ही जशी आपल्या परमपूज्य ति. आई बाबांकडे त्यांना हव्या असलेल्या गोष्टी हट्ट-मागणी करतात. त्याप्रमाणे आपले जर आशेचे — श्रद्धेचे स्थान ति. साईबाबा असतील तर त्यांच्याकडे मागणे मागण्यात काहीच गैर नसावे.

मी श्री बाबांकडे असेच अेक मागणे केले होते व ते पूर्णपणे फलद्रूप झाल्याने मी हा लिखाणाचा प्रपंच करत आहे.

सप्टेंबर १९८५ महिन्यात माझ्या यजमानांना अल्सर हा रोग झाला होता व त्यासाठी शस्त्रक्रिया करणे आवश्यक होते शस्त्रक्रिया म्हटले की आपल्याला अेक प्रकारची धास्ती वाटते. जरी वैद्यकीय शास्त्र खूपच प्रगत झाले असले तरी मानवी मनात नको त्या शंका उद्‌भवतात असे असले तरी आम्ही शस्त्रक्रिया करून घेण्यास डॉक्टरांना अनुमती दिली.

आमचे दैवत गजानन असल्यामुळे व गौरी गणपती येण्यास अेकच आठवडा असल्यामुळे गौरी गणपती विसर्जनानंतर लगेच शस्त्रक्रिया करण्याचे ठरले. त्याप्रमाणे २५-९-८५ ला शस्त्रक्रिया करण्यात आली. कोणताही त्रास झाला नाही. अनंतचतुर्दशी दिवशी स्नान पोथी वाचन करून मी दवाखान्यात साधारण ४ वाजता गेले तेव्हा मला असे आढळले की यजमानांची प्रकृती चिंताजनक झाली आहे. शारीरिक कोणतेही व्यवहार चालू नव्हते. पोट फुगून खूप घट्ट झाले होते व त्यांचा चेहरा अेकदम उतरलेला व पांढरा फट्ट झालेला दिसला.

मी नेहमी दवाखान्यात दीड ते दोन वाजेपर्यंत जात असे परंतु त्यादिवशी गणपती विसर्जन असल्यामुळे रिक्षा उपलब्ध होऊ शकली नाही व मला दवाखान्यात पोहचण्यास ४ वाजले.

दवाखान्यात गेल्यानंतर मी डॉक्टरांना बोलाविण्याची सिस्टरना विनंती केली त्याप्रमाणे डॉक्टर येऊन तपासून गेले, व काही काळजी करण्यासारखे नाही असे म्हणाले परंतु मला स्वतःला प्रकृतीमध्ये काहीच फरक जाणवेना.

श्री गजाननांच्या मूर्ती विसर्जनासाठी मोठ्या धूमधडाक्याने जात होत्या. पण माझे लक्ष त्यात लागेना मी सारखा श्री बाबांच्या नावाचा धावा चालू ठेवला होता. आम्ही दवाखान्यात स्वतंत्र खोली घेतली होती. त्या खोलीतून समोर असलेल्या अेका दुकानात लावलेले बाबांचे कॅलेंडर दिसत होते. मी सारखे त्यांचे दर्शन घेऊन यजमानांच्या प्रकृतीत फरक पडण्यासाठी मनोभावे आळवीत होते. "ह्याना उद्या अगदी ठणठणीत बरे वाटू

दे, की हार, व नारळ घेऊन येते'' असा नवस बोलले. गजाननाची मूर्ती दिसली की नमस्कार करणे व श्री साईबाबांचा धावा करणे चालू होते. मला १०० टक्के खात्री होती की बाबा माझे मागणे अव्हेरणार नाहीत कारण बाबांनीच म्हटले आहे की ''शरण मज आला आणि वाया गेला दाखवा दाखवा ऐसा कोणी''

रात्री १० च्या सुमाराला ह्यांची प्रकृती थोडी ढासळलीच. नाकात जी नळी घातली होती त्या नळीने पोटातील घाण बाहेर काढणे शक्य होईना. पहाटे ३ वाजता डॉक्टर परत अेकदा आले, तत्पूर्वी सिस्टरने नाकात दुसरी थोडी जाड नळी घालून सर्व घाण बाहेर काढण्यास सुरवात केली होती. असे करता करता सकाळ उजाडली. सकाळी अेनिमा दिल्याने पोट सर्व स्वच्छ झाले, परंतु सबंध दिवस त्यांना सलाईनवरच ठेवण्यात आले. रात्री व्यवस्थीत झोप लागली.

सकाळी ह्यांना बरे वाटू लागताच मी नवस बोलल्याप्रमाणे श्री बाबांच्या फोटोपुढे नारळ ठेवून हार घातला. त्यावेळी झालेला आनंद शब्दात वर्णन करणे शक्य नाही.

दुसऱ्या दिवसापासून ह्यांची प्रकृती सुधारत गेली. हळूहळू सर्व शारीरिक व्यवहार सुरळीत सुरू झाले. नाकातील नळी काढण्यात आली. त्यानंतर ह्यांना आपले दैनंदिन कामे करता येऊ लागल्यामुळे डॉक्टरनी बुधवारी आम्हाला सांगितले कि तुम्ही उद्या (गुरुवारी) घरी गेलात तरी चालेल. त्याप्रमाणे आम्ही गुरुवारी घरी आलो.

हा अनुभव लिहित असताना माझे मन आजही भरून येत आहे. कारण स्त्रीला पती हा देवासमान असतो.

हा अनुभव वास्तविक मी ताबडतोब लिहिणे आवश्यक होते परंतु तो लिहिण्यास बराच विलंब झाला आहे त्याबद्दल मी ति. बाबांची क्षमा मागून ह्यांना उदंड आयुष्य लाभो अशी बाबांच्या चरणी प्रार्थना करत आहे.

अशीच ति. बाबांनी आमच्यावर कृपादृष्टी ठेवावी अशी त्यांच्या चरणी नम्र प्रार्थना आहे.

# 'अजन्मा जन्मासी आला'

**श्री. पां. बा. भूतकर**
२३/१६७५ अभ्युदयनगर
मुंबई - ४०० ०३३.

प्रत्येक महात्म्याने आपल्या अवताराची समाप्ती शुभदिनी केलेली आहे. भगवान साई त्याला अपवाद कसे असणार? विजयादशमीच्या अत्यंत पवित्र अशा मुहूर्तावर त्यांनी आपल्या अवताराची समाप्ती केली. त्यानंतर त्यांच्या हजारो भक्तांनी आसवे ढाळली. दुःखाश्रूंनी शिर्डी पूर्णपणे ओली झाली. त्यानंतर मात्र बाबा त्यांच्या मूळ स्वरूपात कोणासही भेटले नाहीत.

जिवंतपणीदेखील शिर्डीशिवाय इतरत्र ते गेले नाहीत. ते भक्तांच्या इच्छेखातर सर्व ठिकाणी गेले पण निरनिराळ्या स्वरुपात. ते टांगेवाल्याच्या वेषात गेले, ब्राम्हणाच्या वेषात गेले, कुत्र्याचे रूप धारण करून गेले वगैरे अनेकविध स्वरूपात गेले पण मूळ स्वरुपात ते शिर्डीतच होते. याचे कारण ते सर्वगामी असे होते, सर्वस्पर्शी होते.

बाबांच्या महानिर्वाणानंतर देखील त्यांनी मूळ स्वरूपात कोणालाही दर्शन दिले नाही. कधी कधी स्वप्नात त्यांचे दर्शन होते पण ते भासमान असते. आता ते मूळ स्वरूपात कोणालाही दर्शन देऊ शकणार नाहीत कारण ते परमेश्वराचा अंश म्हणून परमेश्वरात विलिन झाले आहेत.

फार पुरातन काळापासून चालत आलेली ही परंपरा आहे. याबाबतीत पूर्वीही विठ्ठलाचा लाडका भक्त श्री संत नामदेव महाराज यांचे उदाहरण फारच बोलके आहे. परमश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांनी अत्यंत लहान वयात समाधी घेतल्यानंतर त्या काळातील सर्वसामान्यांना काय वाटले असेल त्याचे वर्णन शब्दापलिकडले आहे, पण प्रत्यक्ष भक्ति मार्गातल्या समकालीन संतांना देखील हा विरह सहन झाला नाही. श्री. नामदेव महाराजांनी तर प्रत्यक्ष विठ्ठलाकडे हट्ट धरला.

"ज्ञानदेव पहावा डोळा, अैसे वाटते विठ्ठला।
जगजेठी जगत्पाला, माझी पुरवावी आस।।

आता ज्ञानेश्वरांना मूळ स्वरूपात दृष्य करणे ही अशक्य गोष्ट! ती परमेश्वराला देखील पुरी करणे अशक्य होते. नामदेवांचा हट्ट पाहून त्यांनी खरे तेच सांगितले.

"देव म्हणे, नाम्या पाही। ज्ञानदेव मीच आहे।।
तो आणि मी नाही दुजा। ज्ञानदेव आत्मा माझा।।
माझ्या ठायी ठेवी हेत। सोड खंत खडी द्वैत।।
नाम्या अुमज मानसी। अैसे म्हणे हृषीकेशी।। "

यावरुन एकच गोष्ट सिद्ध होते की बाबांचा अवतार हा परमेश्वरी असल्यामुळे परत होणे शक्य नाही. समकालीन लोकांनी ज्यांचे दर्शन घेतले, सेवा केली ते खरोखर सुदैवी म्हटले पाहिजेत.

राम, कृष्ण, ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम या प्राचीन देवांनी व संतांनी व शेगावचे गजानन महाराज, अक्कलकोटचे स्वामी समर्थ व शिर्डीचे ब्रम्हीभूत साई महाराज या अर्वाचिन संतांनी कार्य झाल्यानंतरच परमेश्वर स्वरूपी विलीन झाले आहेत. आता ते मूळ स्वरूपात कोणालाही दर्शन देऊ शकणार नाहीत.

वस्तुतः बाबांनी शिर्डी हेच कार्यक्षेत्र ठरविले होते. ते कोठून आले याचा कोणालाही अद्याप पत्ता लागलेला नाही. पण त्यांनी अविरतपणे लोकांची सेवा केली. जातीजमातीमधील वैरभाव नष्ट करून समता निर्माण केली. सर्वांचा अहंकार नाहीसा केला. दुकानदारांनी तेल न देण्याचा कट करताच आत्मशक्तीच्या स्वरूपाने मशीद माईतील पणत्या पाण्यावर रात्रभर जळत ठेवल्या ते सर्व साधारण माणसाला अशक्य कार्य बाबाच करू जाणे, कारण परमेश्वरी सत्तेला अशक्य असे आहे तरी काय? एका ब्राम्हणाच्या घरची गरीबी जाणून

त्यांनी त्यांच्या सेवकाला समोर पडलेल्या माणसातून काही तुकडे देण्यास सांगितले. सेवकाने तावडतोब उपरण्यात काही तुकडे बांधून दिले. ही कृती विसंगत दिसली तरी ती किती सुसंगत होती हे साई भक्तांना माहीतच आहे.

याबाबतीत संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या एका अभंगाची प्रकर्षाने जाणीव होते.

जे का रंजले गांजले। त्यासी म्हणे तो आपुले ॥
तोची साधु ओळखावा। देव तेथेची जाणावा ॥

वरील सर्वांवरून एकच गोष्ट स्पष्ट होते "अजन्मा जन्मासी आला."

★★★★★

# बाल साईभक्तांसाठी
# श्रीरामजन्म कथा आणि उत्सव

फार प्राचीन कालची गोष्ट आहे. लंकेचा राजा रावण हा श्रीशंकराच्या कृपाप्रसादाने फार प्रबल झाला. तो मदांध झाला. त्याने तेहतीस कोटी देवांना बंदिवान केले; गाई-ब्राह्मणांना व प्रजेला पीडा होऊ लागली. तेव्हा ते श्रीविष्णूला शरण गेले. श्रीविष्णूला त्यांची दया येऊन त्याने रावणाचे पारिपत्य करण्याकरिता अयोध्येचा राजा दशरथ याचे पोटी अवतार घेण्याचे ठरविले. तेच प्रभु श्रीरामचंद्र होत. त्याविषयींचा कथाभाग हा असा आहे :—



त्या वेळी अयोध्येत राजा दशरथ राज्य करीत होता. त्याला कौसल्या, सुमित्रा व कैकयी अशा तीन राण्या होत्या. त्याच्याजवळ विपुल संपत्ति होती; धनधान्य, पशुपक्षी-सारे काही होते. परंतु पुत्रसंतान नव्हते म्हणून राजा दुःखी असे. एके दिवशी त्याला स्वप्न पडले की — दोन पुरुष व एक स्त्री विनाकारण याच्या हातून मारली गेली. ते स्वप्न त्याने गुरु वसिष्ठांस सांगितले. तेव्हां वसिष्ठ म्हणाले — 'राजा! हे स्वप्न फार वाईट आहे. तेव्हा याची शांति करणे जरूर आहे. त्यासाठी तू अरण्यात जा व तीन श्वापदे मारून घेऊन ये!'

तेव्हा वसिष्ठांची आज्ञा होताच राजा शिकारीस निघाला. अरण्यात सर्व दिवसभर तो वणवण हिंडला, पण शिकार हाती लागली नाही. राजा दशरथ धनुर्विद्येत फार निपुण होता. अंधारात शब्द उमटला तरी तो अचूक बाण मारी! पण आज सूर्यास्त होण्याची वेळ झाली तरी एकही सावज त्याच्या दृष्टिपथात येईना! तेव्हा तो फार निराश झाला. नंतर एका सरोवराच्या काठी उंचशा झाडावर चढून कोणी श्वापद पाणी पिण्यास येईल म्हणून मोठ्या आशेने वाट पहात बसला तो त्याच मार्गाने श्रावण आपल्या अंध आईबापांस कावडीत बसवून काशीयात्रेस चालला होता. सबंध दिवसाच्या प्रवासाने त्याचे आईवडिलांस फार तहान लागली होती. तेव्हा सरोवरातील स्वच्छ व निर्मळ उदक पाहून बाळ श्रावण पाणी आणण्याच्या हेतूने तेथे गेला व आपला कमंडलू पाण्यात बुडविला तोच, कोणी श्वापद पाणी पिण्यास आले असे समजून राजा दशरथाने त्या आवाजाच्या अनुरोधाने बाण सोडला. तो बाण श्रावणाच्या छातीत लागून तो धाडकन धरणीवर कोसळला. राजा झाडावरून उतरून त्या स्थळी येऊन पहातो तो बाळ श्रावण बेशुद्ध होऊन पडलेला. तेव्हा राजाला अतिशय दुःख झाले. तोच श्रावणाने डोळे उघडले आणि म्हणाला — 'राजा! खेद मानू नकोस. माझे वृद्ध आईवडील तहानेने व्याकुळ होऊन जवळच या रानात बसले आहेत. त्यांना हे पाणी नेऊन पाज. मगच मी प्राण सोडीन! त्या वृद्धांच्या सेवेस आता कोणी राहिले नाही.'

श्रावणाच्या या शब्दांनी राजाला गहिवरून आले. त्याचे डोळे अश्रूंनी डबडबले. पण आपले दुःख तसेच बाजूला सारून, बाळ श्रावणाच्या आज्ञेप्रमाणे, तहानेने व्याकुळ झालेल्या त्याच्या आईवडिलांस पाणी देण्याकरता तो लगबगीने निघाला. थोड्याच वेळात तो त्या स्थळी जाऊन पोचला व त्यांचे हाती पाण्याचा कमंडलू दिला. तेव्हा त्या अंध मातापित्यांस अत्यानंद झाला. त्यांनी बाळ श्रावणास जवळ बोलाविले. पण राजा बोलेना! शेवटी 'जर तू न बोलशील तर आम्ही पाणी पिणार नाही' असे जेव्हा त्यांनी निक्षून सांगितले, तेव्हा राजाने सारी खरी हकीकत सांगितली व त्यांचे पाय धरले. पण ते वृद्ध जोडपे पुत्रशोकाने इतके विव्हळ झाले की, शेवटी त्यातच त्यांचा अंत झाला. मरताना त्यांनी दशरथास शाप दिला की, 'हे राजा! आम्ही जसे पुत्रशोकाने मेलो, तसाच तुझा अंत होईल!''

नंतर त्या तिघांचे दहन करून राजा नगरात आला व त्याने झालेली सारी हकीकत गुरु वसिष्ठांस निवेदन केली. तेव्हा गुरु वसिष्ठांनी अग्निनारायणास प्रसन्न करून घेऊन वरप्रसाद मिळवावा असे सांगितले. त्यासाठी त्यांनी ऋष्यशृंगास बोलावून आणले.

राजाकडून पुत्रकामेष्टि यज्ञ आरंभिला. राज्याने अग्निनारायणास तृप्त केले, तेव्हा तो प्रसन्न झाला व राजास आशीर्वाद दिला की — 'तुला चार पराक्रमी पुत्र होतील!'

पुढे अग्निनारायणाच्या वरप्रसादाने राजाच्या तिन्ही राण्या — कौसल्या, सुमित्रा व कैकयी गरोदर राहिल्या. नवमास पूर्ण होताच त्यांस अनुक्रमे राम, लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न असे चार पुत्र झाले. कौसल्येच्या उदरी ज्यांनी अवतार घेतला तेच श्रीप्रभुरामचंद्र होत!

श्रीरामाचा जन्म चैत्र शुक्ल ९ चे दिवशी- दुपारी माध्यान्हकाळी- झाला. रामाचा जन्म होताच अयोध्येत वाद्यांचा एकच गजर झाला. आकाशातून देवांनी पुष्पवृष्टी केली. रामाचा जयजयकार झाला. घरोघर गुढ्या उभारल्या गेल्या. तोरणे, पताका, ध्वज लागले. सुवासिनींनी घरोघर हळदीकुंकू लुटले. राज्यात हत्तीवरून साखर वाटण्यात आली. सर्वत्र आनंदीआनंद झाला.

त्या दिवसाला आज हजारो वर्षे लोटली. पण त्या दिवसाचा आनंद — त्या दिवसाचा उत्साह अजूनही कमी झालेला नाही. प्रतिवर्षी चैत्र शुक्ल ९ च्या दिवशी रामाच्या देवळात श्रीरामजन्माचा उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा होतो. त्या दिवशी प्रातःकाळी उठून, स्नान करून, भक्तमंडळी श्रीरामाच्या देवळात जातात. हरिदास श्रीरामजन्माची कथा करतो; आणि बरोबर दुपारी बारा वाजता श्रीरामास पाळण्यात घालून झोका देतात. गोड सुरावर पाळणा म्हटला जातो —

**जो जो जो जो रे कुळभूषणा ।। दशरथनंदना ।। निद्रा करि बाळा मनमोहना ।। रामा लक्षूमणा ।। जो० ।। धृ० ।। पाळणा लांबविला अयोध्येसी ।। दशरथाचे वंशी ।। पुत्र जन्मला हृषीकेशी ।। कौसल्येचे कुशी ।। जो० ।। १ ।। रत्नजडित पालख ।। झळके अमोलिक ।। वरते पहुडले कुळदीपक । त्रिभुवन-नायक ।। जो० ।। २ ।। हालवी कौसल्या सुंदरी ।। धरूनी ज्ञानदोरी । पुष्पे वर्षिली सुरवरी ।। गर्जति जयजयकारी ।। जो० ।। ३ ।। विश्वव्यापका रघुराया ।। निद्रा करि बा सखया ।। तुजवर कुरवंडी करूनिया ।। सांडिन आपुली काया ।। जो० ।। ४ ।। येऊनि वसिष्ठ सत्वर ।। सांगे जन्मांतर ।। राम परब्रह्म साचार ।। सातवा अवतार ।। जो० ।। ५ ।। याग रक्षुनियां अवधारा ।। मारुनि निशाचरा । जाईल सीतेच्या स्वयंवरा ।। उद्धरी गौतमदारा ।। जो० ।। ६ ।। परिणील जानकी सुरूपा ।। भंगुनिया शिवचापा ।। रावण लज्जित महाकोपा ।। नव्हे पण हा सोपा ।। जो० ।। ७ ।। सिंधुजळडोही अवलीळा ।। नामे तरती शिळा ।। त्यावरि उतरुनिया दयाळा ।। नेशी वानरमेळा ।। जो० ।। ८ ।। समूळ मर्दूनी रावण ।। स्थापिल बिभीषण ।। देव सोडविल संपूर्ण ।। आनंद त्रिभुवन ।। जो० । ।९ ।। राम भावाचा भुकेला ।। भक्ता आधीन झाला ।। दास विठ्ठले ऐकिला ।। पाळणा गाईला ।। जो० ।। १० ।।**

श्री साईबाबांना प्रभूरामचंद्राबद्दल अत्यंत आदरभाव होता आणि म्हणूनच आपल्या हयातीत त्यांनी शिरडीत १९११ साली श्रीरामजन्मोत्सव साजरा करण्यास सुरुवात केली १९११ ते १९१८ ही आठ वर्षे त्यांनी शिरडीतील या उत्सवाचा सोहळा आपल्या दिव्य चक्षूंनी पाहिला. प्रभू राम हा भारतीय आदर्श पुरुष आहे असेच त्यांचे मत होते. बाबांनी सुरू केलेला हा उत्सव आजही शिरडीत मोठ्या थाटामाटाने साजरा होत असतो. चला मुलांनो तुम्ही पण हा उत्सव पहाण्यास जरूर या हं!

# साईबाबांच्या कृपेनेच मला एम्. एस्.सी ला प्रवेश मिळाला

श्री. शिवाजी गुंडू हुद्दार मुख्याध्यापक
गव्ह. मॉडल एच. पी. गर्ल्स मराठी स्कुल
हलियाळ. ता. हलियाळ, जि. कारवार
कर्नाटक राज्य

ता.२६.०७.१९८५ ला माझी मुख्याध्यापक म्हणून नेमणूक झाली. कामावर हजर झालो. नवीन सर्व असल्यामुळे मला कोणाचीही ओळख नव्हती. अशा या अपरिचित परिस्थितीत साईबाबांच्या कृपेने म्हणाना एका साईभक्ताची ओळख झाली. साईभक्ताच्या आग्रहामुळे मला त्यांच्या घरी जाणे भाग पडले. साईभक्ताचे नाव श्रीमती पी. एस्. जावकर मुख्याध्यापिका हलियाळ. यांच्या घरी गेलो. दिवसभर शाळा असल्यामुळे थोडा शिण आला होता. तरी साईभक्ताच्या घरी गेलो, त्यांच्या घरी प्रत्येक भिंतीवर जेथे कटाक्ष टाकावा तेथे साईबाबांचा फोटो होता. प्रसन्न मनाने असलेल्या एका मूर्तिसमोर सतत दिपज्वाला तेवत होती. तसेच साईबाबांचे भक्तांनी टेपवरती साईबाबांचे जीवनचरित्रावरील एक रेकार्ड ऐकवले. साईबाबांच्या भक्तांनी साईबाबांबद्दल थोडक्यात वृत्तांत सांगितला; आणि साईबाबा कोणत्याही कामाच्या वेळी कसे धाऊन येऊन कार्य कसे सिद्धिस, नेतात याबद्दल माहिती सांगितली. तसेच साईबाबांचे नामस्मरण करुन उदी लावली असता कोणतेही काम होते असे सांगितले. येवढे साईभक्ताने सांगितल्यावर कोणाचेही मन साईबाबांकडे वळले नाही तरच नवल! वरं मी त्यावेळी ठरविले की, असेच एकादे काम साईभक्ताच्या सांगण्यावरून बाबांच्या कृपेने झाले; तर मी माझा लेख साईलीला मासिकात देईन. म्हटल्याप्रमाणे माझे काम झाल्यामुळे मी हा लेख पाठवित आहे.

धारवाड विद्यापीठामध्ये एम्. एससी ला ॲडमिशन घेण्याची शेवटची तारीख २२.०८.१९८५ होती. त्याच्यापूर्वी फार्म भरून घेऊन युनिव्हर्सिटित गेलो. जेथे Admission Form Verify करतात तेथे गेलो. सर्व काही ठाकठिक होते. पण Transfer certificate मागवुन घेण्यासाठी इंडियन पोस्टल ऑर्डरवरती कॉलेजच्या पत्याऐवजी युनिव्हर्सिटिचाच पत्ता चुकून लिहिला गेला होता. लगेच त्या क्लार्कने फार्म माझ्याकडे देत सांगितले की उद्या या. तर ॲडमिशनची ती शेवटची तारीख असल्यामुळे दुसऱ्या दिवशी जाऊन काही उपयोग नव्हता. लगेच पोस्टात गेलो पहातो तर सर्व व्यवहार चालू पण चार वाजल्यामुळे इंडियन पोस्टल ऑर्डर देण्याचा सेक्शन तेवढाच बंद होता. थोडा विचार केला पोष्टाच्या बाहेर बरेच लांब आलो. तेवढ्यात साईबाबांची आठवण झाली, त्यांच्याबद्दल स्मृति जागृत झाली. मी मनात म्हटले, ॲडमिशन मिळणे वा न मिळणे तुमच्याच हाती आहे, आणि मिळालेली उदी लाऊन घेतली व पोष्टात परत गेलो. पहातो तो काय एक कन्नड विद्यार्थी कशासाठी तरी पोष्टामध्ये भांडत होता. मला

कन्नड येत नसल्यामुळे त्यांचे बोलणे चालले असेल, कदाचित जोरात गप्पा कन्नडमध्ये चालल्या असतील असे वाटले. पण ज्यावेळी त्यांची हातघाई झाली. तेव्हा मी निश्चय केला की ते भांडत आहेत. मी त्या विद्यार्थ्याला विचारले तेही इंग्लीशमध्ये, विद्यार्थी नम्रपणे सांगत होता आणि मी त्याचे बोलणे ऐकत होतो. तो म्हणाला सकाळी मी जादाचा इंडियन पोष्टल ऑर्डरचा फार्म नेला होता आणि चार वाजल्यामुळे पोष्टमन माझा हा इंडियन पोस्टल ऑर्डरचा फार्म स्विकारीत नाही. मला जो फार्म हवा होता तोच इंडियन पोस्टल ऑर्डरचा फार्म होता. मी तो फार्म घेतला. त्या विद्यार्थ्याला जादाची रक्कम देऊन टाकली. त्या विद्यार्थ्याला पण बरे वाटले. लगेच मी माझा एम. एस्.सी चा अर्ज सबमिट केला, व पंधरा दिवसात मला एम्. एस्.सी ॲडमिशन मिळाली. अशाप्रकारे साईबाबांनी केवळ नामस्मरणाने माझी मनोकामना पूर्ण केली. याचप्रकारे साईबाबांचे साईभक्त जगभर विखुरलेले आहेत त्यांची कामे केवळ साईबाबांच्या नामस्मरणाने पूर्ण होतात. त्यांच्याबद्दल म्हणजे साईबाबांच्याबद्दल अनुभव मला येत आहेत.

असा साईबाबा झाला नाही! पुढे न होणार.

जय साई; जय बाबा.

# जयदेव जयदेव श्री सद्‌गुरुराया श्री साईराया

आकलन मांजसि होवो, तव अद्‌भूत माया ।। जय० ।। धृ.

निर्गुण असूनि होशी, सगुणात्मक मूर्ति
विधि, हरि परमेशाची, साई त्रैमूर्ति ।। जय० ।। १ ।।

अन्तर्यामी सर्वां, सर्वही तुज ठायीं।
पाहुनिया नत होते, मी अपुल्या पायीं ।। जय० ।। २ ।।

तु गुरु मित्र भगिनी, बन्धु, पिता, आई।
भाव मनीं दृढ राहो हे बाबा साई ।। जय० ।। ३ ।।

विनम्र होऊनि केवळ नाम तुझे घ्यावे।
सांई सांई म्हणतां तल्लीन मन व्हावे ।। जय० ।। ४ ।।

राहो साई भक्ति, सदैव मम चित्ति।
बाबा मजसि लाभो, अखंड तव प्रीति ।। जय० ।। ५ ।।

मागणे मागु जातां संभ्रम मज होतो।
नश्वर पंकी पडतां ईश्वर नाठवतो ।। जय० ।। ६ ।।

देई दान दयाळा, अनन्त सौख्याचे।
होवो दर्शन आम्हा, शाश्वत सत्याचे ।। जय० ।। ७ ।।

**— कु. शालिनी देसाई, एम.एस्.सी.**
२१ राजस, अंधेरी पूर्व, मुंबईः ६९.

## धनुर्धारी राम

हात असे लांब
गुडघ्या लागती
धर्नुबाण हाती
श्री रामाच्या ।। १ ।।

बद्ध पद्मासन
पितांबर धारी
कमळाच्या परी
नेत्र त्याचे ।। २ ।।

डाव्या मांडीवरी
सीता बसली ती
श्रीराम पहाती
नेत्रभरे ।। ३ ।।

शाम वर्ण राम
नाना अलंकार
जटांचा सांभार
डोक्यावर ।। ४ ।।

अशा श्रीरामाचे
ध्यान मनी धरी
त्रैलोक्या विसरी
तो महात्मा ।। ५ ।।

— श्री. ग. दे. कुळकर्णी
शामनगर,
अमरावती: ४४४ ६०६.

## रामजन्म

**(चाल — आनंद कंद ऐसा)**

जगतास उद्धराया । अजि रामजन्म झाला ।। धृ० ।।
दुष्टास ताडण्याला
सुष्टास रक्षण्याला
दीनास पाळण्याला । अजि रामजन्म झाला ।। १ ।।
दशवक्त्र भक्त झाला
उच्छेद मांडियेला
त्याचा विनाश करण्या । अजि रामजन्म झाला ।। २ ।।
पापे अपार झाली
अन् यज्ञ याग मिटले
निर्वेध शांती द्याया । अजि राम जन्म झाला ।। ३ ।।
दुःखा नसे परिमिती
सुख ना मिळे कुठेही
नैराश्य नष्ट करण्या । अजि राम जन्म झाला ।। ४ ।।
संत्रस्त पृथ्वी झाली
देवास शरण गेली
तिजला सुखी कराया । अजि राम जन्म झाला ।। ५ ।।
उच्चनीच धर्म जाती
हे भेद नष्ट करूनी
जीवन सुसह्य करण्या । आज राम जन्म झाला ।। ६

— श्री. भास्कर गो. जोशी
साईप्रसाद, ४२ श्रीकृष्णनगर,
बोरीवली (पूर्व),
मुंबई: ४०० ०६६.

# श्री साईंची अशी कृपा

— श्रीमती सुशिला शांताराम बलसे
द्वारा सौ. शोभा मोरेश्वर देसाई
१ एलोरा श्रद्धानंद रोड
विलेपार्ले पूर्व मुं. ५७

इ.स. १९५२ सालची गोष्ट. आमच्या शेजारील सर्व मंडळी शिर्डीला श्री साईबाबांच्या दर्शनाला जाण्यास निघाली. मला पण त्यांच्या बरोबर शिर्डीला जावे व श्री साईबाबांचे दर्शन घ्यावे म्हणून वाटू लागले. परंतु आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे व मुले लहान असल्यामुळे शिर्डीला जाणे जमत नव्हते. श्री. साईबाबांच्या दर्शनाची माझ्या मनातून तीव्र तळमळ लागली होती. दिवसभर मन खिन्न होते. ध्यास फक्त बाबांच्या दर्शनाचा. अंतःकरणापासून मारलेली हांक बाबांनी कधी ऐकली नाही असे कधीच झाले नाही. अगदी बाबांनी म्हटल्याप्रमाणे 'शरण मज आला आणि वाया गेला दाखवा दाखवा ऐसा कोणी' किंवा जो जो मज भजे। जैसा जैसा भावे। तैसा तैसा पावे। मी ही त्यासी। या वचनाची प्रचिती मला त्या दिवशी संध्याकाळी आली. अचानक लॉटरी लागावी त्याप्रमाणे माझ्या यजमानांना ऑफिस मधून कसले तरी पैसे मिळाले व मी माझ्या शेजारच्या आंगणे कुटुंबाबरोबर माझ्या लहानग्यांना घेऊन शिर्डीला गेले. श्री साईबाबांच्या दर्शनाने मन इतके प्रसन्न झाले की बाबांचे स्थान सोडू नये असे झाले २/३ दिवस राहून परत मुंबईला येण्याचा दिवस उजाडला. मनाला खेद वाटू लागला. मन बैचेन झाले. बाबांना प्रार्थना केली व पुन्हा दर्शनाचा योग विचारला. आश्चर्य प्रत्यक्षात बाबा मला समजावत असल्याचे मला वाटले. बाबा मला सांगत होते 'बेटा, तू बाबा बाबा म्हणून बेचैन होऊ नकोस तुझ्या पाठीशी मी विठोबाच्या छायेप्रमाणे उभा आहे. तू विठ्ठल नामाचा सारखा जप कर साईलिलामृत वाच मुले लहान असल्यामुळे मला सप्ताह करणे कठीण होते तरी पण न चुकता मी एक अध्याय दररोज वाचत होते. शिर्डीला जाऊन आल्यापासून ध्यास फक्त एकच बाबांचा. एका गुरुवारी बाबा माझ्या स्वप्नात आले व म्हणाले मला खूप भूक लागली आहे मला जेवायला वाढ, मी स्वप्नातच बाबांना जेवण करून वाढले. बाबा एकदम संतुष्ट झाले व मला आशिर्वाद दिला. मला फारच आनंद झाला आणि मी जागी झाले. यजमानांना उठवून त्यांना सर्व हकीकत सांगितली. त्या दिवसापासून मला अभंग व भजने रचण्याचा इतका छंद लागला की मी नेहमी श्री साईबाबांवर गाणी लिहू लागले माझ्या कुवतीप्रमाणे मी ज्या रचना अभंगाच्या/भजनाच्या केल्यात त्या पैकी एक येथे प्रस्तूत करित आहे.

सद्गुरु साई माझी आई
भक्त. जनांच्या हृदयी वाही
त्रिविध ताप हा लीलया नेयी
कृपा दृष्टीने साई पाही. ।। धृ ।।

काशी मथुरा पंढरपूर
शिर्डी हेची पवित्र नगर
जे कोणी जाई साई मंदीरी
उभा पाठीशी सद्गुरु साई ॥ १ ॥

जैसा भाव तैसे साई
जे जे इच्छिल ते ते देई
कृपा दृष्टीने साई पाही
पूर्ण श्रद्धा हो तयावरी ठेवी
मुक्ति देईल सद्गुरु साई ॥ २ ॥

जशी कृपा श्री साईबाबांची माझ्यावर झाली तशीच कृपा तुमच्यावरही होवो ही प्रभू चरणी प्रार्थना.

# "साई! साई! मुखी म्हणू या"

साई! साई! मुखी म्हणू या
जगीचा हा भवसागर तरू या ॥धृ॥

हृत कमळाच्या सिंहासनी
मूर्ती शोभे लोचनी
तन्मयतेने सेवा करूनी
साईदत्त स्मरू या ॥१॥

निराकार तो पालनकर्ता
नाना रूपे नटवी जगता
मोहापासून दूर राहूनी
श्रीगुरू चिंतन करू या ॥

गुरूसेवेचा धर्म जाणुनी
पुनीत कर्म हा जगी मानुनी
मोक्ष प्रदितचे मर्म जाणूनी
गुरूसेवेचा नित करू या ॥ ३ ॥

-राधाकृष्ण गुप्ता 'चेतन'
पाटकरवाडा, भगतसिंग पथ
डोंबिवली (पूर्व) जि.थाने
४२१२०१

# 'साईराम'

— श्री. अरविंद बारटक्के
१३५ शुक्रवार पेठ, पुणेः ४११ ००२.

'राज्य असावे तर ते प्रभू रामचंद्रासारखे' किंवा 'रामराज्य' असे राज्याच्या एकूण व्यवस्थेबद्दल, सुबत्ता शांतीविषयी म्हटले जाते. रामाचे राज्य जसे होते तसे ते असावे अशी सर्वांचीच इच्छा असते. सुखी समाधानी प्रजा, सर्वकडे शांती, धैर्य, सुबत्ता, आबालवृद्ध, स्त्री परुष, मुके प्राणी, संपत्ती या सर्वांच्या रक्षणाची हमी म्हणजेच ते रामराज्य.

अशा रामराज्याचा अधिपती म्हणजे प्रभू रामचंद्र. पुरुषोत्तम राम. नरोत्तम श्रीराम. कुलसंपन्न, गुणसंपन्न, आदर्शाचा अधिपती, आबालवृद्धांच्या मनाचा राजा. प्रभू रामचंद्रांचा जन्मोत्सव म्हणजे भक्तांच्या आनंदाची पर्वणी. आनंदाचे कारंजे उडत रहाते. सौख्याचे ढग बरसत राहतात. तृप्तीचे दवबिंदू पुलकित करतात. मनाचे पक्षी उंच भराऱ्या घेतात आणि श्रीरामाच्या जन्मोत्सवाच्या सोहळ्याने सारेच हर्षित होतात.

असा महिमा या राम जन्मोत्सवाचा. तो उत्सव साईबाबांनीही शिरडीत सुरू केला. कारण हा उत्सव सुरू करणे म्हणजे प्रभू रामचंद्राचा आदर्श जनमनासमोर ठेवणे होते. रामराज्याच्या कल्पनेचे स्वागत करणे होते. रामचंद्रांनी जसा पराक्रमाचा, स्वकर्तृत्वाचा, सुआचरणाचा, सदाचारीतेचा, गुणसंपन्नतेचा वारसा लोकांच्यापुढे ठेवणे व त्यांच्यामुळे लोकांना जशी प्रेरणा, स्फूर्ती मिळाली तद्वतच ती आपणा भारतवासीयांना मिळावी हाच हेतू तर श्री साईबाबांना अभिप्रेत नसेल? नाहीतर आपल्या हिंदू धर्मात तेहतीस कोटींची देवांची संख्या सांगितली जाते पण त्यातून प्रभू रामचंद्रांचाच जन्मोत्सव साईबाबांनी चालू करावा हे लक्षणीय आहे.

रामनामाविषयी सुद्धा अनेक गोष्टी सांगितल्या जातात. याचा महिमा अगाध आहे. रामनामाचा जप अत्यंत प्रभावी असतो असे सांगितले जाते. साईभक्तांना आपल्या साईनामाविषयी असेच वाटते. साईनाम जप सुद्धा असाच प्रभावी वाटतो, आणि म्हणूनच साईच्या नावापुढे 'राम' जोडून 'साई राम' हाच जप काही वेळेस प्रचलित दिसतो. साई आणि राम यांच्या एकात्मतेचे हे प्रतिकच म्हणावे लागेल.

सावळ्या श्री रामाचे दर्शन मनोहारी असते. मनाला सर्व क्लेशांपासून दूर करते. साईबाबांच्या मूर्तीकडे पाहिल्यानंतर सुद्धा असेच प्रत्यंतर येते. ते सुंदर रुप, चेहऱ्यावरचा तो भाव, तेजस्वी बोलके डोळे सारेच मोहून टाकते. त्या तेजोमय मूर्तीकडे सतत पहातच रहावे. देहभान हरपून जावे. या नश्वर जगाची जाणीवच न रहावी व तनमन साईमय होवून जावे असे वाटते.

साई दर्शन सोहळा अतीव सुख देणारा आहे. शिरडीला येताना मन उत्सुक असते. साई दर्शनाने ते भावूक बनते. आनंदाचे भरते येवून डोळे, हृदय दाटून येतात, आणि शिरडीहून परतताना काहीतरी हरवल्याची हुरहूर अस्वस्थ करते. कारण साई दर्शन कितीदा झाले तरी मनाची, लोचनांची तृप्ती ही कधीच होत नाही. मन शिरडीतच असते. नश्वर

शरीराला शाश्वत जगतातील कर्मकृत्यांना सामोरे जाण्यासाठी परतावे लागते.

हे साईरामा, तुझा आमच्यावर असाच कृपाशिर्वाद असू द्यावा. साऱ्या भारतीयांना अभिप्रेत असलेले रामराज्य या भरतखंडात नांदावे आणि तूच सुरू केलेला राम जन्मोत्सव सार्थकी लागावा हीच इच्छा मनी धरून साईला लक्ष लक्ष अभिवादन!

# श्री साईराम म्हणजे प्रभू रामचंद्रच

— सौ. उषा अधिकारी,
सावित्री सदन, बंदर रोड, रत्नागिरी.

श्रीबाबा देहधारी होते तेव्हाच शिरडीत रामजन्माचा उत्सव सुरू झाला. श्रीबाबांचे एक भक्त कृष्ण जागेश्वर भीष्म ह्यांच्या मनात श्रीरामजन्म उत्सव सुरू करावा ही कल्पना सुचली. श्रीबाबांच्या विविध लीला ऐकून व प्रत्यक्ष डोळ्याने पाहून श्रीबाबा हे प्रत्यक्ष रामच आहेत तेव्हा श्रीरामाचा म्हणजेच आपल्या साईरामाचा जन्मोत्सव आपण साजरा करू या असं ते श्री. काका महाजनींना म्हणाले. त्यांना बुवांची कल्पना फार आवडली. कारण त्यांच्या दृष्टीने श्रीबाबा म्हणजेच प्रभूराम होते. पण ही कल्पना प्रत्यक्षात कशी येणार? ही गोष्ट श्री साईरामांच्या कानावर कोण घालणार अशा विवंचनेत दोघेही असताना श्री साईरामानीच त्यांना अनेक प्रश्न विचारून त्यांचे मनोगत जाणून घेतले व अभय देऊन रामजन्मोत्सव सुरू झाला आहे तो आजतागायत मोठ्या वैभवात हजारो भक्तांच्या डोळ्यांचे पारणे फिटेल इतक्या उत्तम तऱ्हेने साजरा होत आहे. श्रीरामाची लाडकी लेकरे अडीअडचणींचा विचार न करता श्री साईरामावर भार टाकून शिरडी क्षेत्राकडे धावत आहेत, तृप्त होत आहेत आणि हे कौतुक श्रीसाईराम मोठ्या कौतुकाने पहात आहेत.

अयोध्या नगरीत कौसल्या राणीच्या पोटी श्रीविष्णू श्रीराम रूपात अवतरले आणि शिरडीत श्रीसाईराम बालसाधूच्या रूपात प्रकटले. श्रीरामाने वसिष्ठ मुनींना गुरू करून सर्व शिक्षण घेतले. श्रीसाईरामांनी आपल्या गुरूने आपणांस सांभाळले, कासवीच्या अमृतमय दृष्टीने पाळले आणि सर्व तऱ्हेचे शिक्षण दिले अशी स्वमुखाने कबुली दिली आहे. आपले श्रीसाईराम प्रभू रामचंद्राप्रमाणे अवतारी पुरुष होते, अजानुबाहू होते, देखणे होते, अंतर्ज्ञानी होते. ज्याच्या मनात प्रभू रामचंद्राविषयी तीव्र भक्ती निर्व्याज प्रेम असे त्याला ते त्या रूपात दर्शन देऊन त्यांची मनःकामना पूर्ण करीत. मद्रासकडील एक स्त्री रामभक्त होती. तिची तीव्र भक्ती असल्याने तिला रामप्रभूचे मनोहारी दर्शन वारंवार होई. ती रामाची भजने तन्मय होऊन म्हणे. पुढे तिला तिच्या पतीप्रमाणेच द्रव्य लोभ निर्माण झाला इतका की तिला सतत होणाऱ्या रामदर्शनाला ती मुकली जेथे लोभला वास। तेथे कसा रामाचा निवास" अशी स्थिती झाली ती अज्ञानी असल्याने तिची चूक तिला कळली नाही. पण ती कळण्याची वेळ जवळ येऊन ठेपली होती. शिरडी क्षेत्र म्हणून

गरजू लागले. श्रीसाईरामांच्या कीर्तीचा परिमल दशदिशांना दरवळू लागला. अपरंपार यात्रा भरू लागल्या. श्रीसाई प्रती राम आहेत ते सढळ हस्ते पैसे वाटतात हे ऐकून मद्रासी मंडळी शिरडीत आली. ही मंडळी केवळ पैशाच्या लोभाने आली आहेत हे साईरामांनी आधीच अंतर्ज्ञानाने जाणले होते. त्यांच्या लोभाला खतपाणी न घालता तो समूळ नष्ट करण्यासाठी तर श्रीराईरामांनी त्यांना आपल्या पायी खेचून आणलेले. त्यामुळे ती स्त्री आपल्या निसर्गदत्त कोमल आवाजाने राम भजने आळवू लागली की श्री साईराम रंगून जात, प्रसन्न होत पण त्यांनी त्या कुटुंबाला पेढा बर्फी किंवा चवली पावलीच्या नाण्याशिवाय काहीही दिले नाही. इतरांना पैसे देणारे बाबा आपल्या बाबतीत कृपण का हे त्या बाईने ओळखले. तिथे आल्यापासूनच तिचे विचार पालटले होते. श्रीसाईरामांकडे पाहून तिला प्रेमाचा गहिवर येई आणि ती रामभजने अधिकाधिक तन्मय होऊन गाई. तिच्यातला लोभ नाहीसा झाला आहे, ती रामाशी तद्रुप झाली आहे हे पाहून श्रीसाईरामांनी तिच्यावर पूर्ण अनुग्रह करून तिला कोदंडधारी प्रभू रामचंद्राच्या रूपात दर्शन दिले — हे दर्शन झाले मात्र. ती देहभान विसरली. तिच्या अंगावर भक्तीप्रेमाचे रोमांच उठले, डोळ्यातून घळाघळा आनंदाश्रु वाहू लागले. मधेच ती आनंदाने टाळ्या वाजवू लागली. हे सगळे दृश्य श्रीसाईराम आपल्या परम कृपाळू नजरेने पहात होते. हा प्रकार काय आहे ते लोकांना समजेना पण जेव्हां तिच्या आनंदाचे, भावविवश स्थितीचे कारण लोकांना समजले तेव्हां श्रीसाईरामाच्या अलौकिकतेची त्यांना प्रचिती पटली. इतक्यावरच भागले नाही तर तिच्या पतीचाही लोभ गेलेला पाहून श्रीसाईरामांनी त्याला रामदासांच्या रूपात दर्शन देऊन कृतार्थ केले. या मंडळींना पैसा मिळाला नाही पण जी मनःशांती मिळाली त्याला तोड नाही.

असेच एक रामोपासक डॉक्टर केवळ मित्राच्या आग्रहाला बळी पडून शिरडीत आले. येतेवेळी त्यांनी मित्रास बजावले होते की त्या शिरडीतल्या फकीराला मी मुळीच नमस्कार करणार नाही, श्रीसाईरामांची योग्यता जाणणाऱ्या त्या मित्राने ही अट लगेच मान्य केली. दोघे शिरडीत आले. डॉक्टरनी आपल्या श्रीसाईरामांना पाहिले मात्र आपण डॉक्टर आहोत, आपल्या अंगावर संबंध विलायती पोशाख आहे. पायात बूट आहेत हे ते विसरले आणि धुळीतच त्यांनी श्रीसाईरामांना साष्टांग नमस्कार घातला. मित्राला आश्चर्य वाटले तेव्हा डॉक्टर म्हणाले, " अरे असा बघतोस काय! माझ्यापुढे तुझा फकीर नाही तर प्रत्यक्ष राम आहेत राम. तो अयोध्यावासी होता— हे शिरडीवासी.

श्रीसाई सच्चरितकार श्री. गोविंद र. दाभोलकर यांचेवर श्रीसाईरामांचा पूर्ण अनुग्रह होताच त्यांचे मन आनंदाने नाचू लागले. या आनंदाच्या भरात आपण रामनामाचे अखंड आवर्तन करावे हा शुभविचार त्यांचे मनात आला. ज्याने हा विचार त्यांच्या मनात निर्माण केला त्याला पुष्टि देण्यासाठीच औरंगाबादकर नावाच्या भक्ताच्या तोंडून पहाटेच्या वेळी रामाचे भजनच श्री. दाभोलकरांना ऐकवले. औरंगाबादकरांना अनेक पदे येत असताना त्यांनी श्रीरामाचेच पद गाईले याचाच अर्थ साईरामाना मी रामनामाचे अखंड आवर्तन करणे आवडेल असा त्यांचा ग्रह झाला आणि श्रीसाईरामाच्या कृपेने त्यांचेकडून

ते आवर्तन झाले.

श्रीसाईरामांना प्रभूरामचंद्राच्यावरील ग्रंथांची पण फार आवड होती. ते भक्तांना भावार्थ रामायण वाचायला सांगत असत. विजयानंद नावाच्या तरुण स्वामीला त्यांनी आध्यात्म रामायण वाचायला सांगितले होते कारण त्याचे निधन जवळ आलेले होते ते त्यांनी अंतर्ज्ञानाने ओळखले होते. अंते मति सा गतीः! या न्यायाने त्याला रामनामाने मोक्ष मिळावा ही त्यामागील भावना होती. स्वतःचा अंतकाळ जवळ आला तेव्हां श्री. वझे यांचेकडून श्रीसाईरामांनी श्रीराम विजय ग्रंथ वाचून घेतला होता.

असा हा आपला साईराम.— कुणाच्या पोटी जन्माला आला — कुठे शिकला — कुठे वाढला याबद्दल इतकी वर्षे झाली तरी अज्ञात राहिलेला — पोरवयात शिरडीत प्रकटलेला — मशिदीत राहाणारा ० भिक्षा मागून खाणारा भक्तावर सदोदित कृपाछत्र धरणारा, राम एक वचनी, एक बाणी एक पत्नी या बाण्याचा. आपला साईराम अंतर्ज्ञानी, सत्यवचनी, भक्तकैवारी, बाल ब्रह्मचारी म्हणून प्रसिद्ध. प्रभू रामचंद्राने नीतीने राज्य करून प्रजेला सुखी केले. रामराज्य म्हणजे सुखाचे आनंदाचे राज्य अशी म्हण पडली. आमच्या शिरडीच्या श्रीसाईरामाने असामान्यत्व झुगारून देऊन दीन दुबळे, अनाथ, अपंग, रोगी कुष्टी यांना जवळ केले— राव रंक, गोर गरीब सर्वांना सारखे वागवले — दिलेला शब्द पाळून त्यांच्या मनोकामना पुरवल्या, त्यांचे लाड केले — कौतुक केले. दिले ते भरभरून दिले. मातेसारखे प्रेम केले. शिरडी नगरीत पडक्या मशिदीत फाटके तुकडे कपडे घालून, शिळेपाके खाऊन भक्तांच्या सहवासात जवळ जवळ ६० वर्षे अनभिषिक्त राज्य केले. अशा या माझ्या सद्गुरुला, असंख्य भक्तांच्या प्रियतम साईरामाला त्याच्या या पुत्रीचे सहस्त्र प्रणाम!

ती म्हणते

श्रीसाईरामा गेलात सोडूनी देह जरी
तरीही निरंतर अपुली कृपा अम्हावरी॥
हे जाणुनी निज अंतरी
तव चरणयुगुले मी धरली माझ्या उरी॥

**— साईराम —**

**बोला साईराम प्रभू बोला साई श्याम प्रभू**
**बोला साईराम॥**
**बोला साईराम प्रभू बोला साई श्याम प्रभू**
**आपुले दैवत प्रभू साईराम। बोला साईराम॥**
**बोला साई रघुवीर। बोला साई यदुवीर**
**शिवशंकर तो साई भगवान। बोला साईराम॥**
**शिरडीत राही। जग सारे पाही**
**ह्रदयनिवासी साई आत्माराम॥ बोला साईराम**


# बाबांची कृपा

— श्री. सुनिल सीताराम महाजन
१०/९६७ (१) चदुर रोड संग्राम चौक
इचलकरंजी - ४१६ ११५
महाराष्ट्र

गेली कित्येक वर्षापासून आम्ही बाबांची पुजापाठ करत आलेलो आहोत, व सध्या पण करीत आहोत. पण आमच्या वडीलांची बाबांच्या वर खूपच भक्ती आहे, व आता आमची पण भक्ती हळुहळू वाढत आहे. बाबा आम्हाला अधुन मधून एखादे चमत्कार दाखवत असतात. या पैकीच एक घडलेली घटना मला आठवत आहे. जेव्हा मी चार पाच वर्षाचा होतो त्याच वेळची ही घटना आहे.

एकदा आमच्या घरात काही पाहुणेमंडळी आली होती. आमचे पाहुणे मंडळी व मी आमच्या घरातून सकाळी ११ च्या सुमारास दुकानाला जात होतो. मला त्या वेळेला रस्त्याच्या अधुन मधून पळण्याची फार वाईट सवय होती. जेव्हा मी रस्त्याच्या मधून पळत होतो, तेव्हाच एका सायकलस्वाराने मला धडक मारली, व मी खाली पडलो. व तो सायकल स्वार व सायकल माझ्या पायावर पडले. त्या वेळेस मला काही जास्त दुखत नव्हते. नंतर नंतर मात्र त्या पायावर सुज आली व खुप वेदना होऊ लागल्या. वडीलांनी मला ताबडतोब हाडांच्या डॉक्टरांकडे नेले. डॉक्टरांनी माझ्या पायाला प्लास्टर केले. एक महिना होत आला तरी पण माझा पाय बरा होत नव्हता. नंतर आम्ही आमच्या फॅमीली डॉक्टराच्या कडे गेलो. तेव्हा तो म्हणाला की ह्याचे पाय कायमचेच वाकडे राहणार. पायातील मुख्य हाड तुटले आहे. भारतात काय तर तुम्ही इंग्लंडला घेऊन गेलात तरीही त्याचे पाय चांगले होणार नाही. असे म्हटल्याबरोबर मी खूप घाबरलो. कारण मला त्या वेळेला चालायला सुद्धा होत नव्हते. एकाच ठिकाणी झोपून कंटाळा आला होता. त्यावेळेस मला खुप वेदना होत होत्या. पण माझे, आईवडील अजीबात घाबरले नाहीत. त्यांनी घरात जाऊन श्री साईबाबांच्या कडे प्रार्थना केली की बाबा जर आमच्या मुलाचे पाय इथेच बरे झाले असते तर आम्ही याला शिरडीला घेऊन येऊ. व दुसऱ्याच दिवशी मला एका कोऑपरेटिव्ह दवाखान्यात दाखविले. तिकडच्या डॉक्टरांनी माझे पाय तपासले तेव्हा म्हणाले की ह्याच्या पायातील हाड ब्रेक झालेले आहेत ते प्लास्टर बांधल्यानी बरे होईल. असे म्हणून त्या डॉक्टरांनी माझ्या पायाला प्लास्टर केले व नंतर बाबांच्या कृपेने माझे पाय एका महिन्याच्या आतच एकदम पूर्णपणे बरे झाले. मला चालता फिरता येऊ लागले, तेव्हा मला वडीलांनी सांगीतले की, ही सर्व बाबांचीच कृपा आहे. नंतर आम्ही सर्व जण शिरडीला गेलो. अशीच बाबांची कृपा आमच्या परिवारासह कायमचीच असु दे, अशी श्री साई चरणी प्रार्थना.

# डॉ. किर्तीकर साईचरणी विलीन



आम्हांस जाहीर करण्यास अत्यंत दुःख होते की श्री साईबाबांचे एक निष्ठावंत भक्त, श्री साईबाबा संस्थान शिरडीच्या व्यवस्थापन मंडळातील एक सदस्य, एक क्रियाशील समाजसेवक डॉ. मोरेश्वर खंडेराव किर्तीकर यांचे मंगळवार दिनांक ११ मार्च १९८६ रोजी रात्री ११-२५ वाजता अचानक देहावसान झाले. निधन समयी त्यांचे वय ६७ वर्षांचे होते. व्यवसायाने ते वैद्यकीय पेशातले. रोग चिकित्सा हा त्यांचा खास विषय. द्वादशाक्षार शास्त्रातही ते चांगले पारंगत होते. परळ येथील हाजी बचुअली व कल्याण येथील सोशल सर्व्हिस लीग इस्पितळ यांचे ते सन्माननीय रोग चिकित्सक होते. मुंबईतील होमिओपॅथीक महाविद्यालयाच्या संस्थापकांपैकी ते एक होत.

श्री साईबाबा संस्थान शिर्डीचे ते एक विश्वस्त. असल्याने त्यांची शिरडी समाधी मंदिर उपसमितीचे मुख्य म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. या पदावर राहून त्यांनी भक्तांसाठी फायदेशीर व उपयुक्त सुधारणा अमलात आणल्या होत्या. याशिवाय संस्थानची रुग्णालय समिती, भोजन गृह समिती, उत्सव समिती या समित्यांचेही ते एक सदस्य होते.

डॉ. किर्तीकर यांनी सप्टेंबर १९७७ साली मुंबईतील साई भक्तांसाठी "साई भक्त मंडळ" या नावाची संस्था दादर येथे स्थापन केली. त्या संस्थेचे स्थापनेपासून अखेर पर्यंत ते अध्यक्ष होते. गिरगावातील 'साईधाम' या संस्थेशीही त्यांचा संबंध होता. त्यांच्या निधनाने संस्थान व संस्था एका निस्सीम साई सेवकाला व अथक कार्यकर्त्याला मुकली आहे.

डॉ. किर्तीकरांनी पाठारे प्रभु समाजाचीही भरीव सेवा केली आहे. त्याबद्दल त्यांचा सुवर्णपदक बहाल करून समाजाने गौरव केला होता. त्यांच्या पश्चात् त्यांच्या सुशील व सुविद्य पत्नी, पुत्र, कन्या व असंख्य साई परिवार आहे. त्यांचे कधीही भरून न येणारे असे नुकसान झाले आहे. आम्ही सर्व त्यांच्या दुःखात सहभागी आहोत.

श्री साई मृतात्म्यास चिरशांती व सद्गती देवो.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
## श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. | पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकिंग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई चरित्र | मराठी | ३४-५० | ६-०० |
| २. | —"— | इंग्रजी | २०-०० | ४-२५ |
| ३. | —"— | हिन्दी | १६-०० | ४-२५ |
| ४. | —"— | कन्नड | १०-०० | ४-०० |
| ५. | —"— | तेलगू | १४-५० | ५-२५ |
| ६. | —"— | तामीळ | १२-०० | ४-५० |
| ७. | —"— | सिंधी | २२-०० | ४-५० |
| ८. | गुजराथी पोथी | गुजराथी | ३१-०० | ६-०० |
| ९. | श्री साईलिलामृत | मराठी | ७-५० | ४-०० |
| १०. | —"— | गुजराथी | ४-२५ | ४-०० |
| ११. | अवतार व कार्य | मराठी | ६-५० | ४-०० |
| १२. | स्तवन मंजिरी | मराठी | ०-३० | ३-५० |
| १३. | —"— | गुजराथी | ०-३० | ३-५० |
| १४. | सगूणोपासना | मराठी | ०-७० | ३-५० |
| १५. | चार अध्याय | मराठी | १-२५ | ३-५० |
| १६. | सगूणोपासना | सिंधी | १-२५ | ३-५० |
| १७. | सचित्र साईबाबा | इंग्रजी | ३-४० | ३-५० |
| १८. | मुलांचे साईबाबा | मराठी | १-५० | ३-५० |
| १९. | —"— | इंग्रजी | २-०० | ३-५० |
| २०. | —"— | तेलगू | २-५० | ३-५० |
| २१. | —"— | गुजराथी | १-५० | ३-५० |
| २२. | गाईड टू होली शिरडी | इंग्रजी | १-५० | ३-५० |
| २३. | —"— | मराठी | १-५० | ३-५० |
| २४. | —"— | गुजराथी | १-५० | ३-५० |
| २५. | तेलगु पुजाविधी | तेलगु | — | — |
| २६. | रूद्राध्याय | मराठी | ०-९० | ३-५० |
| २७. | साईबाबा ऑफ शिरडी बाय प्रधान | इंग्रजी | ३-०० | ३-५० |
| २८. | साईबाबा ऑफ शिरडी वाय. पी. भरूचा | इंग्रजी | ६-५० | ४-०० |

Regd. No. MH/BYE/26
LICENCE No. 19
Licence to Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14

# श्री साईबाबा संस्थान शिरडी
## फोटोंची यादी

| अनु. | फोटोचे नांव | साईज | किंमत | पोस्टेज व पॅकिंग |
|---|---|---|---|---|
| १. | आशिर्वाद फोटो | १४" × २०" | १-८५ | ३-५० |
| २. | —"— | १०" × १४" | १-१५ | ३-५० |
| ३. | —"— | १०" × १२" | १-५० | ३-५० |
| ४. | —"— | ७" × २०" | ०-६० | ३-५० |
| ५. | —"— | ५½" × ६½" | ०-३५ | ३-५० |
| ६. | —"— | ४" × ५" | ०-३० | ३-५० |
| ७. | —"— | २" × ३" | ०-२० | ३-५० |
| ८. | दगडावर बसलेले साईबाबा (रंगीत) | १४" × २०" | १-८५ | ३-५० |
| ९. | " " (काळापांढरा) | १४" × २०" | ०-८५ | ३-५० |
| १०. | दगडावर बसलेले साईबाबा (रंगीत) | ३½" × ५½" | ०-६० | ३-५० |
| ११. | द्वारकामाई (रंगीत) | १७" × २२" | ५-७५ | ३-५० |
| १२. | —"— | १४" × २०" | १-६० | ३-५० |
| १३. | —"— | १०" × १४" | १-२५ | ३-५० |
| १४. | समाधी फोटो | १३" × ९" | १-१५ | ३-५० |
| १५. | —"— | ८" × ६" | ०-७५ | ३-५० |
| १६. | —"— | ४" × २½" | ०-१० | ३-५० |
| १७. | कॅमेरा फोटो (रंगीत) | ९" × १२" | १-६५ | ३-५० |
| १८. | ऑफसेट फोटो | ९" × १३" | १-५० | ३-५० |
| १९. | —"— | ५" × ७" | ०-४० | ३-५० |
| २०. | दगडावर बसलेले बाबा (निळा) | ९" × १२" | ०-७५ | ३-५० |
| २१. | मूर्ती फोटो (बुस्ट) | ३¾ × ४½" | ०-३५ | ३-५० |

मुद्रक : श्री.एम.डी. राजन, गीता ऑफसेट, बी-२३ रॉयल इंडस्ट्रियल इस्टेट, नायगांव क्रॉस रोड, वडाळा, मुंबई ४०० ०३१.
**संपादक व प्रकाशक** :श्री.रा.द. बन्ने, साई निकेतन
डॉ.आंबेडकर मार्ग, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर मुंबई ४०० ०१४